शनिवार । १२ सप्टेंबर १९८१ । एक रुपया

# माणूस



ना. धों. ताम्हनकरांच्या
'दाजी'चे पुनरागमन

पृष्ठ. . . .१०

## समुद्राने महासमुद्र व्हावे. नद्या पुष्कळ आहेत.

श्री. ग. मा.

१९५६ मध्ये नागपूरला डॉ. आंबेडकरांनी आपल्या तीन लाख अनुयायांसह बौद्धधर्मप्रवेश केला तेव्हा देशात फारशी खळबळ माजली नाही. 'प्रमुख नेते आणि विचारवंत यांनी आंबेडकरांच्या बौद्धधर्मस्वीकाराकडे दुर्लक्ष केले' असे धनंजय कीर यांनी आपल्या आंबेडकर चरित्रात या घटनेवर लिहिताना म्हटले आहे, ते खरेच आहे. (पृ. ५२३) याउलट जेमतेम हजार-दोन हजार हरिजनांनी मीनाक्षीपुरम् येथे व आसपास धर्मांतर केल्यावर देशात आज केवढी खळबळ माजली? पंतप्रधान इंदिरा गांधींपासून शंकराचार्यांपर्यंत आणि डाव्या कम्युनिस्टांचे बौद्धिकप्रमुख बी. टी. रणदिवे यांच्यापासून रा. स्व. संघ – विश्व हिंदू परिषद या संघटनांपर्यंत सर्वांनी या हरिजनांच्या इस्लामधर्मप्रवेशाची तातडीने व गंभीरतेने दखल घेतली व त्यातून निरनिराळी विश्लेषणे व उपाययोजना पुढे आल्या.

(१) अरबांच्या पैसा (२) उच्चवर्णीयांकडून हरिजनांना मिळणारी हीन वागणूक– म्हणजेच सामाजिक विषमता (३) जमीन फेरवाटप कार्यक्रमाचे अपयश व हरिजनांचा एकूण आर्थिक मागासलेपणा (४) हरिजनांचा, दलितांचा अधिक आक्रमक बनण्याचा प्रयत्न – अशी सर्वसाधारण चार कारणे या मीनाक्षीपुरम् धर्मांतरामागे असल्याचे प्रतिपादन केले जात आहे.

राजकीय सत्तास्पर्धेत हरिजनांचा बळी दिला जातो हेही एक पाचवे कारण येथे नोंदता येईल.

ही कारणमालिका आणखीही वाढवता येईल; परंतु एक गोष्ट या मीनाक्षीपुरम् घटनेमुळे अगदी स्पष्ट झाली. सगळे धर्म समान असले, सर्वधर्मसमभाव वगैरे जरी आपण बोलत किंवा मानत असलो तरी बौद्ध व इस्लाम या दोन धर्मात आपल्यापैकी बहुतेकजण मनोमन फरक करतात. तीन लाख हरिजन एकाच दिवशी, आपल्या नेत्यासह, बौद्धधर्मात गेले म्हणून आपण फारसे अस्वस्थ झालो नाही; पण हजार - दोन हजार हरिजन इस्लाममध्ये गेल्यावर मात्र सगळ्यांचे डोळे खाडकन उघडतात–ही तफावत, ही विसंगती कुठल्याही सर्वधर्मसमभावात न बसणारी आहे.

जरी प्रमुख नेते आणि विचारवंत यांनी आंबेडकरांच्या बौद्धधर्म स्वीकाराकडे त्यावेळी दुर्लक्ष केले तरी सावरकर हे एक सन्माननीय अपवाद होते. सावरकरांनी आंबेडकरांच्या धर्मांतराला 'पथांतर' म्हटले व 'बौद्ध आंबे-

→

डकर हे हिंदू आंबेडकरच आहेत,' असे निश्चयात्मक मत त्याच वेळी लेखाद्वारे व्यक्त केले. बौद्धधर्म हा व्यापक हिंदुत्वाच्या, हिंदू धर्माच्या व्याख्येत बसणारा एक पंथ आहे अशीच आपली सर्वसाधारण समजूत आहे. लोकमान्य टिळक, राधाकृष्णन् इत्यादी अनेक हिंदू पंडितांची मते तर सोडाच; खुद्द डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतर-प्रसंगी नागपूरला उपस्थित असणाऱ्या बौद्ध-पंडितांनीही अशाच अर्थाचे मतप्रकटन केले आहे. "महास्थविर चंद्रमणी आणि इतर भिक्षु यांनी (आंबेडकरांच्या) धर्मांतराच्या दीक्षासमारंभाच्या वेळी जे पत्रक प्रसिद्ध केले होते, त्यात हिंदूधर्म आणि बौद्धधर्म ह्या एकाच वृक्षाच्या फांद्या आहेत असे म्हटले होते," ही धनंजय कीरांनी आपल्या आंबेडकर चरित्रात केलेली नोंद (पृ. ५२३) काय सुचविते ? आंबेडकर व त्यांचे अनुयायी थोडे दूर गेले तरी आपल्याला कायमचे पारखे – परकीय झाले नाहीत, असेच त्यावेळी सर्वसाधारण हिंदू मत होते व पंडितांचा निर्वाळाही यापेक्षा वेगळा नव्हता.

धर्म जर खरोखरच बदलला असता तर हरिजनांना मिळणाऱ्या सर्व सवलती तार्किक-दृष्ट्या रद्द व्हायला हव्या होत्या. कारण या सवलती हिंदुधर्मीय पूर्वास्पृश्यांसाठी होत्या; पण तसे घडले नाही. काँग्रेस व जनता सरकारनेही या सवलती वेळोवेळी मुदत वाढवून चालूच ठेवल्या व हे योग्यच झाले. सामाजिक विषमता हे सर्व हिंदूधर्मीयांचे सामुदायिक पाप आहे व त्यांनीच ते फेडले पाहिजे, अशी यामागील सर्वसाधारण भावना होती व अजूनही काही काळ अशा सवलती चालू राहिल्या तर हिंदुधर्मीयांनी कसलीही खळखळ करणे बरोबर नाही. सवलतीतले गैरप्रकार मात्र कमी व्हायला पाहिजेत, यापेक्षा अधिक चांगल्या मार्गाचा शोधही चालू राहायला हवा. मुद्दा हा की, हरिजनांचे बौद्ध होणे आपण *धर्मांतर मानले* नाही, पथांतर मानले. पक्ष कोणताही असो.

पं. नेहरूंचा दृष्टिकोन काय होता ? धनंजय कीरांनी आपल्या आंबेडकर चरित्रात नेहरूंचे एक अवतरणच दिले आहे. हे अवतरण नॉर्मन कझिन्सच्या 'Talks With Nehru' या पुस्तकातले आहे. नेहरू म्हणतात : "हिंदुधर्माच्या उदरात एक तेजस्वी विसंवाद आहे. निरनिराळ्या आणि परस्परविरोधी विचारांचा समावेश करण्याएवढा हिंदूधर्म विशाल आहे... यापूर्वी हिंदूधर्माने मोठी स्थित्यंतरे पचविली आहेत. बौद्धधर्म जन्मास आल्यावर हिंदूधर्माने त्याच्याशी स्पर्धा केली नाही, त्याला शोषून घेतले."

असा इतिहास असल्याने आपण आंबेडकरांच्या बौद्ध होण्यामुळे हादरून गेलो नाही. धक्का बसला; पण तो सहन होईल इतपतच होता.

मीनाक्षीपुरम्‌चा धक्का मात्र मोठा का वाटतो ? हरिजन बौद्ध होण्याऐवजी मुस्लिम झाल्याबरोबर किंवा त्यांनी ख्रिस्ती धर्माचा अंगीकार केल्याबरोबर चित्र एकदम का पालटते ?

¤

कारण बौद्ध झाला तरी हरिजन समाज भारतीय परंपरेपासून तुटून अलग पडत नाही. मुस्लिम किंवा ख्रिश्चन झाल्यावर मात्र तो भिन्न परंपरेचा अभिमानी होतो व त्याचे राष्ट्रीयत्वच बदलते. याचा अर्थ स्वतःला प्रथम भारतीय मानणारे न्या. छगला, रफी अहमद किडवाई किंवा बॅ. अंतुले मुस्लिम समाजात निर्माण होत नाहीत असा नाही. बॅ. अंतुले निखालसपणे शिवाजीला आपला पूर्वज *मानतात व मीनाक्षी-*पुरम्‌सारखे धर्मांतर देशाला हानीकारक, धोकादायक आहे असे स्वच्छपणे सांगतात, तेव्हा त्याच्या मुस्लिम असण्या-नसण्याचा काही प्रश्नच उत्पन्न होत नाही; पण असे अपवाद मुस्लिम समाजात फारच थोडे आढळतात. बहुसंख्य मुसलमान क्रिकेट मॅचमध्ये पाकिस्तानचा विजय झाल्यावर फटाके वाजवणारेच असतात. पूर्वीपासून ही वस्तुस्थिती हिंदुत्ववादी सांगत आलेले आहेत व अलीकडे, हमीद दलवाई प्रभृतींनी ती सांगायला सुरुवात केल्यानंतर समाजवादी–काँग्रेसवादी जनाना ती मान्य करण्यावाचून गत्यंतरच उरले नाही. राष्ट्र सेवा दल पत्रिकेच्या १९६७ च्या दिवाळी अंकात हमीद दलवाई यांचा 'भारतीय मुसलमानाचे अंतरंग' या नावाचा एक लेख आहे. या लेखात व त्यानंतर अनेक व्याख्यानांतून हमीद दलवाईंनी मुसलमानांच्या पाकिस्तानधार्जिणेपणाची स्पष्ट जाणीव आपल्याला करून दिलेली आहे. या लेखात त्यांनी म्हटले आहे– "अलीगढ विश्वविद्यालयाच्या एका प्राध्यापकाने माझ्याशी बोलताना क्युबेकमधील वाढलेल्या फ्रेंच लोकसंख्येचे उदाहरण देऊन भारतातील 'मुसलमानांनाही क्युबेकमधील फ्रेंचांप्रमाणे आपल्याला भारतात आणखी एक स्वतंत्र भूमी निर्माण करता येईल!' हे काढलेले उद्गार मुस्लिम मनोवृत्तीचे यथार्थ दर्शन घडवतात. (क्युबेकमधील फ्रेंच कॅथॉलिक आहेत. इंग्रजी कॅनेडियन प्रॉटेस्टंट असल्या-


## साप्ताहिक माणूस

वर्ष : एकविसावे

अंक : पंधरावा

१२ सप्टेंबर १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

मुळे ते कुटुंबनियोजन करतात. कॅथॉलिकांनी कुटुंबनियोजन न केल्यामुळे गेल्या ७५ वर्षात त्यांनी आपली लोकसंख्या वाढविली असे या प्राध्यापकमहाशयाना सागायचे होते.)" दहापैकी नऊ मुसलमानांच्या मनात अशा प्रकारची आणखी पाकिस्ताने निर्माण करण्याची भावना असते, असेही या लेखात हमीद दलवाईंनी म्हटलेले आहे. ही वस्तुस्थिती असल्याने मीनाक्षीपुरम्‌चे धर्मांतर हे राष्ट्रांतर ठरते व पुण्यात, स्वतःला हिंदू म्हणवून घेण्यास लाजणाऱ्या समाजवाद्यांनाही,या घटनेवर चर्चा घडवण्यासाठी,एखादा परिसंवाद आयोजित करावासा वाटतो. हे जर पन्नास वर्षांपूर्वी समाजवादी-कांग्रेसवादी जनांना जाणवले असते तर पाकिस्तान झालेच नसते; पाकिस्तान होऊनही मुस्लिमाच्या राष्ट्रीयत्वाचा प्रश्न सुटलेला नाहीच. तो होता तिथेच आहे. फक्त हिंदू समाजात अधिक जागृती झालेली आहे व सावरकर-गोळवलकर पूर्वी इतके आज अस्पृश्य राहिलेले नाहीत. शब्द 'हिंदू' ठेवा किंवा 'भारतीय' असू द्या. उद्या भारतीयत्वाची व्याख्या करण्याचा प्रयत्न झाल्यास 'समान भारतीय परंपरेचा वारसदार तो भारतीय' असेच ठरवावे लागेल. शेवटी राष्ट्रीयत्व म्हणजे तरी काय ? एकत्वाची अखंड जाणीव. अशी जाणीव समान परंपरेच्या मान्यतेवाचून सहसा निर्माण होत नाही. ज्या वेळी व्यास-वाल्मिकी, रामकृष्ण-शिवाजी यांना येथील मुसलमान आपलेसे मानतील, हा ऐतिहासिक वारसा स्वीकारायला तयार होतील, जीनांपेक्षा नेहरू त्याना जवळचे वाटतील, तेव्हा मीनाक्षीपुरम्‌सारखी एखादी घटना इतकी खळबळ माजवू शकणार नाही. तेही एक पथांतर ठरेल, जसे आंबेडकरांचे बौद्ध होणे ठरले, ठरत आहे, तसे. फक्त तो दिवस अद्याप खूप लांब आहे हेही विसरून चालणार नाही. □

इस्लामधर्मातही भरपूर विषमता आहे. समतेच्या अपेक्षेने जे हरिजन-दलित या धर्मात जातील त्यांचा भ्रमनिरासच होण्याची शक्यता अधिक आहे. मीनाक्षीपुरम्‌ला धर्मांतरित झालेल्या स्त्रियांना लगेच बुरखे पुरविण्यात आले. नमाज पढण्याच्या वेळी सगळे समान असतील, पण व्यवहारात उच्चनीचभाव, विषमता इस्लाम धर्मातही यथेच्छ पाळली जाते. आर्थिक व सामाजिक समता हे नवेच मूल्य आहे व समाजवादी तत्त्वज्ञानामुळे ते विसाव्या शतकात मान्यता पावत आहे. सगळ्याच जुन्या धर्मात कमीजास्त प्रमाणात, निरनिराळ्या स्वरूपात विषमता असणार हे गृहीत धरायला हवे. केवळ हिंदुधर्मालाच वेगळे काढून झोडपण्याचे आपल्याकडच्या डाव्यांचे प्रयत्न अज्ञानमूलक आहेत तामीळनाडूत गेली पन्नास-पाउणशे वर्षे रामस्वामी नायकर व त्यांची द्रविड मुन्नेत्र चळवळ हिंदू धर्मावरच फक्त आघात करीत राहिली. मुसलमान-ख्रिश्चनांनी केली नसेल एवढी हिंदुधर्मीय देवदेवतांची विटंबना या नायकर चळवळीने खुद्द मद्रास शहरात केली. डी. एम्. के. उदयानंतर तर सर्व सत्तास्थानावरून तथाकथित उच्चवर्णीय हिंदू पार हुसकले-हाकलले गेलेले आहेत. याच तामीळनाडूत, हिंदू निर्मूलक द्रविड राज्यात हरिजनांचे हाल चालू राहावेत, त्यांना इस्लामधर्म स्वीकारावासा वाटावा, हा केवळ हिंदूविरोधी चळवळीचा वास्तविक केवढा पराभव आहे ! तेव्हा हिंदुत्वाला झोडपून प्रश्न सुटणार नाही. सगळ्यांनीच विषमतेचे आविष्कार पुसून टाकण्यासाठी प्रामाणिक धडपड केली पाहिजे. या धडपडीवर समजा हरिजनांचा, दलितांचा विश्वासच बसत नसेल तर बळजबरीने, आर्थिक लालूच दाखवून वगैरे त्यांना हिंदुधर्मात ठेवण्याचा आग्रह मात्र अजिबात धरू नये. दलितांनी इस्लामधर्म स्वीकारल्यावर ते अधिक आक्रमक होतील याचीही भीती बाळगण्याचे काही कारण नाही. एक काळ असा होता की, निम्मा-पाऊण हिंदुस्थान मुसलमानांच्या ताब्यात होता. तोही हिंदूंनी मुक्त केलाच. मुस्लिम प्रश्नावर शिवाजी हाच तोडगा आहे. गांधीजी नव्हेत. शिवाय आता तर परधर्मात गेलेल्या अनेकांना हिंदुधर्मात परत घेणारी शुद्धी चळवळही अस्तित्वात आहे. पन्नास वर्षांपूर्वी लाखोंनी हरिजन इस्लाम धर्मात गेले. या सगळ्यांना परत हिंदूधर्मात आणणारा श्रद्धानंद उद्या पुन्हा निर्माण होणार नाही कशावरून ? म्हणून कायद्याने धर्मांतराला बंदी घालण्याची सध्यातरी आवश्यकता नाही. प्रचलित कायद्यांची अंमलबजावणी नीट झाली तरी सक्तीने, धाकधपटशाने होणारे धर्मांतर थांबवता येईल. पैशाच्या लोभाने किंवा इतर काही फायदे मिळतात म्हणून जे मुस्लिमधर्मात जाऊ इच्छितात त्यांना व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही एकदा मान्य केल्यावर कोण कसे अडवू शकणार ? पैशाच्या, जहागिरीच्या लोभाने राज्येही आपण पूर्वी घालवली आहेत. मोगल सम्राटांना आपल्या मुली देणारे दलित थोडेच होते ? तेव्हा कायद्याने धर्मांतर थांबविणे शक्य व योग्यही ठरणार नाही. शुद्धीकरणाची चळवळ चालू राहिली तर मुसलमानातील निदान जाणकारांना तरी हा सगळाच खटाटोप निरर्थक वाटू लागण्याचीही शक्यता आहे. आजच औरंगाबादेतील काही सुज्ञ मुस्लिम व्यक्तींनी, आर्थिक-राजकीय लाभासाठी मुस्लिम धर्मात येणारे, उद्या अधिक लाभ मिळाले तर परत हिंदू किंवा इतर धर्मात कशावरून जाणार नाहीत, अशी रास्त शंका उपस्थित करून, या पद्धतीच्या धर्मांतराविषयी प्रतिकूल मत नोंदवले आहे. नव्याने जे हरिजन-दलित मुस्लिम होत आहेत त्याच्यापैकी बरेचजण सुंता करून घ्यायला तयार नसतात. अशा, सुंता न करता आलेल्यांना,कर्मठ, जुने मुसलमान बरोबरीच्या नात्याने कसे वागवतील ? मदुराईजवळच्या मेलाकोट्टाई येथे जुन्याना, नव्या धर्मांतरितांनी आपल्याबरोबर मशिदीमध्ये नमाज पढणेही पसंत नव्हते. चक्क बाचाबाची झाली व जुन्यांना व नव्यांना नमाजाच्या वेगवेगळ्या वेळा ठरवून द्याव्या लागल्या. तेव्हा इस्लामची दारेही हरिजन-दलितांसाठी सताड उघडी आहेत व आत गेल्यावरसुद्धा समतेचे नंदनवन अगदी वाट पहाते आहे,असे समजण्याचे कारण नाही. मुस्लिमधर्मातही अनेक सूज्ञ व्यक्ती अशा असतील, की ज्यांना अशा तऱ्हेने होणारे धर्मांतर पसंत नसेल. अशांची मदत घेऊन ही मीनाक्षीपुरम्‌ची लाट थोपवता आली तर नेहमीचा हिंदू-मुस्लिम कटुतेचा प्रश्नही उद्भवणार नाही. हिंदू, मुस्लिम व ख्रिस्ती या सर्व धर्मातील सूज्ञ व विवेकी मंडळींनी, राष्ट्रवादी दृष्टिकोनातून संयुक्तपणे असा प्रयत्न करणे केव्हाही श्रेयस्करच ठरणार आहे !

## तेजस्वी विश्वधर्म

हिंदुधर्म हा विश्वधर्म आहे असे हिंदुधर्माचे थोर प्रवक्ते नेहमी सागत असतात आणि ते बरोबरही आहे. हिंदुधर्म हा समुद्रासारखा आहे व इतर धर्म हे नद्यासारखे आहेत असे

विनोबांनी म्हटले आहे. हिंदुत्वातला हा वैश्विक गाभा विचारातून, आचारातून प्रकट होत राहील हे पाहण्याची जबाबदारीही ओघाने हिंदुत्वाभिमान्याकडे येते. तात्कालिक आक्रमणे परतवून लावत असताना या मूळ गाभ्याला धक्का लागू देता उपयोगी नाही. मुस्लिम मनोवृत्तीचे हिंदू तयार होणे हा काही हिंदुत्ववादाचा अंतिम विजय नव्हे. सगळ्या पंथोपपंथांना सामावून घेण्याइतका हा हिंदुत्वाचा समुद्र विशाल व व्यापक असायला हवा. एका उदार जीवनदृष्टीचा परिपोष या धर्मामुळे होत राहावा. केवळ सहिष्णुता, केवळ सर्वधर्मसमभाव एवढेच पुरेसे नाही. सर्वधर्मसत्यभाव हे हिंदुधर्माचे अनन्यसाधारण वैशिष्ट्य आहे. ईश्वरप्राप्तीचे अनेक मार्ग असू शकतात. प्रत्येक मार्गात सत्याचा थोडा-अधिक अंश असू शकतो. अंतिम सत्य एकच असले तरी त्याचा साक्षात्कार विविध पद्धतीने होऊ शकतो, हे ज्ञानाचे उच्च शिखर आजवर फक्त हिंदुधर्म — तत्त्वज्ञानांनीच गाठले आहे. एक पुस्तक — एक प्रेषित, एक मार्ग, याचा अट्टाहास हिंदुधर्माला मंजूरच नाही. ही वैश्विक व सर्वसमावेशक दृष्टी तात्कालिक चळवळींच्या गदारोळात लुप्त झाली तर जतन करण्यासारखे हिंदु धर्मात काही उरणार नाही. हिंदू शरीरे फक्त विस्तारून काय उपयोग ! शरीरे हवीत ती आत्मा प्रकट व्हावा म्हणून. धर्मांतराच्या प्रश्नाकडेही तात्त्विकदृष्ट्या हिंदू माणूस कसा पाहत असतो ? गोळवलकर गुरूजींनी आपल्या 'विचारधन' पुस्तकात शंकराचार्यांचेच उदाहरण 'आदर्श' म्हणून दिले आहे. गोळवलकरगुरूजी म्हणतात: "आमच्या धर्माच्या आणि तत्त्वज्ञानाच्या शिकवणुकीनुसार हिंदू व मुसलमान दोघे सारखेच आहेत. अंतिम ईश्वरी सत्याचा साक्षात्कार हिंदूलाच होऊ शकतो असे नाही. आपापल्या मतानुसार परमेश्वराकडे जाणाचा मार्ग अनुसरण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. मी शृंगेरीमठाचे माजी शंकराचार्य श्रीमद् चंद्रशेखर भारतीस्वामी याचे एक उदाहरण सांगतो. एकदा एक अमेरिकन मनुष्य त्यांच्याकडे आला व 'मला हिंदू करून घ्या !' अशी त्याने विनंती केली. शंकराचार्यांनी त्याला विचारले, 'तुम्हाला हिंदू व्हावे असे का वाटते ?' तो म्हणाला, 'ख्रिस्ती धर्माने माझे समाधान झाले नाही, माझी आध्यात्मिक भूक शमली नाही.' यावर शंकराचार्य म्हणाले, 'आपण ख्रिस्ती धर्माचे खरोखरच प्रामाणिकपणे पालन केले आहे काय ? प्रथम तसा प्रयत्न करून पहा. इतके करूनही तुमचे समाधान झाले नाही, तर मग माझ्याकडे अवश्य या !' आमचा दृष्टिकोन हा असा आहे. इतरांना आपल्या धर्मात ओढण्याचा प्रकार हिंदूधर्माला मान्य नाही. धर्मांतर हे प्राय: राजकीय वा तत्सम अन्य लाभाच्या हेतूने करण्यात येते. आम्ही ते निषिद्ध मानतो. आम्ही म्हणतो, सत्य हे असे आहे, पटत असेल तर त्या मार्गाने चला !" (विचारधन, दुसरी आवृत्ती, पृष्ठ ४४१) ही अशी हिंदूधर्माच्या गाभ्याची धारणा असल्याने एखाद्या संप्रदायात तो बद्ध करून त्याला संकुचित करणे किंवा केवळ तात्कालिक, क्रिया – प्रतिक्रियात्मक पातळीवर त्याचा विचार करणे उचित नाही. पूर्वीसारखी उदासीनता, न्यूनगंडही नको. खोटा, पोकळ अहंभाव आणि दुरभिमानही नको. समुद्राने महासमुद्र व्हावे. नद्या पुष्कळ आहेत ! □

मुंबई वार्ता

# व्ही. टी. समोरील दोन स्टॉल्स

मुंबईतलं खाद्यजीवन आणि खाद्यसंस्था हा अभ्यासाचा एक स्वतंत्र विषय आहे. तशी आकडेवारी उपलब्ध आहे की नाही मला माहीत नाही; पण बहुधा नसावी; की मुंबईत रोज किती कप चहा होतो, किती बटाटेवड्यांच्या वेदीवर आपली जान कुर्बान करतात आणि किती डोसे तव्याच्या काळजात चुर्र करतात ! एक काळ असा होता की, उडपी वडा-इडलीनं संपूर्ण मुंबईच्या उदरभरणाचा ठेकाच घेतला होता. भालचंद्र नेमाडयांच्या 'बिढार' मधल्या चागदेव पाटलाची अख्खी पिढीच्यापिढी मसाला डोश्यावर पोसलेली होती.

पण फॅशन, बदल हा तर मुंबईचा आत्मा ! यात वागण्या–बोलण्याची, कपड्यांची फॅशन आली, तसा खाण्या–पिण्यातला चोखंदळपणाही आला. पुणेकर काय, वर्षानुवर्षं त्याच त्या 'रुपाली' मध्ये नाही तर पी. सी. एच.ला जातात; पण मुंबईत असं नाही ! (चूकभूल वगैरे काय असेल ती वाचकांनी आपसात देऊन–घेऊन टाकावी. 'वाचकांची पत्रे' वगैरेची आवश्यकता नाही !) सध्या उडपी रसम्–सांबारम्चे भाव डाउन आहेत आणि खाद्यजीवनात एक नवी 'फेज' आली आहे. पाव-भाजी आणि झुणका-भाकर !

ऑफिसला जाण्याच्या टापटीप आणि आटोपशीर गडबडीत तुम्ही मुंबईला या किंवा पाऽर लांबनं गावावरनं ट्रंका-वळकट्या घेऊन हितं उतरा. व्ही. टी. स्टेशनातून महापालिकेच्या इमारतीला सामोरं ठेवून बाहेर पडलात की, दिसतील दोन रस्त्यांपलीकडच्या पाव–भाजीच्या गाड्या, त्यांचे खमंग वास आणि तव्यावर कालथे आपटून सतत चाललेला त्यांचा ठणठणाट. या दृश्यात एकदम उठून दिसणारे दोन स्टॉल्स. एक झुणका–भाकरकेंद्र आणि एक जय जवान स्टॉल !

झुणका-भाकर-केंद्र निघालं १९७७ साली. बशीभर झुणका आणि जाडसर भाकरी. ७७ साली याची किंमत पन्नास पैसे होती आणि अजूनही ती तेवढीच आहे. खाद्यपदार्थांच्या वाढत्या किंमती या पुष्कळशा सिंहाच्या गुहेत जाणाऱ्या पावलांसारख्या 'वन–वे' असतात. एकदा चढल्या की चढल्याच ! मग कच्च्या मालाच्या किंमती कमी झाल्या तरी परत उतरणं वगैरे प्रकार नाही ! स्टॉलचं दुसरं वैशिष्ट्य असं की, पन्नास पैशात पोट भरेल इतपत खाणं दुसरीकडे कुठे मिळणार ? निदान मुंबईत तरी ते शक्य नाही. पंधरा–वीस पैशाला एके काळी मिळणारा वडा–पाव आज साठ पैशावर पोचला आहे आणि तोही कष्टकऱ्यांच्या श्रमांना पुरेसा नव्हेच. तेव्हा झुणका–भाकर म्हणजे गरिबासाठी खरोखरचं पूर्ण ब्रह्म !

ही सगळी पार्श्वभूमी ध्यानात ठेवून मी बादलभय्याला भेटायला गेले. गेली तीन

वर्षं या स्टॉलचा मॅनेजर म्हणून तो काम करतो आहे स्टॉलच्या सुख–दुःखाशी तो एवढा समरस झाला आहे की, स्टॉलच्या वाटचालीतले बारीक-सारीक तपशीलही त्याला व्यक्तिगत आयुष्यासारखे मुखोद्‌गत आहेत. हा स्टॉल चालवला जातो झुणकाभाकर ट्रस्टतर्फे. मनोहर जोशी, सुधीर जोशी, डॉ. पै आणि कोकणे हे त्याचे चार ट्रस्टी. व्ही. टी. स्टेशनसमोरची ही जागा अशी काही मोक्याची आहे की, चतुर धंदेवाइकाच्या हाती पडली तर त्याची जन्मभरची लॉटरी लागेल; म्हणून तर अधिक खबरदारी घ्यायला हवी की जागेचा दुरुपयोग होणार नाही. झुणका–भाकर स्टॉल चालतो तो ना नफा ना तोटा तत्त्वावर! स्टॉलमधून कमावलेला नफा परत स्टॉलच्याच सुधारणेसाठी गुतवला जातो.

स्टॉलभोवतीचं वातावरण फार मोठं उत्साहजनक आहे असं मात्र नाही. कमी किमतीत गरिबाना काही सकस अन्न मिळत असेल तर उत्तमच! पण अस्वच्छतेचा हा 'नेसेसरी इव्हिल' त्याबरोबर यायलाच हवा का? पुष्कळ दिवसांपासून सतावणारा प्रश्न मी विचारून टाकला; पण हा स्टॉल म्हणजे काही बंदिस्त हॉटेल नाही. तेव्हा स्टॉलचा परिसर स्वच्छ राखायची जबाबदारी तिथल्या कामगारांची, तेवढीच गिऱ्हाइकाची. सुरुवातीला स्टॉलचं गिऱ्हाईक साधारण हजार-बाराशे. आज ते सुमारे अडीच–तीन हजारावर पोचलं आहे. याच्यातले किती लोक स्टॉलच्या मागच्या बाजूला,पाण्याच्या साठ्यापर्यंत जाऊन हात धुण्याचे कष्ट करतात? टाइल्स बसवण्याची त्याची योजना आहेच; पण बादलभय्याची चिंता निराळ्याच गोष्टीसाठी आहे. पाव–भाजी ही आज फॅशन झाली आहे. तस करायचं ठरवलं तर झुणका-भाकरही महागडं, मांड खाणं व्हायला वेळ लागणार नाही; पण स्टॉलचा मुळी तो उद्देशच नाही. किमती तर दर दिवशी वाढतातच आहेत; पण पन्नास पैशाची झुणका–भाकरी चाळीस पैशांवर कशी आणावी, या खटपटीत स्टॉलवाले गुतले आहेत.

स्टॉलच्या स्वच्छतेची आणि तिथल्या अन्नाच्या शुद्धतेची ग्वाही महापालिकेच्या प्रमाणपत्रात आहे, तशी येणाऱ्या गिऱ्हाइकातही आहे. टाइम्समधले पत्रकार, महापालिकेचे कर्मचारी, अगदी म्युनिसिपल कौन्सिलर्ससुद्धा–यांची मधली वेळ इथून भागते. गंमत पहा हं. विधानसभेचं अधिवेशन सुरू झालं की, मोर्च्यांचा पूर येतो. रोज ।नदान एका तरी मोर्च्याची हजेरी असतेच. या मोर्चांची पुष्कळ बरी-वाईट चर्चा होते. त्यांच्या उद्देश आणि यशाबद्दल उलटसुलट निष्कर्षही निघत असतात; पण झुणकाभाकर स्टॉलला मोर्च्यांचा जो अर्थ माहीत आहे त्याप्रमाणे, मोर्चा म्हणजे दणकून धंदा! वेळेला स्टॉलला दहा दहा हजार भाकऱ्यांची ऑर्डरही मिळालेली आहे आणि वेळप्रसंगी बाहेरची माणसं लावून त्यानी ती पूर्णही केलेली आहे. सव्वा रुपयात सकस, चौरस राइसप्लेट द्यायची ही एक नवी योजना! स्टॉलचं सर्वांत मोठं वैशिष्ट्य हे की, खऱ्या अर्थानं श्रमिकांनी श्रमिकांसाठीच तो चालवलेला आहे.

## दांडगी हौस

झुणका–भाकरीच्या पलीकडचा पाव–भाजीचा जयजवान स्टॉलही काही कमी वैशिष्ट्यपूर्ण नाही. मुंबईत एकूण ४८ जय जवान स्टॉल्स आहेत. त्यातला हा एक महत्त्वाचा. इथलं गिऱ्हाईक थोडं सोफिस्टिकेटेड. स्टॉलमध्ये ठेवलेलं एखादं भलं मोठं पुष्पपात्र. वरती टांगलेले पांढरे-हिरवे पातीचे कांदे, जांभळ्या रंगाची वांगी, हिरव्या पळसाच्या पत्रावळी, त्यावरची खमंग ब्राउन भाजी, हिरवी कोथिंबीर, फिकट पिवळी लोण्याची चीप, पांढरा कांदा, पिवळी जर्द लिंबाची फोड. 'अहो, माणूस आधी खातो डोळ्यांनी.हाता-तोंडाची गाठ पडते ती मागाहून. तेव्हा गिऱ्हाइकाच्या डोळ्यांना सुख मिळावं हा माझा आवर्जून कटाक्ष असतो!' जय जवान स्टॉलचे श्री. दांडेकर म्हणाले. स्टॉलवरचे एकूण पदार्थ आणि त्यांचं वाढपसर्विस याबद्दल त्यांची आचारसंहिता एवढी योजनाबद्ध आणि तपशीलवार आहे की, अचंबाच वाटावा. कारण केटरिंग हे काही त्यांचं क्षेत्र नव्हे. त्यांचा पराक्रम सैन्यातला; पण वयाच्या २८–२९ व्या वर्षी डिसेबल्ड होऊन दांडेकरांना सेवानिवृत्त व्हावं लागलं. सचिवालयातून निवृत्त जवानांच्या पुनर्वसनासाठी असलेल्या निधीतून त्यांना काही मदत मिळाली. थोडं बँकेचं कर्ज, थोडी स्वतःजवळची पुंजी आणि उरलेल्या उणीवा भरून काढायला 'आपण उणे नाही' हा आत्मविश्वास! निवृत्त जवान असल्याच्या आधारावर मुंबईत मोक्याच्या ठिकाणी असलेली ही जागा मिळाली. आता पुढे काय करायचं? ही गोष्ट १९७५ सालची. मराठी माणसाचं आणि धंद्याचं केवढं सख्य आहे हे तर जगजाहीरच आहे. शिवाय कमी भांडवलात चालणारे धंदे तसे दोनच. एक न्हाव्याचा आणि दुसरा हॉटेलचा. तेव्हा वगळापेक्षा बरी म्हणून ही वीट निवडली! हौस तर दांडगी. आपला स्टॉल बाकीच्या बेकायदेशीरपणे उभ्या रहाणाऱ्या गाड्यापासून काही निराळा दिसला पाहिजे. तेव्हा खूप कल्पकता लढवून स्टॉलची रचना ठरवली. त्यासाठी सिपोरेक्सशी बोलणी केली; पण कामगारांनी येऊन स्टॉल उभा करायचा आणि त्यांची पाठ वळते ना वळते तोच महापालिकेच्या माणसांनी काही तरी उणीवा काढून तो पाडायचा; हा प्रकार एकदा नाही, दोनदा नाही, तीनदा घडला! धंदा सुरू होण्याचा तर पत्ता नाहीच; पण सगळं भांडवल यातच संपलं! धंदा करू इच्छिणाऱ्यांचा हा प्रातिनिधिक अनुभव असेल का?

पण स्टॉल एकदा सुरू झाल्यावर मात्र तो चालायलाच काय, चांगला पळायला लागला! सुरुवातीच्या काळात कष्ट मात्र अपरंपार केले. स्टॉलला तेव्हा आजूबाजूला दरवाजे किंवा रोलिंग शटर्स नव्हती. रात्री दोन-अडीचला स्टॉल बंद व्हायचा. आवराआवर केली की, दिवसभरची खाण्याची काउंटर्स रात्री शय्या बनायची! शेताच्या राखणीला रात्री शेतातच झोपावं, तसा हा प्रकार. वर्षभर दांडेकरांनी स्टॉलची अशी राखण केली.

धंद्याची खुबी मात्र त्याना बरोबर सापडली आहे. कोल्ड ड्रिंक्सकडून बटाटेवडा, तिथून पुढे सामोसा आणि ७७ सालापासून फक्त पाव-भाजी या 'जयजवान'च्या वाटचालीतल्या ठळक खुणा. टाटा किंवा गोदरेजनं नवं प्रॉडक्ट विक्रीला काढावं तशा तोलामोलाची तयारी दांडेकरांनी या सर्व वेळांना केली. ७७ साली पाव-भाजी सुरू केली, तेव्हाची गोष्ट. क्रिकेट मॅचसाठी तेव्हा इंग्लंडचा संघ भारतात आला होता. मुंबईकराना क्रिकेट म्हणजे जीव की प्राण! या संधीचा दांडेकरानी बरोबर फायदा उठवला. सगळा स्टॉल, भाडी, तवे सगळं घासून-पुसून चकचकीत केलं. नुसतं अडीच-तीन किलो बटर तव्यावर वितळत ठेवलं. ही झाली डोळ्यांना मेजवानी. नाकाला सुखावणारा पाव-भाजीचा वास. जोडीला रेडिओवरून लावलेली कॉमेंट्री, म्हणजे एकूण तीन ज्ञानेन्द्रियाना मेजवानी! पाव-भाजीचं उद्‌घाटन असं शानदार झालं.

'आपलं धोरण असं की, गिऱ्हाइकाकडून पैसे व्यवस्थित घ्यायचे; पण त्या मोबदल्यात त्याला समाधानही भरपूर द्यायचं. गिऱ्हाइकाच्या आरोग्याची, स्वच्छतेची काळजी मूलभूत महत्त्वाची. म्हणून मी स्टॉलवर बशा वगैरे वापरत नाही. सरळ पत्रावळी, खा आणि फेकून द्या! उघड्यावर मांडलेला

स्टॉल, कुणीही येईल इथे खायला. बशा वगैरे नीट विसळल्या गेल्या नाहीत तर ? म्हणून पत्रावळी सोयीच्या आणि स्वच्छ ! थोडं महाग पडतं खरं; पण काही हरकत नाही. मुंबईत आज साधारण १५०० गाड्या आहेत. जवळजवळ सगळ्या बेकायदा. त्यांची ती गटारीची कडेची जागा. स्वैपाक तर कोण जाणे कसा करतात ! आमच्याकडे मात्र लिंबू, सोललेला कांदा, ताजेगरम पाव, पॅकबंद लोणी आणि घरगुती तयार केलेले मसाले. सगळं स्वच्छ आणि सकस !आरोग्याला पाव-भाजी कसं म्हणून विचाराल तर एकदम फर्स्टक्लास ! आजूबाजूच्या किती तरी हॉस्पिटल्समधले डॉक्टर्स माझे रोजचे गिऱ्हाईक आहेत. पाव-भाजीनी तुमच्या आरोग्याला किमान काही हानी होत नाही हे तरी अगदी नक्की. त्यातही आमची भाजीची चव वेळेनुसार बदलते. ऑफिसच्या वेळात माणसं येतात ती पोटभरीचं खायला, जेवायला. त्यामुळं तेव्हा आमची भाजी अगदी सौम्य असते; पण ऑफिसअवर्सनंतर माणसं खायला येतात ती बहुधा गंमत म्हणून चटक-मटक खायला. तेव्हा रात्र चढत जाते, तशी आमची भाजीही जास्ती मसालेदार होत जाते.

मध्यंतरी स्टॉलवर एक गंडांतर आलं होतं. ऑक्टोबरपर्यंतचं भाडं भरलेलं असूनही मेमध्येच महापालिकेनं स्टॉल पाडायला घेतला—पावसाळ्याचे अॅस्बेस्टॉस पत्रे वर टाकले म्हणून. स्टॉल म्हणजे एक मोठा वटवृक्षच आहे एकटा पडला तर किती तरी घरटी उजाड होतील ! मी, माझ्याबरोबरचे पंचवीस कामगार, गॅसवाला, मसालेवाला, दोन–चार बेकरीवाले, कांदा, बटाटा, टोमॅटोवाले, पत्रावळवाले, तेव्हा गिऱ्हाइकांच्या तोंडचा घास जाईल, तसा या सर्वांच्या तोंडचाही जाईल; पण माझ्या असल्या अडचणी आणि झगडे बहुधा कधीच संपायचे नाहीत. कारण मी काही पैशानं कधी कुणाचे हात ओले केले नाहीत आणि करणारही नाही ! दानधर्म केलाय आजपर्यंत साठ–सत्तर हजार. नुकतीच नऊ जवानांच्या विधवांना शिवणयंत्रं घेऊन दिली; पण पैसा आहे म्हणून तो लाच देण्यात खैरात कायं म्हणून करावा ?

'तरी पण चक्रं हालली आणि स्टॉल आपल्या कामगिरीवर रुजू झाला. काही राजकीय पक्षांनीही तसा मदतीचा हात पुढे केला होता; पण असली कर्जं दामदुपटीनं फेडावी लागतात, हे मला चांगलं माहीत आहे. त्यामुळं मी त्यांच्या फंदात पडलोच नाही'.यशस्वी व्यक्तिगत संबंध आणि झकास चव हे दांडेकराच्या स्टॉलच्या यशाचं रहस्य. अगदी जगजीवनराम, मुख्यमंत्र्यांपासून ते जितेंद्र अभिषेकी, पु. ल. देशपांडे, व. पु. काळे, दामू केंकऱ्यांसारख्या साहित्यिक–कलाकारांपर्यंत किती तरी जाने-माने त्याच्या स्टॉलला भेट देऊन गेलेत.

जय जवान स्टॉलवर पाव-भाजीला पडतात तीन रुपये; पण प्रत्येक प्लेटमध्ये आणखी दोन रुपये खर्च करावेसे तुम्हाला वाटत असले तर फोर्ट किंवा'अंधेरीच्या वाइकिकी'त तुम्हाला जावं लागेल. हे वाइकिकी काय बुवा, असं प्रश्नचिन्ह तुमच्या चेहऱ्यावर उमटेल. वाइकिकी ही अटलांटिक महासागरातली निसर्गरम्य बेटं आहेत. हौशी पर्यटकांची तिकडे नेहमी गर्दी असते. पाच रुपयांची पाव-भाजी खायला पाच हजार रुपये खर्च करून तुम्हाला ह्या वाइकिकीला जायला नको, मुंबईतल्या या रेस्टॉरंटस्मध्ये गेलात तरी चालेल ! हे दोन रुपये कशाबद्दल, असा तुम्हाला प्रश्न पडेल. तुम्ही, मी आणि हॉटेलचे व्यवस्थापक या सर्वांनी मिळून निर्माण केलेला वातावरण नावाचा जो घटक असतो, त्याबद्दल हा सरचार्ज ! वाइकिकीची सजावट एकदम मॉड. एका बाजूला खुला असणारा मोठा हॉल. लाल रंगाच्या फरशा. काळ्या रंगाचं छत आणि त्यातले काळेच पंखे. बसायला गुबगुबीत खुर्च्या वगैरे प्रस्थापित प्रकार नाहीत. चक्क लाकडाची बाकडी, सर्कशीतल्यासारखी अरुंद स्टूलं किंवा कपऱ्या बसवलेले कट्टे. हे कट्टे आणि ही बाकडी इतक्या वेगवेगळ्या लेवलस्वर, आणि त्याची रचनाही अशी की, नवनाट्याचं 'ठोकळे'बाज स्टेजच म्हणा ना ! अशा वातावरणात म्हणजे सेल्फ सर्विसच असणार. हे सांगायला नकोच. वातावरण एकदम इन्फॉर्मल.झुणका–भाकर स्टॉलवरचं कसं, तसंच इथलंही. तिथल्यासारखेच इथल्या गिऱ्हाईकाचे कपडेही विटके आणि बिनइस्त्रीचे. फक्त तिथे धोतरं आणि लेंगे, इथे मात्र जीन्स आणि कॉड्रॉय ! दोन विरोधी टोकं एकमेकांना कशी भेटतात याचं हे मजेशीर उदाहरण !

आणखी एक साम्य. खाद्यपदार्थांची कूपन्स दोन्ही ठिकाणी आधीच काढावी लागतात, त्यामुळे एकदा खाऊन झालं की, आपण काय कुणाच्या बापाचं देणं लागत नाही !

—ललिता बर्वे

# दोन समाजपद्धती

## एका तुलनेचे निष्कर्ष

वा. दा. रानडे

मार्क्सवाद आणि भांडवलशाही यापैकी कोण आज अधिक धोक्यात आहे, असा प्रश्न 'दि इकॉनॉमिस्ट' या ब्रिटिश साप्ताहिकाने २२ ऑगस्ट १९८१ च्या अंकातील संपादकीय लेखात उपस्थित केला आहे. मार्क्सवादच अधिक धोक्यात आहे, असा निष्कर्षही त्यात काढला आहे. पत्राची मते कम्युनिस्टविरोधी असली तरी त्यातले लेख केवळ प्रचारकी भूमिकेवरून लिहिलेले नसतात, तर त्यात बरीच वस्तुनिष्ठ माहिती असते. या प्रश्नाचे 'दि इकॉनॉमिस्ट' ने दिलेले उत्तर कितपत पटण्यासारखे आहे हे पाहताना त्यांचे प्रतिपादन प्रथम सूत्ररूपाने विचारात घेणे आवश्यक आहे.

आर्थिक अपयश हे राजकीय सत्तेचा पाया नष्ट करू शकते. या दशकात या अपयशाचा जास्त फटका कोणाला बसेल ? कम्युनिस्ट राष्ट्रांना की भांडवलदारी राष्ट्रांना, हा प्रश्न लेखात सुरुवातीलाच उपस्थित केला आहे. पोलंडमधील घटनांनी कम्युनिस्ट जगाला हादरा दिला आहे, तर भांडवलशाही जगतातील सर्वांत पाच मोठ्या लोकशाही देशात १९७६ पासून झालेल्या सात निवडणुकांपैकी सहा निवडणुका तेथील त्या वेळेपर्यंतच्या सत्ता प्रमुखानी हरल्या आहेत. या दशकात सर्व सत्तारूढ राजकीय नेत्यांना वाईट दिवस आहेत.

१९५० ते १९७० ही दोन दशके कम्युनिस्ट व भांडवलदार, दोन्ही जगतांना चांगली गेली; वर पंधरा वर्षांत दुप्पट याप्रमाणे भांडवलदारी देशांच्या उत्पादनात सरासरी वाढ झाली. या देशात बेकारी कामगार वर्गाच्या दोन टक्के प्रमाणात होती व चलनवाढही जवळजवळ त्याच प्रमाणात होत होती. यशाबरोबरच काही अपयशेही या दोन्ही पद्धतीच्या राष्ट्रांना सहन करावी लागली. भांडवल-

मलपृष्ठ १ वर

# उत्तरमीमांसा : २२ :

स. शि. भावे

## जे. पी. नाईक यांचे शैक्षणिक तत्त्वचिंतन आणि त्या तत्वांचे व्यावहारिक अपयश

जे. पी. नाईक गेले, प्रा. देवदत्त दाभोलकर यानी आपल्या भावपूर्ण श्रद्धांजलीत म्हटले आहे ('सकाळ' : ३१-८-८१) त्या प्रमाणे 'एक वैचारिक आणि कार्यात्मक वादळ शांत झाले !'

शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात मौलिक विचार मांडणारा विचारवंत आज काळाच्या पडद्याआड झाला आहे. शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांचे फार मोठे नुकसान झाले आहे. हे नुकसान किती आणि कसे झाले आहे हे इतक्यात ध्यानातही येणार नाही, इतके ते मोठे आहे.

शिक्षणक्षेत्रातील एक छोटा कार्यकर्ता म्हणून व्यक्तिश: माझेही त्यांच्या निधनाने नुकसान झाले आहे. 'शैक्षणिक नियोजनाची अष्टपदी' (उत्तरमीमांसा :) हा माझा लेख मी त्यांचेकडे पाठविला होता. त्यावर आपण चर्चा करू असे आश्वासनही त्यांनी मला दिले होते. आता ती चर्चा कधीच होऊ शकणार नाही. माझे हे मोठेच नुकसान आहे.

जेपीना मी माझी हार्दिक श्रद्धांजली अर्पण करतो, आणि दु:खभावनेचा आविष्कार येथेच पुरा करतो. भावनेचा अधिक आविष्कार नाईकानाही कधी आवडला नसता. नाईकांची आठवण खऱ्या अर्थाने जागविणे म्हणजे त्यांच्या शैक्षणिक कार्याची, निष्ठेची आणि व्यक्तिमत्त्वाची ओळख नव्याने पुन्हा जागविणे आज मला ही ओळख नव्याने पुन्हा जागी करायची आहे.

¤

जेपी नाइकांच्या शैक्षणिक लेखनभाषणांकडे शैक्षणिक उपक्रमांकडे मी गेली वीसएक वर्षे अंतरावरून, पण विशेष कुतूहलाने पाहत आलो आहे. स्वत:च्या मनाशी त्यांच्या कार्याचे चिंतन करीत आलो आहे,

या विचारात मला असे जाणवत गेले की, नाइकाच्या शैक्षणिक निष्ठेमध्ये बुद्धिवाद आणि गांधीवाद याचा संगम झाला आहे. आधुनिकता किंवा अद्ययावतता हे त्याचे ध्येय होते. गांधीची पद्धती हा त्याचा मार्ग होता. किंबहुना, मला अधिकाधिक असे जाणवत गेले की 'जेपी' हे खरे बुद्धिवादी होते, खरे वास्तववादी होते म्हणूनच भारतात त्यांना गांधीचा मार्गच फक्त स्वीकारार्ह वाटू शकला. कारण गांधीमार्ग हाच एक मार्ग भारताची वास्तव स्थिती लक्षात घेणारा मार्ग आहे.

भारत हा पराकोटीचा दरिद्री देश आहे. येथील ७५ टक्के माणसे अत्यंत गरीब आहेत, ही वस्तुस्थिती गांधीवादी विचारात मूलभूत वस्तुस्थिती म्हणून स्वीकारण्यात आली आहे. या निराशाजनक वस्तुस्थितीबरोबरच दुसरी एक आत्मविश्वास वाढविणारी आशादायक वस्तुस्थितीही गांधीवादी विचारसरणीने सतत ध्यानात घेतली आहे. ही वस्तुस्थिती अशी की, भारताला सुसंस्कृततेची प्राचीन आणि दीर्घ परंपरा आहे. या परंपरेने आणि मूळच्या उत्कृष्ट बुद्धिमत्तेमुळे सामान्य भारतीय नागरिक हे कोणत्याही बौद्धिक कर्तबगारीला कधीही कमी पडणार नाहीत.

गांधीनी जी 'नई तालीम' तयार केली आणि पुरस्कारिली तिला पायाभूत होती ती ही दुहेरी वस्तुस्थिती. स्वत: गांधीजीना नई तालीम हा स्वत:च्या विचाराचा सर्वोत्तम आविष्कार वाटत असे. '*जीवन–शिक्षण*' या त्यांच्या विचारात जीवन आणि शिक्षण यांची एकरूपता मान्य केली होती. जीवनातून शिक्षण आणि शिक्षणातून जीवन हा नई तालीमचा परस्पर क्रम नाइकांच्या 'अनुभवातून शिक्षण आणि शिक्षणातून अनुभव' या सूत्रात अनुस्यूत आहे. या क्रमात पुनर्रचनेचे जे तत्त्व नाइकानी मांडले ते फार महत्त्वाचे तत्त्व आहे.

माणूस हा या तत्त्वात केन्द्रीभूत आणि सर्वात महत्त्वाचा घटक मानलेला आहे. शैक्षणिक विचारात वस्तुनिष्ठतेच्या आग्रहाने पद्धतीला अवाजवी महत्त्व प्राप्त झाले आहे. शिकणारा आणि शिकवणारा या दोन माणसांपेक्षाही पद्धतीचे महत्व जास्त मानले गेले. 'पद्धती अमलात आणणारा' अशी दुय्यम भूमिका माणसाकडे सोपविली गेली. पद्धती वरचढ ठरली. माणूस पद्धतीचा गुलाम झाला.

'जेपी' नाइकांना अगदी प्रारंभापासूनच हे नको होते. कोल्हापूर संस्थानातील शिक्षणाचे नियोजन, कोल्हापूर शहराच्या विकासाचा आराखडा, मौनी विद्यापीठाची स्थापना व त्याचे संवर्धन, कोठारी कमिशनचा आणि नंतरचे अनेक अहवाल, *केंद्रीय शिक्षणखात्याचे* सल्लागार म्हणून आणि 'इंडियन कौन्सिल फॉर सोशल सायन्स रीसर्च' या संस्थेचे सदस्य-चिटणीस म्हणून आणि गेली काही वर्षे 'विद्याभारती' चे प्रमुख कार्यकर्ते म्हणून- नाइकांनी हे जे विविध कार्य गेली पन्नास वर्षे केले - त्याचे सूत्र एकच होते. ते म्हणजे 'माणूस'!

शिक्षणाने 'माणूस' पणावर संस्कार झाला पाहिजे हे नाइकाचे तत्त्व होते. त्यासाठी त्यांनी 'तुमचा विद्यार्थी कोण ते ओळखा'! ('*Identify your student*') या सूत्रावर भर दिला. 'शिक्षकाला अध्यापनासबंधी आस्था वाटली पाहिजे,' ('A teacher must have personal involvement in teaching and education') या सूत्रावर भर दिला. आणि औपचारिक चौकटीतून मोकळे होऊन शिक्षण हा एक अनौपचारिक उपक्रम व्हायला हवा, या सूत्रावर त्यांनी भर दिला.

¤

खेद याचा होतो की, शासन, नोकरशाही, *शैक्षणिक क्षेत्रातील व्यावसायिक* नेते व विचारवंत यानी 'जेपी' नाइकांचा गौरव केला; पण त्यानी निष्ठेने पुरस्कारिलेल्या तत्त्वांचा मात्र शांतपणे पराभव केला या पराभवासाठी त्यांना फारसे प्रयासही पडले नाहीत. 'प्रत्यक्ष अमलात आणण्याचे वेळी

उपेक्षा' हे नोकरशाहीचे सूत्र असते. या सूत्राने, रामदासांचा जसा पारमार्थिकांनी पराभव केला, तसा शैक्षणिक उच्चभ्रूंनी आणि शासकीय चौकटीने 'जेपी' नाइकाच्या शैक्षणिक तत्त्वांचा केला !

आपण काही उदाहरणे घेऊ.

पहिले उदाहरण शैक्षणिक माध्यमाचे घेऊ.

जर विद्यार्थी आणि शिक्षक यांचा माणूस म्हणून विचार करावयाचा तर मातृभाषा – किंवा जवळची प्रादेशिक भाषा–हे शिक्षणाचे माध्यम असावे हे अगदी स्वाभाविक व सहज सूत्र आहे. माणसाने माणसावर करावयाचे संस्कार हे मातृभाषेतूनच अस्सलपणे होऊ शकतील. म्हणून, विद्यार्थ्याची आणि शिक्षकाची एक मातृभाषा हेच शिक्षणाचे सहजप्राप्त आणि सहजसिद्ध माध्यम आहे.

पण हे उच्चभ्रूंना पटत नाही, पटलेले नाही.

मातृभाषेच्या माध्यमातून शिक्षणक्रम चालविल्याने मातृभाषा सबळ आणि समृद्ध होत असते. आपली मातृभाषा ही सबळ ज्ञानभाषा होणे या विकासात ती भाषा वापरणाऱ्या समाजाचा विकास अनुस्यूत असतो.

पण हे साधे सत्य उच्चभ्रूंना पटत नाही. त्यांची एकच हाकाटी असते : आधी मातृभाषा सबळ होऊ द्या, मग शैक्षणिक माध्यम म्हणून तिचा वापर करू. आता, माध्यम म्हणून वापराला सुरुवात झाल्याखेरीज भाषा सबळ होणार कधी आणि कशी? आणि सबळ झाली नाही की उच्चभ्रू लोक म्हणणार की बघा हे माध्यम सबळ नाही !

शैक्षणिक क्षेत्रातील सर्वात महत्त्वाचा घटक जो विद्यार्थी त्याची सद्य. परिस्थिति, त्याची कुवत, त्याची त्याची तयारी, त्याची भावनिक आणि सास्कृतिक भूक या सगळ्याची घोर उपेक्षा करून शैक्षणिक माध्यमाच्या प्रश्नाचा आज विचार होतो आहे हे उघड आहे.

विद्यार्थ्यांची अशी उपेक्षा होते याचे कारण, शैक्षणिक नोकरशाही आणि उच्चभ्रू आपल्या जुन्या सवयी सोडून नवी बांधिलकी (involvement) पत्करायला आज तयार नाहीत, हे आहे.

शिक्षणप्रसाराच्या स्वातंत्र्योत्तर उपक्रमात शैक्षणिक नेतृत्वावर दुहेरी आणि मोठी जबाबदारी पडली होती. पाश्चात्य, अद्ययावत् ज्ञान इंग्रजीतून आत्मसात् करायचे आणि मातृभाषेत ते लिहून–बोलून विद्यार्थ्यांच्या डोक्यात उतरवावयाचे. एकोणिसाव्या शतकातील विद्वानांनी केली तशी ही 'ज्ञानाच्या झिरप्यां'ची कामगिरी होती. दुर्दैव असे की, ही आव्हानात्मक जबाबदारी स्वीकारण्याला प्रस्थापित शैक्षणिक नेतृत्वाने गेली तीस वर्षे मनोमन नकारच दिला आहे. इंग्रजीतून ज्ञान घेऊन ते मराठीत वाटावयाचे आणि मराठीत ज्ञानाचा सुकाळ करावयाचा, याऐवजी, 'उच्च ज्ञानासाठी इंग्रजीच माध्यम म्हणून आवश्यक आहे', असाच घोष प्रस्थापित नेतृत्वाने गेली तीस वर्षे चालू ठेवला आहे. परिणामी, उच्च ज्ञानापासून बहुजनसमाज वंचित राहिला आहे आणि उच्च शिक्षण संशोधनाच्या क्षेत्रात आंग्ल–उच्च–वर्णीयांची मिरासदारीच आज तीस वर्षांनंतरही सुप्रतिष्ठित राहिली आहे.

याहीपेक्षा दुर्दैवाची गोष्ट अशी की, गेली तीस वर्षे शासन बहुजनसमाजाचे असूनही शासकांना मातृभाषेचे शैक्षणिक महत्त्व पटावे तसे पटलेले नाही. बहुजनसमाजातील जो धनाढ्य वर्ग आहे तो आपापल्या गावी, इंग्रजी माध्यमाची शाळा प्रभावी व्हावी या प्रयत्नात दंग आहे. प्रत्यक्ष शासनातील मंडळींना असे वाटत आहे की, आपली मुले इंग्रजी माध्यमातून शिकून उन्नत व्हावी आणि बहुजनसमाजातील उच्चभ्रू बनावी. म्हणजे इंजिनियर, डॉक्टर, आर्किटेक्ट, व्यवस्थापन कुशलकारभारी–आणि शासक वगैरे महत्त्वाची पदे भूषविण्यासाठी ही नवी पिढी उत्तम तऱ्हेने लायक होईल.

हा एक प्रकारचा 'नव–उच्चभ्रू–वाद' किंवा 'नव–ब्राह्मण्य–वाद' म्हणावा लागेल. हा नव–ब्राह्मण्य–वाद सध्या आपल्या प्रस्थापितांत आणि प्रतिष्ठितांत वेगाने मान्यता पावत आहे. असे होणे हा आपल्या समाजाच्या सर्वांगीण, समतोल प्रगतीला मोठाच धोका आहे. शैक्षणिक विचारवंतांनी हा धोका ओळखून त्यासंबंधी शैक्षणिक क्षेत्राला जागे केले पाहिजे.

◻

समाजाला जागे करण्याचा आणि 'क्लासेस' विरुद्ध 'मासेस' असा भेद निदान शिक्षणक्षेत्रातून तरी नाहीसा करण्याचा 'जेपी' नाइकांचा प्रयत्न होता. त्याचप्रमाणे इतरही सन्मान्य विचारवंतांचा असा प्रयत्न होता. शंकरराव देवांनी सुरू केलेले मासिक 'नवभारत', 'समाज–प्रबोधन–संस्था', या संस्थेचे 'समाज प्रबोधन प्रत्रिका' हे नियतकालिक, प्राज्ञपाठशाळा, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गोखले अर्थशास्त्रसंस्था, महाराष्ट्र–विज्ञान–वर्धिनी, ज्ञानप्रबोधिनी, विद्याभारती, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, कै. धनंजयराव गाडगीळ, प्रा. गोवर्धन पारेख–हे सारे संस्थांचे व व्यक्तींचे प्रयत्न जे गेल्या तीस-चाळीस वर्षांत झाले, त्यांची दिशा एकच आहे. ती म्हणजे आधुनिक देशी आणि सुसंघटित व्यक्तिमत्त्वाचा संस्कार सर्व समाजावर करून, समाजातील क्लासेस व मासेस हा भेद दूर करण्याची.

पण आज या साऱ्या प्रयत्नांकडे मागे वळून पाहिले तर निराशा होते. शासनाच्या अखत्यारीत चाललेल्या सर्वंकष शैक्षणिक प्रशासनावर या सुधारणावादी प्रयत्नांचा खराखुरा परिणाम झालेला नाही, असेच दिसून येते. सध्याचे शिक्षणसंचालक वि. वि. चिपळूणकर यांनी खास लक्ष देण्यासाठी अधिकाऱ्यांनी विशिष्ट शाळा दत्तक घ्याव्या अशी चांगली योजना आखली आहे व तिची अंमलबजावणीही सुरू आहे; पण हा एक अपवाद झाला. एरवी, अभ्यासक्रम, अध्यापन, परीक्षापद्धती, निकाल तयार करणे–या क्षेत्रात अंमल चालू आहे तो वस्तुनिष्ठ पद्धतीशाहीचाच !

शैक्षणिक अनुक्रमातील एकसंधता आणि शैक्षणिक उपक्रमातील अनौपचारिकता या 'जेपी' नाइकांच्या तत्त्वांचा बळी या वस्तुनिष्ठ पद्धतीशाहीने घेतला आहे.

◻

१०+२+३ या अनुक्रमाचे पाहू या. नंतर परीक्षापद्धतीचे पाहू.

१०–२–३ या अनुक्रमामागे पायाभूत तत्त्व होते. ते म्हणजे १० व ३ यांची एकात्म सांगड २ मध्ये घालायची. सध्याचा ११ वी व १२ वी यांचा अभ्यासक्रम आणि अध्यापनपद्धती पाहिली तर त्यात ही सांगड घालण्याची भूमिका दिसत नाही.

१ ते १० ही दहा वर्षे विद्यार्थी शिक्षकावर पूर्णपणे अवलंबून असतो, तर पदवीची

तीन वर्षे त्याने बहुतांशी स्वप्रयत्नाने अभ्यास करावा अशी अपेक्षा आहे. अर्थात, पूर्ण परावलंबनाकडून स्वप्रयत्नाकडे जाण्याची गुरुकिल्ली विद्यार्थ्याला ११–१२ या दोन वर्षांत मिळायला हवी I पण शैक्षणिक नियंत्रकाची दृष्टी अशी नसते.

ही दोन वर्षे विद्यार्थिजीवनात सर्वाधिक महत्त्वाची असतात. म्हणूनच या दोन वर्षांत शिक्षक–विद्यार्थ्यांचे एकमेकांशी प्रमाण हे अधिक सैल हवे. अध्यापनपद्धतीत अनौपचारिकपणा अधिक हवा. विद्यार्थ्यांना त्यांचे त्यांचे प्रयोग पुन्हा पुन्हा करून पाहण्याची अधिकाधिक सुविधा मिळायला हवी; पण विद्याखात्याच्या अधिकाधिक क्लिष्ट अशा नियमोपनियमांत या साऱ्या अत्यावश्यक बाबी गच्च अडकून बसतात.

नियमोपनियम महत्त्वाचे. कारण पद्धती महत्त्वाची. पद्धतीपुढे व्यक्ती दुय्यम. हीच दृष्टी शैक्षणिक व्यवस्थापनात आजही आहे.

या पद्धतीशाहीत विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, संस्था–ही सारी यंत्राप्रमाणे वागवली जातात. परिपत्रके व त्यात अखंड होणारे फेरबदल या यंत्रांनी आज्ञाधारकपणे अंमलात आणण्याची 'कारवाई' करावी, एवढीच या पद्धतीशाहीची अपेक्षा असते. ◻

परीक्षापद्धतीचे उदाहरण शेवटी घेऊ.

तत्त्वानुसार बघायचे तर परीक्षा शिकविणाऱ्या शिक्षकाने घ्यावी, हेच योग्य. १०वी, १२ वी अशा टप्प्यांना या परीक्षेत लेखी, तोंडी आणि प्रायोगिक असे तीनही भाग असणे योग्यच होईल. ही परीक्षा, विद्यार्थ्याला ज्यांनी शिकविले असे शिक्षक आणि न शिकविलेले शिक्षक अशा एका परीक्षागटाने घेणे योग्य होईल. यासाठी परीक्ष्य विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे लहान गट असणे योग्य होईल. अशा परीक्षेत परीक्षकगटाने जो निकाल दिला असेल तोच अखेरचा असणे योग्य होईल.–विद्यार्थी कोण ते ओळखणे आणि अनौपचारिकता ही 'जेपी' नाइकांची तत्त्वे मानायची तर परीक्षापद्धती अशीच अनौपचारिक, विद्यार्थ्यांच्या परिचित क्षेत्रात आणि त्याच्यातील नवनिर्माणशक्तीला वाव देणारी अशी असायला हवी.

पण आजची परीक्षापद्धती या सर्वमान्य तत्त्वांवर अवलंबून आखलेली नाही. शैक्षणिक प्रशासनात प्रतिभासंपन्न व्यक्ती नाहीत असे नाही. (स्वतः डॉ. चित्राताई नाईक या शिक्षणसंचालक होत्या.) अशा व्यक्तींना नाइकांनी पुरस्कारिलेली शैक्षणिक तत्त्वे अंमलात आणावी असेही वाटत असते; पण पद्धतीसमोर आणि पद्धतीशाहीसमोर अशा चांगल्या व्यक्तीचा नाइलाज होत असतो. माणसे पराभूत होतात. पद्धतीशाहीची विजयी घोडदौड चालूच राहते.

पद्धतीशाहीसमोर चांगल्या चांगल्या माणसांचा असा नाइलाज का व्हावा? 'जेपी' नाइकांनी या पद्धतीशाहीला हलविण्याचे, ती सैल करण्याचे, अत्यंत निष्ठापूर्वक प्रयत्न केले.

या पद्धतीशाहीने नाइकांचे कौतुक केले. त्यांच्या तत्त्वाचा शाब्दिक गौरव केला, बोलण्यात स्वीकार केला; पण प्रत्यक्ष अंमलबजावणीत मात्र आपल्या पुराण-पद्धतीचा वरचष्माच कायम ठेवला.

आज नाइकांविषयी गौरवादराची भावना मनात उचंबळत असता, ही खेदाची भावनाही तितक्याच प्रबळपणाने मनात सलते आहे.

–पद्धतीशाहीसमोर कर्तबगार व्यक्तींचाही पराभव होणे–हे अटळ म्हणावे काय? ◻

अवंतीभवती । शरद कृष्णन्

## ◻ मुख्यमंत्र्यांना बसलेला जोरदार दणका

गेले आठ-पंधरा दिवस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री अंतुले सतत पहिल्या पानाचे मानकरी ठरले आहेत. 'मुख्यमंत्री निधी' नावाने ओळखला जाणारा एक फंड राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या हातात असतो. अंतुलेजींच्या हातीही हा निधी आहे; परंतु या एकमात्र निधीतून गोर-गरिबांचे कल्याण होणे अशक्य असल्याने, अंतुलेजींनी आणखी दोन–तीन ट्रस्टस् उभे केले आणि काय आश्चर्य! या इंदिरा प्रतिभा प्रतिष्ठानला, तसेच अन्य ट्रस्टस्‌ना चारही बाजूंनी पैसे मिळू लागले. दूरदर्शनवर अंतुलेजी जेव्हा जेव्हा दिसायचे तेव्हा तेव्हा ते या प्रतिष्ठानसाठी कधी अकरा लाख, कधी पाच लाख, कधी सात लाख अशा अवाढव्य रकमांचे चेक हसतमुखाने स्वीकारताना दिसायचे. स्वाभाविकपणे प्रतिष्ठान चांगलेच बाळसे धरू लागले. या बाळसेदार बाळाबद्दल बरीच कुजबूज सुरू झाली. प्रमुख आरोप असा करण्यात आला की, ज्या प्रतिष्ठानसाठी पैसा गोळा करण्यात आला ते प्रतिष्ठान खाजगी आहे आणि थांगपत्ता लागू न देता मुख्यमंत्र्यांनी मोठमोठ्या रकमा गोळा करण्यास सुरुवात केली. या प्रतिष्ठानला पैसा उपलब्ध व्हावा म्हणून ऊस उत्पादकांकडून रकमा परस्पर कापल्या गेल्या व कारखान्यांमार्फत त्यांचा भरणा प्रतिष्ठानकडे म्हणजेच मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आला. सिमेंटप्रकरणी तर आरोपांची खैरात झडली. मुख्यमंत्र्यांनी प्रतिष्ठानसाठी पोत्यामागे चाळीस रुपये वसूल करून परवाने दिले व सिमेंट मोकळे केले असे आरोप केले गेले. स्वतः मुख्यमंत्र्यांनी सिमेंटसाठी पैसे घेतले असे कॉंग्रेस खासदारांच्या बैठकीमध्ये मान्य केले असे वृत्त एका जबाबदार वृत्तसंस्थेने दिले. बघता बघता वातावरण इतके तापले की, या प्रकरणी मुख्यमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागणार अशी भावना जनतेच्या मनात तयार झाली. मुख्यमंत्रीही तसे चांगलेच हादरले होते. घाम फुटेपर्यंत दिल्ली-मुंबई फेऱ्या सुरू होत्या. या सर्वच प्रकरणाची एवढी जाहीर वाच्यता झाल्यावर त्याचे पडसाद महाराष्ट्र विधानसभेमध्ये, तसेच संसदेमध्ये उमटणे अपरिहार्य होते. विरोधी पक्षांनी जोरदार मोर्चेबंदी केली. प्रथम राज्यसभेत आणि नंतर लोकसभेत चर्चेला मान्यता मिळाली. दरम्यान कॉंग्रेसश्रेष्ठींनी इंदिराजींचे नाव या प्रतिष्ठानसाठी न वापरण्याचे आदेश दिले. मुख्यमंत्री चांगलेच कोंडीत सापडले आहेत हे लक्षात आल्यावर त्यांच्याच एक सहकारी सौ. शालिनीताई पाटील यांनीही या प्रकरणी भाष्य केले. 'प्रतिष्ठान खाजगी असल्याने, जर देणगीदारांनी पैसे परत मागितले तर ते द्यावे लागतील' अशा अर्थाचे त्यांचे विधान

होते. भरपूर हैराण होऊन मुख्यमंत्री मुंबईस आलेले. त्यात ताईंनी हा आगलावेपणा केलेला. ते चांगलेच बिथरले ! त्यांनी आपले दोन सहकारी ताईंकडे पाठवून राजीनामा मागितला. अंतुलेजींच्या जागी कोणताही मुख्यमंत्री असता तरी त्याने हेच केले असते. ताई राजीनामा देईनात. मुख्यमंत्र्यांनी बडतर्फीचा वरवंटा फिरवून त्यांची हकालपट्टी केली ! राजकीय महत्त्वाकांक्षा अवेळी उफाळून आली त्याचे फळ ताईंना मिळाले. एक आमदार ताईंच्या बाजूने उभा राहीना की एक मंत्री त्याचे समर्थन करीना ! आपली पूर्ण गोची झाली आहे हे लक्षात आल्यावर ताईंनी दिल्लीला धाव घेतली. तेथे पत्रकारपरिषद घेऊन त्यांनी आपली भूमिका विषद केली. पंतप्रधान ५–१० मिनिटांसाठी का होईना परंतु त्यांना उपलब्ध झाल्या, एवढाच त्यांचा मोठा विजय होता.

संसदेमध्ये केंद्रीय शासन अंतुलेजींच्याबाबतीत काय धोरण स्वीकारते याकडे सगळ्याचे डोळे लागले होते. या प्रकरणी केंद्राने अंतुलेजींना पूर्ण संरक्षण दिले. केंद्राला तसे करणे भाग होते; परंतु एवढे जोरदार समर्थन मिळेल अशी विरोधकांची अपेक्षा नव्हती. लक्षवेधी सूचनेला केंद्रीय अर्थमंत्री आर्. वेंकटरामन यांनी उत्तर दिले. जेवढे आरोप करण्यात आले त्या प्रत्येक आरोपाचे त्यांनी खंडन केले. मुख्य आरोप सिमेंट देऊन जादा पैसे घेतल्याचा होता. त्याबाबत अर्थमंत्र्यांनी आकडेवारीच देऊन हा आरोप किती बिनबुडाचा आहे हे सिद्ध केले. मंत्रालयाने ४६२ व्यक्ती व संस्थांना सिमेंट परवाने दिले आहेत. त्यांपैकी फक्त १२ जणांनी प्रतिष्ठानला देणग्या दिल्या आहेत. एकूण दिल्या गेलेल्या परवान्यांच्या तुलनेत हे प्रमाण नगण्यच म्हणावे लागेल. प्रतिष्ठानला इंदिराजींचे नाव त्यांच्या संमतीने दिले गेले का ? तसेच या प्रतिष्ठानसाठी जमवलेल्या रकमेचा वापर कशा प्रकारे होतो ? यासारख्या प्रश्नांना अर्थमंत्र्यांनी बगल दिली. त्यांनी या प्रकरणी अंतुलेजी निर्दोष असल्याचा वारंवार निर्वाळा दिला !

आपल्या राजकीय भवितव्याला सुरुंग लावण्याच्या दृष्टीनेच या साऱ्या प्रकाराचा वापर केला जातो आहे, हे लक्षात घेऊन अंतुलेजींनी जोरदार नाकेबंदी केली. अर्थमंत्र्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करून देण्यासाठी अंतुलेजी तातडीने दिल्लीला जाऊन आले. मुंबईतही त्यांनी जोरदार मोर्चेबंदी केली. शालिनीताई पाटील या महाराष्ट्र मंत्रिमंडळामधील क्रमांक दोनच्या मंत्री. त्यांच्या हकालपट्टीवर त्यांनी मंत्रिमंडळाकडून एकमुखी शिक्कामोर्तब करून घेतले. स्वपक्षीय आमदारांच्या बैठकीमध्ये एकमुखी विश्वास व्यक्त करून घेतला. आपल्या राजिनाम्याच्या बातम्या कपोलकल्पित व मूर्खपणाच्या आहेत असे भाष्य करून राजिनाम्याबाबतची चर्चा थांबवली. विधानसभेमध्ये विरोधकांनी हा प्रश्न उभा केला खरा; परंतु सभापती शरद दिघे यांनी डाळ शिजू दिली नाही. आमदार ग. प्र. प्रधानांनी इंदिरा प्रतिष्ठानच्या चौकशीचा ठराव विधानपरिषदेमध्ये मांडण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाही. कारण तेथेही सभापती रा. सु. गवई यांनी ठराव दाखल करून घेतला नाही. महाराष्ट्रात काय किंवा केंद्रात काय, विरोधक लगेच स्वस्थ बसतील असे नव्हे. ते महाराष्ट्रात राज्यपालांकडे आणि केंद्रात राष्ट्रपतींकडे धाव घेतील. सभा घेऊन वातावरण तापवतील आणि मुख्यमंत्र्यांना त्रस्त करून सोडतील !

केंद्र शासनाने अधिकृतरीत्या मुख्यमंत्र्यांचे समर्थन केले असले, तरी पक्षीय पातळीवर या गोष्टीची कॉंग्रेस श्रेष्ठींनी गंभीरपणे दखल घेतली आहे. महाराष्ट्रात आपण काहीही करू शकतो, अशा भ्रमात असलेल्या मुख्यमंत्र्यांना या प्रतिष्ठान-प्रकरणी चांगला जोरदार दणका मिळाला आहे. इंदिराजी त्यांच्या बाबतीत फारशा समाधानी नसताना हे सारे प्रकरण बाहेर यावे आणि पक्षीय पातळीवर त्याची गंभीर दखल घेतली जावी, या गोष्टीचे राजकीय परिणाम अंतुलेजींना भोगावे लागतीलच. ताईंची हकालपट्टी करून आणि त्याला इंदिराजींची मान्यता मिळवून राजकीय पातळीवर आज तरी त्यांनी सरशी संपादन केली आहे. अर्थात ताईंच्या हकालपट्टीमुळे पडद्यामागील राजकारणाला जोरदार गती येईल आणि या हालचाली जशा वाढतील तसा राजकारणाला रंग भरेल. केवळ आमदारांचा एकमुखी पाठिंबा आहे म्हणजे अंतुलेजी सुरक्षित आहेत असे नाही. पहाडियांची राजस्थानच्या मुख्यमंत्रीपदावरून हकालपट्टी झाली त्याच्या दोनच दिवस आधी राजस्थान विधानसभेच्या कॉंग्रेस पक्षीय आमदारांनी त्यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला होता. त्यानंतर केवळ ४८ तासांत त्यांना राजीनामा देण्याबाबत सांगण्यात आले. अंतुलेजींना इतक्या तडकाफडकी हलवले जाणार नाही. एक तर अशी काही पावले टाकली तर विरोधी पक्षांनी जे भ्रष्टाचाराच्या आरोपांचे मोहोळ उठवून दिले आहे, त्यामध्ये तथ्य आहे असे मानावे लागेल, आणि या आरोपाच्या दडपणामुळे अंतुलेजींना जावे लागले, असे वातावरण होऊ देणे सत्ताधारी पक्षाला परवडण्यासारखे नाही. त्यामुळे या प्रकरणी केंद्रीय नेते कितीही नाराज असले तरी याबाबत जाहीररीत्या अंतुलेविरोधी भूमिका घेणार नाहीत; परंतु या प्रकरणी आतून त्यांना समज देण्यात येईल. तसेच त्यांची प्रतिमाही या साऱ्या घटनांमुळे डागाळली गेली असल्याने, जरी ते मुख्यमंत्री म्हणून कायम राहिले तरी त्यांना जास्त जबाबदारीने काम करावे लागेल. 'मराठा लॉबी' नावाचा जो प्रकार आहे तो सारा संधिसाधू मामला आहे. अंतुलेजी या लॉबीला कितीही अप्रिय असले तरी जोपर्यंत दिल्लीचा अंतुलेजींना मजबूत पाठिंबा आहे, तोपर्यंत ही लॉबी त्यांच्या नावानेच चांगभले करत राहील. त्यांचे दिवस फिरले आणि दिल्लीची त्यांच्यावर वक्रदृष्टी झाली तर मात्र हीच मंडळी अंतुलेजी कसे नालायक आहेत याचे पुरावे फेकत त्यांना खड्ड्यात लोटून देतील. मराठा लॉबीच्या या मर्यादा अंतुलेजी ओळखून आहेत.

या साऱ्या प्रकरणांमुळे महाराष्ट्राच्या राजकारणाला एक नवी कलाटणी मिळाली आहे. या पुढील दोन–तीन महिने वातावरण ढवळून काढणारे राजकीय डावपेच खेळले जातील. एक गोष्ट मात्र नक्की की, अंतुलेजी लगोलग मुख्यमंत्रीपदावरून हलण्याचा संभव नाही आणि समजा प्रकरण फारच ताणले गेले तर केंद्रात त्यांची जास्त गरज आहे असे भासवून त्यांना केंद्रात खेचले जाईल; पण गणेशोत्सवातच अंतुलेजींचा 'गणपतीबाप्पा मोरया' होईल म्हणून डोळे लावून बसलेल्या मंडळींच्या पदरी मात्र निराशाच येईल !

# □ एशियन गेम्सबद्दल थोडेसे

नवी दिल्ली येथे पुढील वर्षीच्या अखेरीस होणाऱ्या एशियन गेम्सची जोरदार तयारी सध्या चालू आहे. या स्पर्धांना अजून जवळजवळ एक वर्षाचा अवधी असला तरी तयारीचा वेग लक्षात घेता, नियोजित वेळेपूर्वी सर्व गोष्टी पूर्ण झालेल्या असतील, असे मात्र नव्हे. अर्थात एक गोष्ट आता नक्की की, कोणत्याही परिस्थितीत या स्पर्धा आता होणारच याबाबत कोणताही संदेह नाही. स्पर्धा होणार की नाही याबाबतचा वाद मागे पडल्याने, बुटासिंग यांच्या नेतृत्वाखाली सर्व संबंधित मंडळी आता झडझडून कामाला लागली आहेत.

ऑलेंपिक गेम्सना पूरक ठरू शकतील अशा या स्पर्धा भारतीय नेतृत्वाच्या पुढाकारानेच सुरू झाल्या. आशियामधील विविध देशांमधील संपर्क वाढावा आणि तुलनेने मागे असलेल्या या खंडामधील खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे म्हणून सुरू करण्यात आलेल्या या स्पर्धेचा शुभारंभ नवी दिल्ली येथेच झाला. पहिल्या आशियाई क्रीडास्पर्धा १९५१ मध्ये नवी दिल्ली येथेच भरल्या होत्या. त्यानंतर तब्बल ३२ वर्षांनंतरच या स्पर्धा पुन्हा येथे होत असल्याने क्रीडावर्तुळामध्ये सध्या तरी तसे चैतन्याचे वातावरण आहे. सर्वसाधारणपणे दर चार वर्षांनी या क्रीडास्पर्धा घेण्यात येतात. मनिला (१९५४) टोकियो(१९५८) जकार्ता(१९६२) बँकॉक (१९६६ व ७०) तेहरान(१९७४)व पुन्हा बँकॉक(१९७८) अशा विविध ठिकाणी या स्पर्धा आतापर्यंत नियमितपणे भरवण्यात आल्या असून आता८२साली त्या नवी दिल्ली येथे भरवण्यात येत आहेत. या स्पर्धांमुळे आशियाई देशांमधील जवळीक वाढली आहे. या स्पर्धा ज्या वेळी १९५१ साली प्रथम दिल्लीत भरवण्यात आल्या, त्या वेळी पंतप्रधान नेहरू यांनी खेळाडूंनी जीवघेण्या स्पर्धेपासून दूर रहावे, खेळामधील आनंद द्यावा व घ्यावा, यशासाठी प्रयत्न करावेत; परंतु अपयशाने खचून जाऊ नये असा उपदेश केला होता. केवळ आशियाई स्पर्धेपुरतेच बोलायचे झाल्यास बहुसंख्य खेळाडूंनी आणि भाग घेणाऱ्या देशांनी हा उदार दृष्टिकोन मान्य केला असल्याचे दिसून येते. अर्थात याला अपवाद नाही असे नाही; परंतु ऑलेंपिक स्पर्धांना जशा गंभीर स्वरूपाच्या अडचणींना तोंड द्यावे लागते तशा अडचणी उद्भवलेल्या नाहीत. त्यामुळे या स्पर्धांच्या निमित्ताने आशियामधील अनेक देश परस्परांच्या जास्त जवळ आलेले दिसतात.

### वाढत्या अडचणी

आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील खेळांमध्ये जिंकणे हा प्रतिष्ठेचा विषय मानला गेल्याने, ज्यांच्याजवळ पैसा आहे असे अनेक देश खेळाडूंची गुणवत्ता सुधारावी यासाठी अवाढव्य खर्च करू लागले. खेळाडूवरील खर्च जसा वाढला तसाच स्पर्धांवर होणारा खर्चही इतका वाढला की, स्पर्धा भरवण्याची जबाबदारी घेण्यासाठी अनेक देश पुढे येईनासे झाले. या खर्चाचा बागुलबुवा करूनच चौधरी चरणसिंग यांनी, ते पंतप्रधान असताना या स्पर्धा भरवणे भारतासारख्या गरीब देशाला परवडण्यासारखे नाही, असे मत व्यक्त केले होते. त्यांच्या या वक्तव्यामुळे या स्पर्धा भरणार की नाही अशी शंका वाटू लागली होती; पण पुढे इंदिराजींचे सरकार सत्तेवर आल्यावर व त्या सरकारने या स्पर्धांबद्दल अनुकूल दृष्टिकोण स्वीकारल्याने कामास वेग आला.

१९ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर १९८२ अशा जवळजवळ तीन आठवडे या स्पर्धा चालणार असून दिल्लीबाहेरही काही स्पर्धा घेतल्या जातील. उदाहरणार्थ, जलतरणाच्या सर्व स्पर्धा पुण्याच्या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिकेच्या तलावात घेतल्या जातील. या स्पर्धेसाठी अवाढव्य खर्च जरूर येणार आहे; परंतु खर्चामुळे ज्या सुविधा उपलब्ध होणार आहेत, त्याचा लाभ खेळाडूंना पुढेही मिळणार असल्याने, या खर्चाबाबत तक्रार करता येणार नाही. १९५१ साली जेवढा खर्च करण्यात आला, त्याच्या सुमारे ३० पट जास्त खर्च करावा लागणार आहे. या टक्केवारीवरून आशियाई क्रीडास्पर्धा भरवणे किती त्रासाचे होऊन बसले आहे याची कल्पना यावी. तथापि विद्यमान सरकार या खर्चाकडे भावी काळात उपयोगी पडणारी गुंतवणूक या दृष्टीने पहात असल्याने, खर्च करण्याबाबतचे धोरण पुष्कळच शिथिल आहे. आवश्यक असलेली एकही बाब केवळ पैसा नाही म्हणून अडून दिली जाणार नाही, असे सुस्पष्ट आश्वासन पंतप्रधानांनी दिले असल्याने आर्थिक बाजूने तक्रारीस वाव नाही. तथापि, विशिष्ट वेळेमध्ये हे सर्व काम पूर्ण करायचे असल्याने कामाचा वेग सांभाळण्याबाबत संयोजकांची चांगलीच धावपळ उडत आहे.

या स्पर्धेमध्ये एकूण विविध अशा ३८ स्पर्धा आयोजित करण्यात येतील. त्यामध्ये अॅथलेटिक्सच्या सहा विभागांखेरीज अनेक सांघिक खेळांचा समावेश आहे. बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, फुटबॉल, वेटलिफ्टिंग या अन्य स्पर्धा असून बहुतेक सर्व सांघिक सामने विलक्षण चुरशीचे होतील. भारतामध्ये ज्या पहिल्या आशियायी स्पर्धा झाल्या त्यामध्ये ११ देशांनी भाग घेतला होता. पुढील वर्षी होणाऱ्या आशियायी स्पर्धेची आमंत्रणे देण्यात आली असून क्रीडाक्षेत्रात आघाडीवर असलेले आशियामधील सर्व देश या स्पर्धेत भाग घेतील अशी अपेक्षा आहे. आशियाई स्पर्धांना प्रारंभ करण्यात भारताचा मोठा वाटा असून प्रा. जी. डी. सोंधी, ए. एस. डिमेलो, टी. डी. रंगरामानुजन या क्रीडासंयोजकांनी या स्पर्धा भरवल्या जाव्यात, यासाठी केलेल्या प्रयत्नातूनच नवी दिल्ली येथील पतियाळा हाउसमध्ये १९४७ साली, 'एशियन गेम्स फेडरेशन' या संस्थेची स्थापना झाली. संस्थापक सदस्यांमध्ये अफगाणिस्थान, ब्रह्मदेश, पाकिस्तान व फिलिपाइन्स या देशांचा समावेश असून, 'एव्हर ऑनवर्डस्' या स्पर्धेचे ब्रीदवाक्य म्हणून घोषित करण्यात आले आहे. पहिल्या आशियाई स्पर्धेची क्रीडाज्योत इतिहासप्रसिद्ध लाल किल्ल्यावर सूर्यकिरणांच्या आधारे प्रज्वलित करण्यात आली. ही ज्योत आता तीन दशकांनंतर भारतामध्ये येत आहे.

या स्पर्धेसाठी प्रचंड खर्च येणार असला तरी त्यामधील मोठा भाग, तिकिटांच्या विक्रीतून गोळा होणारा पैसा, तसेच जाहिराती, टीव्हीकडून मिळणारी रक्कम याद्वारा गोळा होणाऱ्या पैशातून, एकूण खर्चाचा निम्म्याहून जास्त भाग भरून निघेल. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे आंतरराष्ट्रीय पातळीवर नावाजलेल्या खेळाडूंचा खेळ पहाण्याची संधी आपल्याकडील प्रेक्षकांना दीर्घकाळानंतर उपलब्ध होत असल्याने ७५ हजार प्रेक्षकांची सोय असलेले मुख्य स्टेडियम प्रेक्षकांनी फुलून जाईल, अशी संयोजकांची अपेक्षा आहे. एशियनच्या कार्यक्रपांना जशी वाढती पूर्वप्रसिद्धी मिळेल त्या प्रमाणात वातावरण तापेल व स्पर्धा यशस्वी होतील असा अंदाज आहे. □

अनेक प्रतिष्ठितांचे बुरखे फाडणारा, अनेकांची बिंगे बाहेर काढून त्यांची फटफजिती करणारा ना. धों. ताम्हनकरांचा सुधारक वृत्तीचा ' दाजी ' किर्लोस्कर मासिकातून १९३५ च्या सुमारास प्रथम मराठी वाचकांसमोर आला.
आज असा एखादा दाजी पुन्हा प्रकट व्हावा अशीच सध्या आपल्या अवतीभवतीची समाजस्थिती आहे.
म्हणून या दाजीच्या पुनरागमनाचे स्वागत होईल असे वाटते.
गेल्या वर्षी दिवाळी अंकातून चिं. वि. जोशी यांच्या चिमणरावांचे असेच पुनरागमन झाले होते, ते वाचकांना आवडलेही होते.
यंदा काही दिवाळी अंकांतून हा ' दाजी ' झळकण्याचा संभव आहे. त्याची ही पहिली चुणुक.
' माणूस 'च्या गेल्या दोन अंकांतून मुंबईच्या सध्याच्या कामगारजगताचे चित्र रेखाटण्यात आले आहे.
हा संदर्भ लाभल्याने ताम्हनकरांच्या दाजीचा हा नवा अवतार चालू अंकी दिला आहे.
इतर दिवाळी अंकांतून हा नवा दाजी आला तर तो आता अगदीच नवा राहणार नाही.
किंबहुना काही वाचक तरी त्याला भेटायला या पहिल्या सलामीमुळे उत्सुकही असतील.



# कामगार संपात दाजी

श्री. पु. गोखले

कारखान्यातील पाळी करून विजय घरी आला तेव्हाच तो मला थोडासा कावराबावरा दिसला. नोकरीवर जायला लागून त्याला आज आठवडा पुरा होत होता. उद्या साप्ताहिक सुट्टीचा दिवस असल्याने तो आनंदात असायला हवा होता. लहान कारखान्यातून बडया ठिकाणी प्रथम कामावर जातानाही तो बावरला नव्हता. याचे मला आश्चर्य आणि समाधान वाटत होते. आई-वडिलांना सोडून इतक्या दूर तो पूर्वी कधीच राहिलेला नव्हता. माझ्या सख्ख्या मावसबहिणीचा मुलगा असला तरी तो आमच्या घरीही पहिल्यांदाच आला होता. मोठे अन् अनोळखी गाव, अपरिचित वातावरण, नातेवाईक आणि मित्रांचा अभाव, नवे काम, नवे सहकारी अशा सर्वच गोष्टींमुळे तो थोडा-फार भांबावला असता तरीही मला काही वावगे वाटले नसते. पण पहिल्याच दिवशी त्याने चांगले काम केले होते. नव्याने नोकरीस लागलेल्या उमेदवारात विजय सर्वांत लहान होता. त्यामुळे त्यांच्या विभागाचा पर्यवेक्षकही विजयच्या कामावर खूष झाला होता. त्याने त्याला घरगुती माहिती विचारली होती. आई-बाप, भाऊ-बहिण यांची प्रेमाने चौकशी केली होती. कोण कुठे चाकरीला आहे, कोण शिकतंय हे विचारून लहान वयात दूर येण्याचे धारिष्टय दाखविल्यामुळे त्याचे कौतुक केले होते. प्रेमाने त्याच्या पाठीवर थाप मारून 'असेच चांगले काम' करण्यासाठी प्रोत्साहनही दिले होते.

दाजीने विजयला विचारले, ' उद्या सुट्टी असूनही तू बोलत का नाहीस ? आल्यापासूनच गप्प गप्प का बसला आहेत ?'

' गप्प कुठे बसलोय ?' असे विजयने म्हटले तरी ते खरे नव्हते.

दाजीने थोडेसे खोदून विचारताच त्याने कामावरील परिस्थितीविषयी बोलायला सुरुवात केली. पर्यवेक्षकाने कामाचे कौतुक केल्याचे सांगतानाही विजय आनंदी वाटत नव्हता. दाजीने तसे म्हणताच त्याने मनमोकळेपणाने म्हटले, ' माझ्याकडे जी वस्तु–आम्ही कामगार त्याला जॉब म्हणतो–करायला दिली आहे तिचे आठ तासात साधारण १८ ते २० नग तयार होऊ शकतात. पहिल्या दिवशी माझे जेमतेम ८ नग पूर्ण झाले. हळूहळू माझा कामावर हात बसला. यंत्राबद्दलही मला कल्पना आली. तिसऱ्या दिवसापासून माझा सराव वाढला. मी रोज जास्त जास्त नग पूर्ण करू लागलो. '

दाजीने मध्येच हसून सांगितले. ' अरे, असेच व्हायला हवे. तुला जसा सराव होत जाईल तसा तुझा आत्मविश्वास वाढणारच. त्याचा परिणाम होऊन तुझ्या हातून साहजिकच अधिक उत्पादन होत जाणार !'

विजय त्यावर आम्हाला म्हणाला, ' माझेही तसेच झाले आणि आज सहाव्या दिवसाचे काम संपले तेव्हा माझ्या हातून अठरा नग पूर्ण झाले होते !'

' वा, फारच छान !' आमच्या तोंडून उद्गार बाहेर पडले.

ते ऐकून केविलवाणा चेहरा करून विजय बोलला, 'काका तिथेच तर सारे बिघडले. जुने सहकारी कामगार माझ्यावर रागावले!'

'का रे बाबा! त्यांना संतापायला काय झाले?' दाजी

'मी अठरा नग पूर्ण केले ना? म्हणून त्यांना राग आला.' विजय.

दाजीलाच काय, आम्हाला कोणालाच असे करण्यात विजयचा दोष कुठे आहे ते कळेना. ते जाणून घेण्यासाठी दाजीने विचारले.

'तुझ्या हातून काम वाढत गेले त्यात त्यांचे काय बिघडले?'

विजयने उत्तर दिले, 'माझे जुने सहकारी आठ तासात केवळ दहाच नग तयार करतात. मी नवा असून अठरा म्हणजे जवळजवळ दुप्पट वस्तू पूर्ण करू लागल्याने त्या लोकांचा कामचुकारपणा उघड पडणार होता. त्या भयातून त्यांनी मला दम दिला.'

'पण तू किती काम करतोस ते इतरांना कळलेच कसे? आणि हळूहळू तुझ्या हातून जास्त उत्पादन होऊ लागले आहे हे त्या मंडळीच्या अगोदर कसे लक्षात आले नाही?' दाजीने खोलात जाऊन प्रश्न केला.

'मी नवा असल्याने मी केलेले काम पर्यवेक्षकाला दाखवावे लागत असे. त्यामुळे मी किती नग करतो हे लक्षात यायला त्यांना वेळ लागला असावा.' विजयने कारणमीमांसा सांगितली.

दाजीने त्याच्या खांद्यावर हात ठेवीत हळूच विचारले, 'त्यांनी दम दिला म्हणजे नेमके काय केले ते सांग ना!

आम्ही घरातच ही चर्चा करीत बसलो होतो तरी विजयने चहूकडे दृष्टी फिरवली. जणू जवळपास काही धोका नाही याची खात्री करून घेतल्यावर त्याने हळू आवाजात सांगण्यास सुरुवात केली.

'मी काम संपल्यानंतर कामावरचे कपडे बदलले. हात-पाय धुतले. कारखान्याच्या दरवाजातून बाहेर येत होतो. तोच माझा एक सहकारी मला हाक मारीत माझ्याजवळ आला. त्याने माझ्या खांद्यावर हात ठेवून म्हटले, 'आज किती काम केलेस?' त्याने मला असे विचारण्यात त्याचा काय हेतू असावा हे माझ्या ध्यानात आले नाही. मी नवा असलो तरी आमच्या कंपनीतल्या कामगार संघटनेत तो पदाधिकारी आहे हे मला कळले होते. मी शिकाऊ कामगार म्हणून कंपनीत नवा असल्याने मी संघटनेत जाण्याचा प्रश्न अद्याप आलेला नव्हता. का कोणास ठाऊक, पण सावधपणाने मी मोघम उत्तर दिले; 'मी नव्यानेच दिलेले काम करतोय. तेव्हा माझे काम ते किती होणार?'

'माझ्या मोघम उत्तरानेच तो चिडला. त्याने माझ्या खांद्यावरील भार वाढवीत म्हटले, 'मिस्टर. तुझी चलाखी माझ्याजवळ चालणार नाही. तू आज किती काम केलेस ते मला कळलेय. तू अद्याप बच्चा आहेस आणि शिकाऊ म्हणून लागला आहेस. अजून तुला कायम व्हायचेय. म्हणून मी काही करीत नाही. पण एक 'वॉर्निंग' देऊन ठेवतो! तू जे काम करतोयस त्याचे सारे कामगार दिवसात दहा नग पुरे करतात. साहेबाला खूष करणं तुला भाग आहे. तसे केले नाहीस तर तो चांगला रिपोर्ट करणार नाही. मग कायम व्हायला तुला अडचण पडेल. तेव्हा तू कायम होईपर्यंत बारा नग कर. आम्ही कायम कामगार दिवसात फक्त दहाच नग करतो. कारण आमच्या युनियनचे तसे ठरलेय. एरवी मालक लोक सरळ नाही व्हायचे! तू नवा आहेस तोवर तुला सवलत. कन्सेशन फक्त दोन नग जादा करण्याचे तुला दिलेय हे ध्यानात धर. यात जर बदमाशी केलीस तर माझ्याशी गाठ आहे. हात-पाय मोडून घ्यायचा नसेल तर मी काय सांगितले ते ध्यानात ठीव! उगाच साहेबावर इंप्रेशन मारायच्या फंदात पडू नकोस!'

ही हकीकत सांगत असतानाही विजय अतिशय घाबरलेला दिसत होता. त्यावरून ती दमबाजी ऐकताना त्याची कशी त्रेधा उडाली असेल हे सहज ध्यानात येत होते.

विजयला शिकाऊ कामगार म्हणूनही पगार चांगला होता. तो तीन महिन्यांच्या उमेदवारीनंतर कायम होणार होता. कायम होताच त्याला चार आकडी पगार मिळणार होता. दहावीची परीक्षा आणि एक वर्षाच्या अभ्यासानंतर मिळालेला टर्निंगचा डिप्लोमा इतक्या थोडया भांडवलावर दर महिन्याला त्याच्या खिशात सुमारे साडेअकराशे रुपये पडणार होते. वाढलेली महागाई, चलनवाढ या साऱ्याचा विचार केला तरी नोकरीच्या प्रारंभीच हा आकडा कमी आहे असे कोणाही सुज्ञ माणसाला वाटले नसते.

खासगी नाही तर राष्ट्रीकरण झालेला, कुठला का कारखाना असेना, तेथे उत्पादन व्हायलाच हवे. ते तिथल्या कामगारांनी करायलाच पाहिजे. त्या उत्पादनाचा अर्थच देशाची संपत्ती. ती संपत्ती किंवा उत्पादन जेवढे वाढेल त्या प्रमाणातच तो कारखाना संपन्न होईल. त्या कारखान्याच्या सुस्थितीवरच कामगारांचा खिसा किती गरम व्हायचा हे ठरत असते.

हे अबाधित आणि सर्वमान्य सत्य असले तरी त्या वस्तुस्थितीत आणि प्रत्यक्ष व्यवहारात फार फरक पडत होता. या फरकामुळेच सारे कूटप्रश्न निर्माण होत होते.

विजयच्या पुढे उभा राहिलेला प्रश्नही त्या अनेक समस्यांमधील एक होता. दिसायला प्रथम किरकोळ वाटली तरी ती फार बिकट परिस्थिती होती. या कारखान्यातले विजयचे सारे जीवन त्या समस्येभोवती गुरफटले होते.

विजयने प्रामाणिकपणाने आठ तासात होईल तितके काम करावे का चुकारपणाने वागावे?

त्याला आमचा सल्ला हवा होता. दाजी काहीच बोलत नव्हता. त्यामुळे मला चिंता वाटत होती. नेहमीप्रमाणे त्याने ताडकन् आपले मत व्यक्त करायला हवे होते. ते काम आज दाजी करीत नव्हता.

कोणी तरी विजयला सल्ला देणं भागच होते. मी त्याला सांगितले, 'तू बेतानेच घे. कामगार संघटनेच्या पुढाऱ्याने सांगितले तसेच वाग!'

मी हे बोलताच दाजीने मला फटकारण्याच्या आविर्भावाने म्हटले, 'म्हणजे आपण वडिलधाऱ्यांनी अप्रामाणिकपणाने वागायचा उपदेश करायचा असेच ना?'

'पुरे काम करू नकोस असे सुचवणे अप्रामाणिकपणाचे होतेय हे खरे; पण पाण्यात राहून माशांशी वैर करून चालत नाही ना? त्याला आपण काय करणार?' मी.

माझे बोलणे ऐकताच दाजी रागानेच म्हणाला, 'आणि तुम्ही व्यवहाराचे बुजगावणे पुढे करणार!' असे बोलत तो हातवारे करीत आम्ही बसलो होतो तेथून जाऊ लागला.

मी त्याला अडवीत म्हटले, 'तू मतही दिले नाहीस आणि मी व्यवहारी मार्ग सांगितला तोही तुला पसंत नाही. प्रश्न कुणाच्या पसंती नापसंतीचा नाही. विजयने उद्या कसे वागावे ते आपण सांगणे भाग आहे.'

अखेर दाजीने आपले मत व्यक्त केले, 'जीवनाचा प्रारंभच असत्य आणि फसव्या वर्तणुकीने करावा असे तुला वाटत असेल, माशाचे सोईस्कर तत्व आणि व्यवहार यांच्यामागे दडायचे असेल तर माझा तुला काहीच उपयोग होणार नाही. तुझ्या अंगी कुवत किती आहे याची मला कल्पना आलेली नाही म्हणून मी बोलत नव्हतो.'

'तुम्ही सांगा तर खरे.'–विजय.

'मला व्यवहार वगैरे कळत नाही. जीवनात तत्त्वाने वागायचे असेल त्याला कष्ट करावे लागतात. अंगावर वार झेलावे लागतात. ती तुझी तयारी आहे का ?'–दाजी.

'मला काहीच अनुभव नाही. कामचुकारपणा करणे मात्र मला पटत नाही,' विजय सांगू लागला, 'उत्तम पगार मिळत असताना जीव ओतून काम करावे असे मला वाटते.'

'शाब्बास विजय', दाजी त्याला उत्तेजन देत म्हणाला, 'तू तुझ्या पर्यवेक्षकाला सारी कल्पना दे आणि योग्य ते काम करीत जा. तू असे केलेस तर तू एकाकी पडणार नाहीस, इतकेच आत्ता मी सांगतो.'

¤

शक्य ती काळजी घेत विजय कारखान्यात कामाला जाऊ-येऊ लागला. कंपनीची बस असल्याने त्याला प्रवास करताना काळजी घेण्याचे कारण नव्हते; परंतु घरापासून बसचा थांबा येईपर्यंत आणि पुन्हा परत घरी जाताना भर रहदारीचा रस्ता असल्याने तशी भीती नव्हती. कारखान्यातली एक पाळी ११ वाजता संपत असे. दुसरी रात्री ११ ला सुरू होई. या दोन पाळयांना येता-जाताना रस्त्यावर फारशी गर्दी नसे. त्या वेळी त्याला काही दिवस मनातून भय वाटत असे. त्यामुळे तो कोणा तरी सहकाऱ्याच्या सोबतीने आपले मार्गक्रमण करीत असे. काही आठवडे कोणतीही घटना न घडताच गेले. तसा विजयचा आत्मविश्वासही वाढला आणि तो बराच निर्भय बनला.

दाजीने सुचविल्याप्रमाणे विजय आपल्याला दिलेले काम करीत होता. विजयच्या कौशल्याची परीक्षा पाहण्यासाठी कामावरचा पर्यवेक्षक त्याला सतत वेगवेगळया वस्तू करण्यास देत होता. रोज नसले तरी जवळजवळ दर आठवडयाला विजयला वेगवेगळे भाग तयार करावे लागत होते. नवे काम आले की विजय एखाददुसरा दिवस बिचकत बिचकत काम पार पाडीत होता. परंतु मन लावून काम करण्याची सवय अंगी असल्याने त्याच्या कामात सफाई दिसून येत होती. त्याने केलेल्या वस्तू सर्वच दृष्टींनी उठून दिसत होत्या. प्रत्येक वस्तूचे मोजमाप, कामाची सफाई आणि प्रत या दृष्टींनी विजयच्या हातातून गेलेल्या 'जॉब'ची कोणीही वाखाणणी करावी अशी त्याच्या हातात जादू होती.

विजयच्याच नव्हे तर नव्याने भरती केलेल्या कामगारांच्या कामावर देखरेख करून त्यांच्याविषयी प्रतिवृत्त (report) देण्यासाठी नेमलेला पर्यवेक्षक बराच वृद्ध झाला होता. त्याच कारखान्यात त्याचे काळयाचे पांढरे केस झाले होते. तोही साधा शिकावू कामगार म्हणून प्रथम नोकरीस लागला होता. तो शिकावू म्हणजे खरोखरच नव्याने शिकणारा विद्यार्थी होता. पूर्वी धंदेशिक्षणाची सोय नव्हती. तेव्हा कारखानदारच होतकरू आणि चुणचुणीत मुलांना निवडून कामावर घेत. त्यांना शिक्षण देत. आतासारखा उमेदवारीच्या काळात तेव्हा पगारही मिळत नसे. जेमतेम पोट भरण्याइतके पैसे त्यांना देण्यात येत. त्या जुन्या जमान्यात कंपनीत शिकून तयार झालेल्या मंडळीपैकी असलेला हा कामगार पर्यवेक्षकापर्यंत चढला होता. अंगच्या गुणांवर आणि चिकाटीवर त्याने आपली उन्नती करून घेतली होती. चोख काम केले तर त्याचे फळ मिळते, हे त्याने स्वतः अनुभवले होते. त्याच्या दीर्घ कारकीर्दीत त्याच्या हाताखाली हरप्रकारची माणसे येऊन गेली होती.

कारखानदारांची कोती, फुकटात नाही तर थोडक्यात काम पदरात पाडून घेण्याची वृत्ती त्याने अनुभवली होती, पाहिली होती. हळूहळू या वृत्तीची उलटापालट होत असल्याचे दृश्यही तो पाहात होता, अनुभवत होता. 'चोख काम आणि भरपूर दाम' अशा घोषणा देत त्याने कामगारांचे पुढारीपणही केले होते. आता काळ पालटला होता. कामाचा आणि दामाचा म्हणजे देण्यात येणाऱ्या पगाराचा संबंध जोडण्याचे कारण नाही, असे कामगार संघटना म्हणत होत्या. पगार, बोनस, रजा, स्वस्त दरात भोजनव्यवस्था, आरोग्यरक्षण, प्रवासासाठी रजा व सवलत अशा विविध सुविधा पदरात पडल्यानंतरही कामगार समाधानी नव्हते. त्यांच्या मागण्या आणि अपेक्षा वाढतच होत्या; पण त्याचबरोबर येणाऱ्या जबाबदाऱ्या स्वीकारण्याची कामगारांची तयारी नव्हती. या नव्या वातावरणात तो पर्यवेक्षक मनाने कुठेच बसू शकत नव्हता.

उमेदवारीचा काळ संपत येताना पर्यवेक्षकाने विजयला नोकरीत कायम करण्याची शिफारस केली. त्याचप्रमाणे त्याने दाखविलेल्या प्राविण्याबद्दल त्याला विशेष वाढ द्यावी अशीही सूचना केली. विजयविषयी चांगले मत मांडत असताना त्या पर्यवेक्षकाने शिकाऊ उमेदवार, जे कामचुकार होते, पुरेसे कुशल नव्हते त्यांच्याविरुद्ध शेरे मारून त्यांना कायम न करता काढून टाकण्याची सूचना केली.

यात त्या पर्यवेक्षकाने विशेष काहीही केलेले नव्हते. तो आपली कामगिरी–ड्यूटीच बजावीत होता.

परंतु कामगार–जगतातील दूषित वातावरणात स्वतःच्या दायित्वाची जाणीव ठेवणारे, कामाचे इमान राखणारे दोषी ठरत होते. मालकांचे 'चमचे' गणले जात होते. ती वृत्ती झाणून पाडण्यासाठीच कामगार-नेते संप, झगडे उभारीत होते.

¤

विजयच्या कारखान्यात असेच झाले. उमेदवारी करणाऱ्या आणि तात्पुरत्या कराराने नोकरीवर घेतलेल्या चुकार कामगारांना कंपनीने नोकरीवरून काढून टाकले. हे निमित्त त्या कंपनीच्या कामगार संघटनेला संप पुकारण्यास पुरेसे होते.

बरेच दिवसांत संप झाला नाही. कामगारांना संपाची सवय पाहिजे, एरवी त्यांच्यात जागृती राहणार नाही, एवढया एकाच कारणासाठी कंपनीत संप व्हायचा राहिला होता.

संघटनेने संपाची हाक दिली की, सर्व कामगारांना कामावर

उपस्थित राहणे बंद करावेच लागते. संपाची कारणे पसंत नसली तरी किंवा ती मनोमन अयोग्य वाटत असली तरी प्रत्येकाला संपात भाग घ्यावाच लागतो.

विजय कायम झाल्याचे आणि त्याला विशेष बढती दिल्याचे पत्र मिळून थोडेच दिवस झालेले होते. त्रैवार्षिक कराराची मुदत संपायला अवकाश होता. संपाची नोटीस देण्यात आलेली नव्हती. संप अचानक पुकारण्यात आला होता. विजयला तर संपावर जाण्याचे कारणच नव्हते. त्याला चांगला पगार मिळणार होता. तो नोकरीत कायम झाला होता आणि कामगारांच्या संघटनेची त्याला काही माहिती नव्हती. कोणीही त्याला सदस्यत्वही दिले नव्हते.

कामाला जावे की न जावे, असा पेच विजयपुढे उभा राहिला. काही दिवस वाट पाहून त्याने दाजीला मत विचारले. दाजीने स्पष्टपणे सांगितले, 'तू कामावर जा, मी बघतो काय होते ते!'

विजय कामावर जाण्यासाठी कारखान्यावर गेला. बाहेरील आवारात नेहमीचेच दृश्य दिसले. जिकडे तिकडे 'लाल बावटे' लावलेले होते. कामगार-एकजुटीची हाक देणारे कापडी फलक फडकत होते. एका राहुटीत दोन-चार खुर्च्या, एक टेबल, सतरंजी असा सरंजाम होता. राहुटीचा कोणीच उपयोग करीत नव्हते. कंपनीतले कामगार कारखान्याचे कुंपण सुरू होण्यापूर्वीच सहकाऱ्यांना अडवीत होते. वेडघावाकडघा घोषणा देत होते. मालकांना, अधिकाऱ्यांना शिवीगाळ करीत होते. त्यांचा वाहन अडविण्याचा प्रयत्न चालू होता. एकटादुकटा कामगार गाठून त्याला दमदाटी करण्यात येत होती. कधीमधी प्रकरण हातघाईवर येत होते.

ते क्षुब्ध वातावरण पाहून विजय अस्वस्थ झाला होता. ज्याला कामावर जायचे असेल त्याला का जाऊ देत नाहीत हे त्याच्या ध्यानात येत नव्हते; तसेच संपाचे कारणही त्याला कळत नव्हते, पटत नव्हते. थोडा वेळ तटस्थपणाने बघ्याची भूमिका घेऊन तो बाजूला उभा राहिला. हळूहळू पुढे सरकत तो फाटकातून आत शिरणार तोच एका कामगाराने त्याला मागे ओढले अन् विचारले, 'तू कोण रे? सारी मंडळी बाहेर थांबलेली दिसत नाहीत का? तू एकटाच फॅक्टरीत जाणार का?'

या प्रश्नांच्या माऱ्याने आणि ओढाताणीने विजय घाबरला. त्याला काय करावे ते कळेना. कारखान्याच्या फाटकाजवळच हा गोंधळ चालू होता. तो पाहून एक पोलीसइन्स्पेक्टर त्यांच्याकडे धावला.

तो आरक्षी अधिकारी येतो आहे असे पाहताच आतापर्यंत शौर्य गाजविणारे आणि अर्वाच्य भाषा वापरणारे शूर गडी लांब पळाले. तेव्हा हात धरून त्या अधिकाऱ्याने विजयला कारखान्याचे आवारात नेऊन सोडले.

दूर पळालेल्या मंडळींना पुन्हा वाचा फुटली. आता त्या जमावाचे विजय लक्ष्य बनला. विजयच्या आई-बापांचा उद्धार करण्यात आला. विजयने कधीही न पाहिलेल्या मालकांचे हुजरेपद, चमचेपद त्याला देण्यात आले. विजय इमारतीत दिसेनासा होईपर्यंत ते ओरडत होते. कामावर येण्याच्या फंदात आपण पडलो ते चूक की बरोबर, अशा द्विधा अवस्थेतच विजयने कामाचा गणवेश घातला. ☐

विजयला कामावर जाण्याचा सल्ला देणारा दाजी स्वस्थ बसलेला नव्हता. त्याने काय करायचे हे मनाशी ठरलेले असावे असे त्याच्या हालचालीवरून दिसत होते. तो घरात फारसे कोणाशी बोलत नव्हता. त्याचप्रमाणे त्याचा पायही घरात फार काळ ठरत नव्हता.

## संघटनेच्या कार्यालयात

विजय कामावर जाण्यासाठी घराबाहेर पडल्यानंतर थोड्या वेळातच दाजीही घराबाहेर पडला. दाजीने विजयच्या कारखान्याच्या संघटनेचे कार्यालय गाठले.

दाजी आत शिरला तरी त्याच्याकडे कोणाचेही लक्ष गेले नाही. एक गृहस्थ तावातावाने तिथल्या कारकुनाशी आणि दोन गड्यांशी भांडत होते. तो कारकून म्हणाला, 'मला गेल्या वर्षात तुम्ही पगार वाढवला नाही. आपल्या शिपायांचे पगार न वाढवता उलट दंड म्हणून त्यांचे पैसे कापलेत. आम्ही आता ऐकणार नाही आणि पगार वाढवण्याचे मान्य केल्यावाचून कामाला हात लावणार नाही!'

दाजी आश्चर्यचकित झाला. उठसूठ पगारवाढ मागावयास पुढाकार घेणाऱ्या संघटनेच्या कार्यालयात पगारवाढीचे भांडण चालू असलेले पाहून दाजीला गंमत वाटली.

खुर्चीवर बसलेला माणूस जोराने ओरडून म्हणाला, 'पैसे काय झाडाला लागतात की काय? तुम्ही पगारवाढ मागता? लाज वाटत नाही?'

इतका वेळ मुकाट्याने उभा असलेला एक शिपाई पुढे येऊन ओरडला, 'साहेब, आमची लाज काढायचे कारण नाही.'

एक शिवी हासडून तो पुढारी उद्गारला, 'तुझ्या बापाची भीती आहे का? अरे मोठमोठ्या शेटजींना अन् मंत्र्यांना भीत नाही तो तुला घाबरतो का काय?'

कोणी तरी प्रतिष्ठित गृहस्थ कार्यालयात बसले आहेत असे पाहून त्यांच्याकडे पहात तो पुढे बोलू लागला, 'या मंडळींना कामे करायला नकोत! दोन दिवस न सांगता गैरहजर राहिला. त्याबद्दल पैसे कापायचे नाहीत तर काय तुझ्या घरी आणून द्यायचे की काय? कामावर केव्हाही येतोस. आलास तर काम करीत नाहीस अन् म्हणे पगारात वाढ करा. लाज नाही वाटत?'

तो प्रतिष्ठित गृहस्थ म्हणजे आपला दाजी धडफळेच होता, हे त्या कामगार-पुढाऱ्याला माहीत नव्हते आणि तो पुढारी नेमका कोण आहे याची दाजीला कल्पना नव्हती!

दाजी त्याला काही म्हणणार तोच बाहेर पडत पुढारीमहाशय गरजले, 'मी परत येईपर्यंत जर कामे सुरू केली नाहीत तर याद राखा. माझ्याशी गाठ आहे. पगारवाढ मागताहेत साले!'

कामगार-नेते आपल्या अनुयायांसह बाहेर गेले. त्यांची मोटार दिसेनाशी होईपर्यंत त्या तिघांनी एकही शब्द तोंडातून काढला नाही. तो कारकून दोघा शिपायांना म्हणाला, 'पगार, बोनस, महागाई भत्ता या मागण्यासाठी घसा कोरडा करतो अन् स्वत:चे खिसे भरीत असतो. आपण पगारात वाढ मागितली की याचे डोके फिरते!'

त्या कारकुनाच्या तोंडून इतके शब्द बाहेर पडताक्षणीच कोणी परका गृहस्थ कार्यालयात बसला आहे असे त्यांच्या ध्यानात आले. त्यामुळे त्यांनी दाजीच्या नावा-गावाची चौकशी केली. काय काम होते असे त्यांनी विचारताच दाजी म्हणाला, 'मला पंता कामतांना भेटायचे होते.'

हे एकताच तिघंही एकदम उद्गारले, ' अहो आमच्यावर डाफरत आत्ता बाहेर गेले ते कोण ? आता ते लवकर परतण्याचा संभव नाही. तुमचे काम सांगा. आम्हाला करण्यासारखे असले तर जरूर करू !'

¤

कामगारांच्या कल्याणाचे कार्य करणाऱ्या कार्यालयातील नोकरांच्याच मागण्या लाथाडण्यात येत असलेल्या पाहून दाजीच्या मनात एक कल्पना स्फुरली. दाजी त्या मंडळीना म्हणाला, ' तुम्हीच येथे बैठा संप का पुकारीत नाही ?'

' आम्हीच संप करायचा ?' तो कारकून घाबरत म्हणाला, 'अहो, पंता कामतसाहेबांची पावले कशी पडतात तुम्हाला ठाऊक नाही म्हणून तुम्ही असा सल्ला देताय. आम्हीच संप केला तर आम्ही धड घरी पोचू शकणार नाही.'

दाजी त्यांना समजावणीच्या स्वरात धीर देत सांगू लागला, 'घरी जायचेय कशाला ? आत्ता या क्षणीच काम बंद ठेवून कार्यालयाच्या दारात तिघेही बसा.'

ते शिपाई म्हणाले, ' बसा म्हणायला तुमचे काय जातेय ? साहेब परत येतील तोपर्यंत पत्रकारपरिषदेसाठी इथे व्यवस्था करून ठेवायची आहे, तसे ते सांगून गेले आहेत.'

कार्यालयातील सेवकांवर त्यांच्या नेत्याचा किती दबाव होता याची कल्पना दाजीला चांगलीच आली. तेव्हा दाजीनेच हालचाल करायला प्रारंभ केला. कार्यालयात निरनिराळ्या संपाच्या वेळी वापरण्यासाठी कापडी व पुठ्ठ्याचे फलक तयार करून ठेवलेले होते. ते पाहून त्यातले निवडक फलक त्याने कार्यालयाच्या आवतीभोवती मांडून ठेवले. कापडी फलक दरवाजावर बांधला. बाहेर रस्त्यावर एक सतरंजी टाकून त्यावर बसत दाजी कार्यालयीन सेवकांच्या मागण्यांच्या घोषणा देऊ लागला. दाजीनेच आपल्या मागण्यांसाठी पुढाकार घेतलेला पाहताच तो कारकून आणि दोघे शिपाई यांनी दाजीला साथ देत त्याच्याजवळच बैठक मारली.

¤

हा सारा बनावच सर्वस्वी नवा होता, अनपेक्षित होता. संपाच्या घोषणा देत ज्या जागेतून मंडळी बाहेर पडत तेथेच संपाचा पुकारा झालेला पाहून मंडळी भोवताली गोळा होऊ लागली होती. दोन एक तास असे चालले असेल. तोच काही वाहन तेथे येऊन धडकली. त्यातील परदेशी बनावटीच्या मोटारीतून बाहेर पडून घाईने पुढे येऊन पंता कामत गर्जत म्हणाले, ' हे काय चाललंय ? आमचे कार्यालय म्हणजे एखादा कारखाना आहे की काय ? अन् या घोषणा कोण देतोय ? काढून टाका ते फलक !'

या आरडाओरडयाचा काहीच परिणाम न होता दाजी कामतांच्या पुढे उभा राहून म्हणाला, ' आपल्या सेवकांवर ओरडण्याचे कारण नाही. त्या तिघांनी त्यांच्या मागण्या पूर्वीच तुमच्या समोर मांडल्या आहेत.'

' हे सांगणारे तुम्ही कोण ?'

' मी तसा कोणी नाही. मी आपल्यासारखा पुढारी नाही. माझे नाव दाजी धडफळे.' दाजीने नम्रपणाने हसून सांगितले.

दाजीचे नाव ऐकताच गर्जना करणारे नेते चमकले. भगवान भोगानंदांच्याच गोटात शिरून त्यांना पळून लावण्याच्या कामगिरीमुळे दाजीचे नाव प्रसिद्ध झाले होते. याची जाण होताच कामत मनात चमकले. तसे वर न दाखविता त्यांनी मोठ्यानेच दाजीला विचारले, ' दाजीसाहेब तुमचा इथे संबंध काय ? ते माझे नोकर आहेत. त्यांना मी वाढ देईन, नाही तर देणार नाही. तुम्ही इथून निघून जा !'

दाजी बरोबर बसलेले तिघे चुळबुळ करू लागले. ते पाहून त्यांना हुकूम सोडीत कामत म्हणाले, 'आपण पत्रकार परिषद घेतलीय हे विसरलात की काय ? चला, तिघे आत जाऊन पत्रकार–मित्रांची नीट व्यवस्था करा !'

त्या तिघांना थांबण्याची खूण करीत दाजी उद्गारला, 'महाशय, आम्ही इथे रस्त्यावर बसलो आहोत. तुमच्या तिन्ही नोकरांनी बैठा संप पुकारलाय, त्यांना साथ देण्यासाठी मीही त्यात सामील झालोय.'

ही बोलाचाली होईपर्यंत इतर वाहनांतून आलेली पत्रकारमंडळीही तेथे येऊन पोचली. त्यांना पाहताच दाजी म्हणाला, 'कामतसाहेब, आपण दोघेही या पत्रप्रतिनिधीशी बोलू या.'

दाजीशी सहमत असलेला पत्रकार म्हणाला, 'तुमचे म्हणणे आता सर्वांना पाठ झाले आहे. धडफळे नवीन आहेत. ते बुवाबाजीविरूद्ध यशस्वी मोहीम केल्यानंतर तुमच्या क्षेत्रात शिरणार असे दिसतेय. तेव्हा त्यांचे म्हणणे आपण सारेच ऐकू या !'

पंता कामत रागावलेले दिसले. पण ते काहीच बोलले नाहीत.

तेवढयात दाजी जमलेल्या पत्रप्रतिनिधींना उद्देशून म्हणाला, ' मला याच क्षेत्रात काय, कुठल्याच चळवळीत पडायची इच्छा नाही. परंतु कामतसाहेबांच्या अविचारी आणि स्वार्थी नेतृत्वामुळे महाराष्ट्रातून कारखाने बाहेर निघून जातील. महाराष्ट्रातले कामगार बेकार होतील, म्हणून मी तिथे गेलो होतो. तरी त्यांनी मला पाहूनही माझी साधी विचारपूसही केली नाही. त्यांचे हे नोकर पगार वाढीची मागणी करीत होते. युक्तिवाद करीत होते. कामगारांच्या कळवळ्यासाठी प्रसिद्ध असलेले आपले पंता कामत स्वतःच्याच चाकरांचे म्हणणेही ऐकून न घेता डाफरत होते. या मंडळीचे मागणे मला रास्त वाटले. म्हणून मीच त्यांना बैठा संप करायचे सुचवले. पण या साहेबांचा दरारा जबरदस्त असल्याने ते घाबरत होते. म्हणून मी यानीच तयार केलेले फलक जागजागी लावले अन त्याच्या जागेत जाऊन अतिक्रमणाचा आरोप व्हायला नको म्हणून रस्त्यावर येऊन बसलो !'

मघाशी बोलणारा पत्रकारच हसत हसत कामतमहाशयांना म्हणाला, ' अहो, आजची हीच खरी बातमी आहे ! युनियनच्याच कार्यालयात पगारवाढीसाठी बैठा संप ! खरं सांगू का ? या दाजीनी तुमच्यावरच मात केली आहे. अगदी प्यादी !' असे सांगत असताना त्या पत्रकाराला हसू आवरत नव्हते.

आपल्या सहकाऱ्याला हसण्यामुळे पुढे बोलणे अशक्य झालेले पाहून दुसरा पत्रकार म्हणाला, 'अहो, हा अजब प्रकार आहे ! तुमचेच फलक, तुमचेच बावटे, तुमचेच चाकर आणि तुमचीच भाषा ! फक्त हा सारा बनाव तुमच्याविरुद्ध खडा झालाय इतकाच काय तो फरक !'

पंता कामत संताप न आवरून म्हणाले, ' हा दाजी धडफळे मांड-

वलदारांचा हस्तक दिसतोय !'

त्यांचे बोलणे पुरे व्हायच्या आतच दाजी कडाडला, 'ही तुमची हुकमी शिवी माझ्यापुढे निरुपयोगी आहे. मी एक सामान्य कार्यकर्ता आहे. कोण कोणाचे हस्तक आहेत हे माझ्यापेक्षाही या पत्रकारांनाच जास्त चांगले माहीत आहे !'

'अहो, ते शाळेत शिक्षक होते अन धडाडीचे कार्यकर्ते आहेत !' एका पत्रकाराने दाजीची माहीती पुरविली.

त्याबरोबर पेचातून सुटका झाल्यासारखे ते नेते उद्‌गारले, 'अहो, या मास्तराला कामगार चळवळीतले काय कळतेय ?'

या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी दाजीच पुढे सरसावला. त्याने कामतांना उपरोधिक स्वरात म्हटले, 'खरंच मला काही कळत नाही. कामगारांना तुम्ही उठसूट संप करायला कसे सांगता हे कळत नाही. मालकवर्गाने पगारवाढ व इतर सवलती द्यायच्या मान्य केल्या तरी त्या वाढीचा उत्पादनाशी संबंध जोडायला तुम्ही नकार का देता हे मला कळत नाही. कामगारांना त्यांच्या हक्कांची जाणीव उत्पन्न करून देता; पण त्यांच्यावरील दायित्वाची जबाबदारीची शिकवण त्यांना का देत नाही हे समजत नाही. कामगारांना बोनस मिळाला की तो रोखच द्यावा असा तुम्हा मंडळीचा हट्ट असतो ना ! पैसा रोख स्वरूपात मिळाला काय किंवा चेकच्या मार्गाने दिला काय, यात फरक काय पडतो ? रोख पैशाने कामगारांचं कल्याण जास्त कसं काय होतं हे मलाच काय, कोणालाही कळत नाही !'

दाजीने शेवटचं वाक्य उच्चारताच कार्यालयातला कारकून हसला. त्याला हसू का फुटले असावे याचा दाजीला विचार पडला. तेवढ्यात पुढारीमहाराज खवळून म्हणाले, 'कामगार आणि कंपनी यांच्यातील हा व्यवहार आहे. त्यात तुमच्यासारख्यांना पडायचे कारण नाही.'

हा संवाद ऐकत बाजूला उभा असलेला एक गृहस्थ म्हणाला, 'अहो दाजी, या नेते-मंडळीचा त्या बोनसमध्ये वाटा असतो. का हो खरं का हे ?' हा प्रश्न त्या माणसाने पंता कामत यांना करताच ते पुन्हा उसळले. सरळ उत्तर न देता ते म्हणाले,

'तुम्ही मध्ये बोलू नका.'

त्या गृहस्थाने पुन्हा शांतपणाने सांगितलं, 'मी मधे बोलत नाही. माझ्या प्रश्नाचं उत्तर दिलंत म्हणजे पुन्हा बोलायचं कारणच उरणार नाही.'

पंता कामत काही बोलेनात. तेव्हा दाजीच म्हणाला, 'अहो महाशय ते चिडले यातच तुम्हाला उत्तर मिळालं नाही का ?'

पंता कामत यांना संताप आवरून धरणे कठीण जात होते. पण दाजीला वेडवाकडं बोलून गेलो तर सारंच प्रकरण अंगावर शेकेल अशी त्यांना भीती वाटू लागली होती. तेव्हा हा मुद्दा सामोपचाराने मिटवण्याच्या उद्देशाने त्यांनी दाजीला सांगितलं, 'कामगारांना मिळणाऱ्या बोनससारख्या जादा पैशातला काही हिस्सा आम्ही घेतो हे खरं आहे दाजीसाहेब. पण तो आम्ही घेतो म्हणजे ती कामगार संघटना घेते. नाही तर त्यांच्याच कामासाठी लागणारा खर्च आम्ही कसा करणार ?'

दाजीजवळ येऊन ते हळू आवाजात बोलू लागले होते. हा आपल्या कारवाईचा त्यांच्यावर झालेला परीणाम असल्याचे त्याच्या ध्यानात आले. तेव्हा दाजीनं त्या उत्तरातून उत्पन्न होणारा प्रश्न केला, 'तुम्ही म्हणता तसं होत असेल तर तुमच्या संघटनेजवळ पुष्कळ निधी जमा होत असणारच. मग तुम्ही तुमच्या नोकरांना पगारवाढ का नाकारता ?'

दाजीच्या या प्रश्नाने त्यांच्याच व्यवस्थापनातला घोळ उघडा पडण्याची धास्ती होती. असले प्रश्न पंता कामत यांना आवडत नाहीत हे जाणणारा एक अनुयायी काही मंडळींना घेऊन पुढे आला आणि त्याने धक्काबुक्कीला सुरुवात केली. तेवढ्यात लांबून काही दगडही आले. तेव्हा पुष्कळच गोंधळ उडाला. काही मंडळींनी त्या कार्यालयापुढे लावलेले फलक काढून फेकून दिले. दाजीला मात्र कोणीही हात लावण्यास धजले नाही या बोलाचालीत वेळही बराच गेला होता. पत्रप्रतिनिधींनाही कोण्या परदेशी पाहुण्यांच्या कार्यक्रमाला जायचे होते. त्याचे स्मरण करून देत पंता कामत म्हणाले, 'आपण पुन्हा सवडीने भेटू', आणि त्यांना तेथून पाय काढला.

## बोलके मथळे

दुसऱ्या दिवशीच्या सर्व वर्तमानपत्रातील पहिलं पान दाजी आणि त्याच्या पुढाकाराने चालू झालेल्या संपाच्या बातम्यांनी व्यापले होते. त्यांचे मथळेच बोलके होते. 'भोगानंदांना पळवून लावणाऱ्या दाजी धडफळ्यांचे नवे पाऊल !' 'कामगार युनियनच्या सेवकांचीच पगारवाढीची मागणी !' 'दाजी धडफळ्यांच्या नेतृत्वाखाली बैठा संप !' एका पत्राने संपाची आणि संपस्थानी झालेल्या संवादाची सविस्तर हकीकत देऊन प्रश्न केला होता : 'बोनसचा पैसा कोठे जातो ? कामगाराच्या खिशात का नेत्यांच्या घशात ?'

पंता कामत याच्या कार्यालयासमोर चालू झालेल्या संपाची वार्ता अशा तऱ्हेच्या मथळ्याखाली विविध पत्रांनी सविस्तर दिली होती. त्याच्याच शेजारच्या स्तंभात तितकीच महत्त्वाची दुसरी बातमी होती. ती वाचून दाजीला काळजी वाटू लागली. कामावरून परत जाताना विजयवर खुनी हल्ला करण्यात आला होता. जखमी अवस्थेत त्याला रुग्णालयात हलविण्यात आले आहे. तो हल्ला कोणी केला असावा असा प्रश्न उपस्थित करून, संपावर गेलेल्या पंता कामत यांच्या संघटनेतील मंडळींनी तो केला असण्याची शक्यता त्या वार्तेतच व्यक्त करण्यात आली होती.

¤

दाजीने मुळावरच आघात सुरू केल्याने पंता कामत अस्वस्थ झाले होते. सकाळी त्या संपाच्या ठळक वार्ता वाचल्याबरोबर त्यांनी कसाबसा चहा घेतला अन् ते तडक आपल्या कार्यालयाकडे धावले. वार्ताहरांची आणि जनतेची गर्दी होण्यापूर्वीच त्यांना दाजीची भेट घ्यायची इच्छा होती. कामत खाली उतरण्यापूर्वी मोटारीतून बाहेर डोकावले आणि त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला ! कालच्यासारखेच निरनिराळे फलक पुन्हा तेथे फडकत होते. त्यात जी भर पडली होती तीत पंता कामत याच्यावरच झोड उठविलेली होती. जवळच्या वार्ताफलकावर विजयवरील खुनी हल्ल्याची बातमी लिहून त्यात पंता कामत यांचाच हात असल्याचा आरोप करण्यात आला होता !

दाजीशी सामोपचाराचे धोरण स्वीकारावयाचे ठरवून ते पाहू लागले. तो ढाराढूर झोपलेला दिसला. ते पाहून दाजीला ठोकून काढावा, असा विचार त्यांच्या मनात येऊन गेला. दहशतवाद हे फार मोठे शस्त्र कामत यांच्या शस्त्रागारात होते. त्याच्या जोरावरच

त्यांनी कामगार-जगतात आपला दरारा निर्माण केला होता. जवळ-जवळ निम्म्या संघटना त्याच्या हुकुमतीखाली काम करीत होत्या. कामत म्हटले की हाणामारी आलीच. तेवढ्यावरच भागले तरी मिळवली, अशीच सर्वांची धारणा झालेली होती.

हे सारे किती खरे आहे हे कामत जाणतच होते. प्रसिद्ध झालेल्या घटनांव्यतिरिक्त किती तरी भयानक घटनात त्यांचा हात होता. त्याची आकडेवारी कोणी काढली असती तर ती मध्य प्रदेशातल्या डाकूंच्या टोळ्यांतील नायकांनाही मागे टाकणारी होती. ते नायक दरोडेखोर म्हणून गणले जात होते; पण त्यापेक्षाही भयानक कृत्ये करणारा हा नेता कामगार चळवळीच्या पुढाकाराने आधुनिक यंत्रयुगातला आवश्यक भाग असल्याचे भासवीत होता. कामगार संघटनांना राबवून अरेरावी गाजवीत होता. तरीही दाजीशी संघर्ष करून चालणार नाही, तो अंगावर उतेल असे त्याचे अनुभवी मन सांगत होते.

दाजीला जागे करण्याचे कामतांना धाडस होत नव्हते; परंतु त्यांची चाहूल लागून कार्यालयातले तीन चाकर उठून उभे राहिले. या अवघड मन:स्थितीतही कामतांना त्यामुळे बरे वाटले. त्यांचा आत्मविश्वास थोडासा जागृत झाला. तेवढ्यात 'काय कामतसाहेब!' अशी हाक मारीत एक पत्रकार त्यांच्याजवळ आला.

त्या आवाजाने दाजी जागा झाला. त्याचा फायदा घेत कामत यांनी विचारले, 'काय दाजीसाहेब ! झोप चांगली लागलेली दिसतेय तुम्हाला !' असे म्हणून कामतांनी उभ्या असलेल्या शिपायाला चहा आणण्याची आज्ञा केली.

कामत यांची फर्माइश ऐकूनही तो जागचा हलला नाही. ते पाहून त्यांनी रागानेच त्या शिपायाकडे पाहिले.

कामतांच्याकडे लक्ष देणारा दाजी ही गंमत पहातच होता. तो कामतांना म्हणाला, 'महाशय, तो बैठ्या संपावर आहे हे विसरलात वाटते ?' कामतांनी दाजीकडे बघितले; पण ते काहीच बोलले नाहीत.

ते गप्प बसलेले पाहून पुढे दाजीच विचारता झाला, 'तो तुमच्या ऑफिसचा शिपाई आहे. त्याला चहा आण, पाणी दे अशी कामे सांगता ? कारखान्यातल्या शिपायांनी ही कामे केलेली तुम्हाला चालत नाहीत ! तेथे जो नियम करता तो जणू आपल्याला लागू नाही असे समजून त्यांना खाजगी कामे सागता ?'

'तुम्हालाच चहा हवा असेल म्हणून !' कामत.

मध्येच तो शिपाई म्हणाला, 'दाजीसाहेबांनी प्रकट केले नसले तरी आमचा संप सुरू केल्यापासूनच त्यांनी उपोषण आरंभलेले आहे. कालपासून त्यांनी पाण्यावाचून काहीही घेतलेले नाही !'

हे ऐकताच कामत आणि हळूहळू तेथे आलेले वार्ताहर दाजीकडे आश्चर्याने पाहू लागले. दाजीने पुन्हा कामतांना प्रश्न केला, 'गेल्या दोन वर्षांत त्याना तुम्ही पगारवाढ दिली नाहीत.'

कामत काहीच बोलत नाहीत असे पाहून दाजीने पुन्हा विचारले, 'का हो, या मंडळीना पगार किती देता ?'

या प्रश्नाचे उत्तर तेथेच बसलेल्या कारकुनाने दिले. ते आकडे ऐकताच दाजीने समोरच्या वार्ताहराला विचारले, 'आपल्या येथे किमान वेतन किती आहे हो ? तितका तरी पगार या मंडळीना द्याल की नाही ?'

याविषयी काही बोललो तर दाजी आणखीच खोलात शिरण्याची भीती वाटल्याने ते टाळण्यासाठी कामत म्हणाले, 'आमच्या कार्यालयात काम असे नसतेच. जेव्हा एखादा संप होतो तेव्हा मात्र या लोकांना थोडीही विश्रांती मिळत नाही. तेव्हा सर्वांच्या जेवणाखाण्याची, चहा-पाण्याची व्यवस्था येथेच करण्यात येते !'

दाजीनं मधेच कामतांना विचारलं, 'त्यात मोठेसे काय करता तुम्ही ? दिवस--रात्र त्यांना राबवायला मिळावे आणि त्यांनी घरी जाऊ नये म्हणून तो खर्च करता का जादा कामाचे वेतन देता का ? कारखान्यांकडून 'ओव्हर टाइम' मिळवलात ना ?'

कामत यांना चूप राहणे कठीण झाल्याने ते म्हणाले, 'त्या भांडवलदारांचे नका सांगू. त्यांच्याकडून ओव्हर टाइमच काय बोनसचा अधिकार प्रस्थापित करण्यासाठी मला प्रत्येकाशी प्रत्येक वेळी लढावे, झगडावे लागलेले आहे. मी कामगार वर्गासाठी किती झिजलोय हे सर्वांना ठाऊक आहे.'

'पण तुमच्याबद्दल सर्वांना अज्ञात अशाही पुष्कळ गोष्टी आहेत.' आता दाजी काय बोलतोय अशा कल्पनेनं कामत चिंताग्रस्त झालेले स्पष्ट दिसत होते. तुमच्याच मंडळींना तुम्ही वेतनवाढ देत नाही. त्यांना रजा, फंड अशा सवलती देण्याचा विचार तुमच्या मनाला शिवतही नाही. त्यांना बोनस...'

कामत चवताळून दाजीला म्हणाले, 'आमचे कार्यालय काही धंदा करीत नाही त्यांनी बोनस मागायला !'

दाजी दटावणीच्या स्वरात सांगू लागला, 'कार्यालय धंदा करीत नसेल; पण तुमचे धंदे काय चालतात हे मी प्रकटपणे सांगू का ? त्या धंद्यांवर तुमचे खिसे कसे आणि किती गरम होतात याची सारी माहिती मी गोळा केली आहे. साधा प्रश्न विचारतो. ही मर्सिडिससारखी गाडी तुम्हाला कशी परवडते हो ? त्याचे पेट्रोल, नाही तर डिझेल यांचा खर्च कसा भागतो हो ! ते जाऊ द्या. कारण तुम्ही सांगणार की, तो सारा खर्च तुमची संघटना करते; पण तुम्ही ज्या पंचतारांकित हॉटेलात जेवता, बहुधा आयात केलेले उंची मद्य ढोसता त्याचे पैसेही संघटना खर्च करते असे म्हणू शकाल का ? तुमची दोन मुले परदेशात शिकण्यासाठी गेली आहेत. कुठे ? कामगारांचे राज्य असलेल्या देशात नाही ! तर भांडवलशहांच्या राज्यात, अमेरिकेत ! हे कसे परवडते, ते जाहीरपणे मी या वार्ताहरांना सांगू का ?'

दाजी कामतांवर असे प्रहार करीत असताना जमलेली मंडळी आणि वार्ताहर ही अनपेक्षित घटना पाहात उभी होती. कामतानी हल्ले करायचे आणि त्याच्या बातम्या वर्तमानपत्रात यायच्या, ही निर्माण झालेली प्रथा. दाजीने सारे गाडे उलटवले होते. प्रहार सहन करायचा प्रसंग त्याने कामतांवर आणला होता !

तितक्यात पोलीसच्या मोटारीतून अनेक ठिकाणी बँडेज बांधलेल्या अवस्थेत विजय खाली उतरला. त्याने दाजीला मिठी मारली. आपल्यासाठी त्यांनी पुढाकार घेऊन उपवास आरंभल्याची हकीकत त्याला रुग्णालयात कळली होती. त्यामुळे सारे उपचार पूर्ण होताच तो दाजीना भेटायला धावला होता.

दाजीच्या जवळच वार्ताहरांनी विजयला बसविले. दाजीने त्याला आधार देत म्हटले, 'कामतसाहेब, हा बघा तुमच्या हिंसक पद्धतीचा

पुरावा! याला तुमच्या मंडळींनी मारले. जखमी केले. तुमच्या आदेशानुसारच हे घडले असले पाहिजे. कारण 'इतर कामगार करतात त्यापेक्षा जादा काम तू करशील तर याद राख', असा तुमच्या संघटनेच्या नेत्यानेच त्याला दम दिला होता. या बिचाऱ्या, लहान, नव्यानेच नोकरीला लागलेल्या मुलाचा गुन्हा कोणता? तो चांगले काम करीत होता. त्याची तंगडी मोडून लुळेच करायचा तुम्हा मंडळींचा बेत होता. ती योजना फसली म्हणून तो वाचला! तुमच्या असल्या घातक पद्धतीविरुद्ध मी उपोषण सुरू केले आहे!'

कामत यांना काय बोलावे तेच सुचत नव्हते. त्याचे डावे, उजवे हात त्यांच्याबरोबरच होते. तेही त्याच्या दहशतवादाला विटलेले होते. कामताचे बहुतेक सारे संप स्वतःचे वर्चस्व वाढवण्यासाठीच चालू असतात. 'कामगार चळवळीचा मूळ उद्देश अन्याय-परिमार्जन ना?' असा प्रश्न कामतांच्या सहकाऱ्यांना विचारीत दाजी पुढे म्हणाला, 'त्यासाठी तुम्ही गेल्या काही वर्षात किती संप केलेत सांगाल का? तुम्ही आपल्याच मनाला विचारा! जे उत्तर येईल त्याप्रमाणे कृती करा आणि त्याविरुद्ध काम करणारे नेतृत्व झुगारून द्यायचे धैर्य दाखवा!'

पोलिसांनी अंता कामत याच्या अटकेचा हुकूम त्यांना दाखवला आणि मोटरीत बसवून आरक्षी दल त्यांना घेऊन गेले.

ती मोटार दृष्टीआड होताच कामतांच्या सहकाऱ्यांनी दाजी झडफळे याच्या कौतुकाच्या घोषणा देण्यास प्रारंभ केला. कामतांचे पितळ उघडे पाडण्याचे धैर्य फक्त दाजीनेच दाखवले होते. त्यामुळे पंतशाही नष्ट होणार होती. तेच काम महत्त्वाचे होते. ते दाजीने केले होते. त्यामुळे विजयच्या कारखान्यातला संपही बारगळला होता!

□

---

पुस्तके

# ज्ञानभास्कर भास्करराव जाधव एक विचार दर्शन

भास्करराव विठोजीराव जाधव (१८६७ ते १९५०) हे जुन्या काळातले एक प्रसिद्ध सत्यशोधक विचारवंत होते. कोल्हापूरला शाहूमहाराजांच्या पदरी त्यांनी विविध अधिकारपदांवर काम केले होते. विशेषतः, म्युनिसिपालिटीचे सर्वाधिकारी या नात्याने कोल्हापूरच्या आधुनिकीकरणात त्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. पुढे ते मुंबई विधिमंडळाचे व केंद्रीय विधिमंडळाचेही सभासद झाले. तसेच ते मुंबई इलाख्याचे शिक्षण, शेतकी आणि अबकारी मंत्री होते. दोन्ही गोलमेज परिषदांना ते उपस्थित होते. सत्यशोधक समाजाचे एक नेते, पुरोगामी विचारवंत, संस्कृत-पंडित, 'समाजस्वास्थ्य,' 'विविध ज्ञानविस्तार', 'किर्लोस्कर' यासारख्या नियतकालिकांचे लेखक आणि १९३५ च्या मुंबई विभागाचे साहित्यसंमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणूनही ते प्रसिद्ध आहेत. अशा या 'ज्ञानभास्करा'च्या विचाराची कल्पना नव्या पिढीला यावी आणि आजच्या काळात त्यांचे विचार समाजाला उपयुक्त ठरतील का, ह्याचा विचार व्हावा, या हेतूने प्रा. श्याम येडेकर यांनी भास्कररावांचे निवडक लिखाण संग्रहित केलेले आहे. प्रस्तुत पुस्तक वाचकांना भास्कररावांच्या विचाराची पुरेशी ओळख करून देतेच, पण त्यांच्या विचारांना चालनाही देते. याबद्दल अर्थातच संपादकाचे अभिनंदन करायला हवे. मात्र येथे हेही स्पष्ट केले पाहिजे की, 'दादाभाई नौरोजी, न्यायमूर्ती रानडे, महर्षी कर्वे, सयाजीराव गायकवाड, राजर्षी शाहू छत्रपती इत्यादींबरोबरच भास्करराव जाधव यांचाही आवर्जून उल्लेख करावा लागेल,' या संपादकाच्या मताशी हे पुस्तक वाचल्यावरसुद्धा पूर्णपणे सहमत होणे कठीण आहे. कारण वर उल्लेखिलेल्या व्यक्तींच्या तुलनेने भास्करराव हे दुसऱ्या फळीतील विचारवंत नेते होते आणि त्या दृष्टीनेच त्यांचा विचार करावा लागतो.

ह्या पुस्तकात दोन विभागांत मिळून भास्करराव जाधव यांचे बारा लेख संग्रहित केलेले आहेत. हे दोन विभाग काही विशिष्ट योजकतेने पाडलेले नाहीत; तर दोन छापखान्यात पुस्तक छापले गेले म्हणून दोन भाग झाले आहेत! भास्कररावांच्या बारा लेखामधून त्यांची समाजसुधारणेची तळमळ, पुरोगामी सत्यशोधकी विचार, ज्ञानलालसा, तर्कसंगत मांडणी करण्याची पद्धत, विविध विषयांवरचा अभ्यास इत्यादी गोष्टींची कल्पना येऊ शकते. त्यांची तळमळ लक्षात घेऊनच भास्कररावांच्या जीवनकार्याचा परिचय करून देणाऱ्या आपल्या प्रास्ताविकात प्रा. येडेकर यांनी असे म्हटले आहे की, 'भास्करराव हे हाडा-मासाचे लेखक नव्हते; पण रक्ताने लिहिणारे लेखक मात्र जरूर होते.'

या संग्रहातील 'The Satya Shodhak Samaj', 'घरचा पुरोहित', 'लग्नविधी' आणि 'रामराम पाव्हणं' हे चार लेख मुख्यतः सत्यशोधक समाज आणि त्याच्या कार्याशी संबंधित असे आहेत. 'The Satya Shodhak Samaj' या इंग्रजी लेखात भास्कररावांनी या समाजाची निर्मिती, उद्दिष्टे व कार्य आणि फुल्यांचे लेखन व कार्य यांचा थोडक्यात परिचय करून दिलेला आहे. 'The work is very great, but the workers are few', अशी खंत या लेखात व्यक्त झालेली आहे. लेखाच्या शेवटी ब्रिटिश सत्तेशी एकनिष्ठता बाळगण्याचा विचार भास्कररावांनी मांडलेला आहे. त्या वेळच्या ब्रिटिशनिष्ठ सुधारणावाद्यांच्या विचारांचा हा एक प्रातिनिधिक आविष्कारच म्हणायला हवा. 'घरचा पुरोहित' ह्या लेखात ग्रामजोश्याच्या म्हणजेच धार्मिक

मध्यस्थांच्या 'दलाली 'ला विरोध करण्याच्या सत्यशोधक समाजाच्या धोरणाला अनुकूल असे भाष्य केलेले आहे. 'प्रतिमापूजा हा भक्तिमार्गातील अखेरचा दर्जा आहे' हा या लेखातील एक महत्त्वाचा विचार होय. 'लग्नविधी' ह्या लेखात लोकांना समजण्यास आणि आचरण्यास सुलभ अशा सत्यशोधक पद्धतीच्या लग्नविधीचा परिचय करून दिलेला आहे. 'रामराम पाव्हणं' ह्या आपल्या लेखात (की जे मुळात सत्यशोधक परिषदेत केलेले भाषण आहे.) भास्कररावांनी हे स्पष्ट केले आहे की, सत्यशोधक समाज कोणत्याही राजकीय पक्षाचा अभिमान धरत नाही. ' दोन बायका न करण्याच्या मुंबई राज्याच्या कायद्यावर आर्थिक कारणे पुढे करून पुरोगामी म्हणवणारे भास्करराव टीका करतात हे मात्र मोठे धक्कादायक आहे.

'कै. श्रीमच्छत्रपती शाहूमहाराज यांचे पुण्यस्मरण' या लेखात शाहूमहाराजांच्या जीवनकार्याचा थोडक्यात आढावा घेऊन त्यांच्या गौरवपर विवेचन केले आहे. ह्या विवेचनाच्या शेवटी 'महाराजांनी स्वीकारलेले धोरणच अखेर देशाच्या हिताचे आहे'. असा निष्कर्ष भास्करराव मांडतात. 'मराठे आणि त्यांची भाषा' ह्या लेखात मराठ्यांच्या घरण्यांचे मूळ, त्यांची कुलदैवते, देवक, विवाह, भाषा इत्यादी गोष्टींसंबंधीचे विवेचन करून त्यांत होत गेलेल्या बदलांचा शोध घेतलेला आहे. भाषेच्या संदर्भात 'आज प्रचलित असलेली मराठी भाषा निदान एक हजार वर्षांची जुनी आहे,' असे मत भास्करराव व्यक्त करतात. विद्वानाची भाषा आणि सामान्य जनांची भाषा यात जे अंतर पडते त्याविषयी विवेचन करून ते असे सांगतात 'विद्वानाची भाषा बहुजनसमाजास समजेनाशी झाली म्हणजे विद्वानांची भाषा हळूहळू मरत जाऊन अखेर कायमची मरते. व्यवहारासाठी विद्वानांना बहुजनसमाजाच्या भाषेचा उपयोग करावाच लागतो.' भाषेप्रमाणेच लिपीविषयीचे आपले विचार भास्कररावांनी 'एकलिपी' ह्या लेखात मांडले आहेत. एकराष्ट्रीयत्वाची भावना वाढण्याचा दृष्टीने सर्व देशभर एकाच लिपीचा वापर व्हायला हवा, असे ते मानतात. याबाबत त्यांचे म्हणणे असे की, 'आमच्या देशात सर्वांना समजणारी व बोलता येणारी एकभाषा होईल तर ती आम्हास पाहिजेच. पण तो दिवस बराच दूर आहे. त्याअगोदर सर्व देशात एकलिपी असणे जास्त महत्त्वाचे आहे.' या दृष्टीने लॅटिन किंवा रोमन लिपीचा (कोणत्याही राष्ट्रीय लिपीचा नव्हे!) वापर करावा, असे ते सुचवतात.

## दरसालचा धिंगाणा

या लेखसंग्रहातले सगळयात विचारप्रवर्तक (आणि खरं तर प्रक्षोभकही) लेख हे हिंदूधर्माशी संबंधित विषयांवरचे आहेत. त्यातला पहिला लेख 'गणपतीउत्सव' हा आहे. गणेशोत्सवाचे वर्णन ते 'दरसालचा धिंगाणा' किंवा 'राष्ट्रीय नुकसान' असे करतात. १९२४ मध्ये केलेले हे वर्णन आजच्या गणेशोत्सवालाही लागू पडण्यासारखे आहे! हा उत्सव सुरू करताना टिळकांनी मुसलमानांच्या मोहरमचे हेतुपुरस्सर अनुकरण केले, हा भास्कररावाचा आरोप त्या काळाच्या संदर्भात अभ्यासकांनी तपासून पाहण्यासारखा आहे. गणपती ह्या दैवतावरच मुळात त्यांनी जो हल्ला केलाय तो आजही प्रक्षोभक ठरू शकेल. ते म्हणतात, "अगोदर गणपती हे दैवतच धर्मभावनेस धक्का देणारे आहे. याचा आकार अगदी बेढब आहे. 'वक्रतुंड महाकाय' हे याचे वर्णन हास्योत्पादक आहे. वाकडतोंड्या, ढेरपोट्या असे संबोधन ज्याचे आहे तो देव हास्यास्पद नाही तर काय? याला शंकराचा पुत्र म्हणणे वस्तुस्थितीस सोडून आहे. तो शंकराच्या बीजाचाही नाही व पार्वतीच्या गर्भात जन्मासही आला नाही; यामुळे आपला बाप शंकर आहे किंवा आपली आई असे सांगण्याचा हक्क त्याला नाही. अशा क्षुद्र देवतेला कसले सामर्थ्य! कोणी याला विघ्नहर्ता, विघ्नेश असेही म्हणतात. कोणत्याही कार्यारंभी गणपतीचे स्मरण करतात; पण ते 'दुर्जनं प्रथमं वन्दे, सज्जनं तदनंतरम्' म्हणजे दुर्जनाने काही वाईट करू नये म्हणून सर्वांच्या अगोदर त्याला हात जोडावे, सज्जनाला मागाहून वंदन केले तरी ते रागावणार नाही, या न्यायाने गणपतिपूजनाला महत्त्व आलेले दिसते...... गणपती ही देवताच काल्पनिक असल्याने तिची कृपाही फोल व तिचा क्रोधही फुसका. अशा देवतेची उपासना व्यर्थ आहे. फार काय, पार्वती व शंकर या देवताही काल्पनिकच आहेत. ज्यांच्या ज्यांच्या मूर्ती घडल्या जातात ते सर्व देव व देवी काल्पनिक असल्याने मूर्तिपूजा करणे हे एक खूळ आहे. त्यापासून फायदा कसलाही नाही."

'रामयणावर नवा प्रकाश' हा भास्कररावांचा लेखही धर्मश्रद्धांना धक्का देणारा आहे. या लेखात ते असे प्रतिपादन करतात की, मारुती, सुग्रीव व बिभीषण हे देशद्रोही होते आणि त्यांचा कित्ता पुढे भारतीयानी गिरवला! "हिंदुस्थानचा सर्व इतिहास देशद्रोह्याच्या काळ्या काजळाने माखला आहे. आमच्या देशाचा व लोकांचा अधःपात मुख्यत्वे या कारणाने झाला आहे." केवळ मराठ्याचाच अलीकडला इतिहास चाळल्यास कुंभकर्णाचा कित्ता गिरविणारा बंधुभक्त व देशभक्त एखादा सापडेल; पण बिभीषणाचे अनुयायी निदान दहा तरी मिळतील!" असे सांगून भास्करराव निष्कर्ष काढतात, "रामायणाची ही शिकवण आमच्या देशाच्या न्हासाचे मुख्य कारण आहे." सुमित्रा ही राज्यकन्या नव्हे, तर हलक्या कुळातली होती; कौसल्या ही मुळात दशरथाची सख्खी, सावत्र किंवा निदान चुलत बहीण तरी असावी आणि सूर्यवंशात सख्ख्या बहिणीशी विवाह करण्याचा आचार होता; सीतेच्या मनात लक्ष्मण व भरत या उभयतांच्या शुद्ध हेतूविषयी (बंधुप्रीतीविषयी) किल्मिष होते, अशी काही मतेही भास्कररावानी मांडली आहेत. ही मते मांडताना त्यांनी त्याला पूरक असे पुरावे दिले आहेत. अभ्यासकांनी या पुराव्यांचा जरूर विचार करायला हवा.

'जगद्गुरू शंकराचार्य' या लेखात भास्कररावांनी हिंदू धर्मप्रमुख मानल्या जाणाऱ्या शंकराचार्यांच्या पीठावर कठोर हल्ला चढवला आहे. त्यांचे 'जगद्गुरुत्व' भास्कररावांच्या मते शंकास्पद आहे आणि त्यातही पुन्हा, 'हे जगाचे गुरू, पण यांचे जग अगदी संकुचित आहे', हे वेगळेच! धार्मिक बाबतीत अंतिम निर्णय देण्याचा अंतिम अधिकार राजाचा आहे, जगद्गुरूंचा नाही, असा निर्वाळा भास्करराव देतात. आपले म्हणणे भास्कररावानी अत्यंत तर्कसंगत आणि साधार रीतीने मांडले आहे. हा

लेख वाचताना, युरोपमध्ये मध्ययुगाच्या उत्तरार्धात राज्यसंस्था आणि धर्मसंस्था यांच्यात झालेल्या विचार-संघर्षाची आठवण येते.

'वेदोत्पत्तीवर नवा प्रकाश' हा लेख प्राचीन भारताच्या इतिहासाभ्यासकांना विचारप्रवृत्त करणारा आहे. 'वेद हे इजिप्त व सुमेरच्या इतिहासाचे रूपांतर आहे,' असा निष्कर्ष मांडणारे डॉ. प्राणनाथ यांच्या विवेचनाच्या आधारे भास्कररावांनी 'रामकथा इजिप्त देशाची आहे,' असे म्हटले आहे. या मताच्या समर्थनार्थ त्यांनी भूगोलाच्या दृष्टीने, तसेच स्मृतीत दिलेल्या धर्मशास्त्राच्या दृष्टीने काही पुरावे दिलेले आहेत. या संदर्भात वेदांचा अर्थ लावताना सायनाचार्य व म. म. चित्रावशास्त्री यांनी केलेल्या चुका सप्रमाण दाखवून दिलेल्या आहेत. प्राचीन भारताचा इतिहास आणि रामायण-महाभारत यांबाबतचा अभ्यासकांमध्ये अनेक वाद आहेत. या वादांचा विचार करणाऱ्या आणि संस्कृतचे ज्ञान असलेल्या अभ्यासकांनी भास्कररावाचे प्रतिपादन जरूर विचारात घेण्यासारखे आहे.

'महादेव' ह्या लेखात भास्कररावांनी हे हिंदू दैवत आणि त्याची प्रतिके यांबंबंधी काही सुसंगत विचार मांडले आहेत. शंकर अथवा महादेव हा देव वास्तविक पाहाता विनाशकर्ता, तरीही त्याचे प्रतीक अथवा मूर्ती जननसूचक अशा पुरुषेंद्रियाची का ? या प्रश्नाचा शोध घेण्याचा उल्लेखनीय प्रयत्न या लेखात आढळतो. भास्कररावांच्या विवेचनाचा आशय असा की, मुळात शंकर हा सृष्टीची उत्पत्ती करणारा सर्वशक्तिमान देव मानला गेला होता. म्हणून तर तो 'महादेव.' पण पुढे या कल्पनेत बदल झाला. विभाग पाडणे, तुकडे पाडणे आणि एकेका तुकड्याचा अभिमान धरून आपसात भांडण-तंटे करणे हे हिंदू धर्माचे वैशिष्ट्य आहे ! त्यानुसार उत्पत्ती, स्थिती वलय करणाऱ्या एका ईश्वराचे तीन निरनिराळे देव कल्पिले गेले आणि प्रलयाचे काम महत्त्वाचे असल्याने ते करणाऱ्या देवतेला महादेव मानले गेले; पण त्याचे प्रतीक मात्र उत्पत्तीदर्शक लिंग हेच राहिले. लिंगाप्रमाणेच त्रिविभागात्मक असणारे बिल्वदल काय, लिंगायतांच्या गळ्यातील वृषणाच्या गोळीसारखी दिसणारी लिंगप्रतिमा काय, किंवा वृष किंवा वृषभ आणि वृषण या शब्दसाधर्म्यामुळे महादेवाचे वाहन बनलेला नंदी काय, या सर्व जननसूचक असल्यानेच महादेवाशी संबंधित आहेत. महादेवाविषयीच्या कल्पनांत बदल झाला तरी ही प्रतीके मात्र तशीच राहिली. भास्कररावांचे हे विवेचन कोणाला धक्कादायक वाटेलही; पण ते तर्कसंगत आहे हे लक्षात घ्यायला हवे.

या संग्रहातील भास्कररावांची सर्व मते ही शंभर टक्के ग्राह्य असतीलच असे नाही; पण ह्या लेखनामागील अभ्यास, तर्कसंगत विचारपद्धती आणि समाजसुधारणेची तळमळ याचा विचार करता ती मते अभ्यासकांनी व विचारवंतांनी विचारात घेण्याजोगी आहेत असेच म्हटले पाहिजे. बुद्धिवादी पद्धतीने मांडलेले विचार ही या लेखसंग्रहाची एक जमेची बाजू आहे. अशा विचारपद्धतीची दोन उदाहरणे पाहण्यासारखी आहेत. ज्योतिषशास्त्राचा फोलपणा स्पष्ट करताना भास्करराव म्हणतात, "ज्योतिषशास्त्राप्रमाणे मुहूर्त पाहून वागणाऱ्या पेशव्यांचे राज्य बुडाले व अशा थोतांडावर विश्वास न ठेवणारे इंग्रज प्रभू थोर योग्यतेस आले आहेत, यावरून अशा ज्योतिषाची वास्तविक किंमत कोणाच्याहीलक्षात येणारी आहे.' दुसरे उदाहरण लक्ष्मणाच्या चारित्र्यसंपन्नतेच्या संदर्भात आहे. भास्कररावाचे तर्कशुद्ध मते असे– 'नाहं जानामि केयूरे' या श्लोकाच्या आधारावर लक्ष्मणाने सीतेच्या तोंडाकडे कधीही पाहिले नव्हते अशी ग्वाही देताना ही गोष्ट शक्य आहे काय, याचा विचार झाला नाही. कैक वर्षे अरण्यात एकत्र रहात असता सीतेच्या मुखाचे चुकूनही अवलोकन करण्याचा प्रसंग येऊ नये, हेच आश्चर्य. पण ही गोष्ट खरी मानल्यास लक्ष्मणाचा आपल्या चारित्र्यावर भरंवसा नव्हता असे म्हणावे लागते. मी तिचे मुख पाहिल्यास काममोहित होईन अशी भीती असल्यानेच त्याने मुद्दाम मुखावलोकन टाळले असले पाहिजे.'

एकंदरीत, भास्कररावांच्या तर्कशुद्ध, सत्यशोधक, पुरोगामी व प्रक्षोभक विचाराचे यथार्थ दर्शन ह्या लेखसंग्रहात घडते, अशा प्रकारची पुस्तके विचारमंथनाला चालना देणारी असतात? त्यामुळे त्यांचे मनःपूर्वक स्वागतच करायला हवे.

'ज्ञानभास्कर भास्करराव जाधव'
(लेखसंग्रह)
संकलन, संपादन – प्रा. श्याम येडेकर
प्रकाशक – कर्नल आ. भा. जाधव
कोल्हापूर.
पृष्ठे : १३४, मूल्य : १५ रु.

## फिनिक्स निवड

# Wonders of The World

By Edmund Swinglehurst

सौंदर्यानुभावर काही व्यक्तींनी अनेक ग्रंथ लिहिले आहेत. पण डॉ. थॉमसनी 'नटशेल'मध्ये दोन वाक्यांत त्याचे वर्णन केले आहे. 'It is just plain fun learning something that you didn't know. There is a real aesthetic experience in being dumb-founded.' ही दोन वाक्ये याआधीच मी 'माणूस' (५-७-१९८०) मध्ये लिहिली आहेत. परंतु ती मला इतकी आवडली की, परत एकदा इथे लिहीत आहे. विशेषकरून दुसऱ्या वाक्यातच सर्व अर्थ सामावलेला आहे. मला ग्रंथालयात हा dumb-found होण्याचा अनुभव अनेक वेळा आला. परवा मी वरील पुस्तक घेतले तेव्हाही आला. या पुस्तकातील छायाचित्रे व माहिती इतकी मुद्देसूद आहे की, एकदा ते आपल्या नजरेखालून गेलं की, आपल्या स्मृतीत ते नेहमीसाठी भरेल. थ्री डायमेन्शनसारखं. अनेक वर्षे माझा ग्रंथांशी निकटचा संपर्क आला. पण अमक्या विषयावर एखादा ग्रंथ निघाला हे आपल्याला कसे माहीत नव्हते असे अनेक प्रकारचे उद्धट धक्के ( rude shocks) मला बसले आहेत. शेवटी ५०–१०० जन्म घेतले तरी सर्व माहिती आत्मसात होणार नाही. आयुष्यभर शिकतच राहावे लागणार. नाही तरी आयुष्यभर माणसाने विद्यार्थी रहावे, ( क्लीशे–cliche )

हा एक वापरून वापरून गुळगुळीत झालेला वाक्प्रचार आहेच.

राहून राहून मला banality विषयी फार दुःख वाटते. (याला अगदी जवळचा मराठी शब्द म्हणजे उच्छिष्टपणा. पण तोही एकदम बरोबर वाटत नाही. एवढा पावरफुल अर्थ फक्त श्री. एस. व्ही. सोहोनींच्या डिक्शनरीत आहे. उच्चारासाठी व थोडक्यात अर्थ बघण्यासाठी ही एक अप्रतिम डिक्शनरी आहे ) एखाद्या दुकानात आपण जातो. तिथे एक माणूस काम करीत असतो व शेजारी चार-पाच जणांचं टोळकं असतं व उच्छिष्टपणा मनमुराद लुटला जातो. गप्पा म्हणजे उच्छिष्टपणा असे मला म्हणायचे नाही. पण अशा टोळक्यांच्या गप्पा ऐकल्या की banality म्हणजे normality का, असा प्रश्न मला पडतो. हे इतकं शिकायचं असताना, इतकं करायचं असताना, का अशा उच्छिष्टपणात वेळ घालवावा ते मला तरी कळेनासे होते.

मी लहान असताना, जगातील कोणकोणती सात किंवा नऊ वंडर्स आहेत याची सारखी उत्कंठा लागत असे. आपल्याकडे एनसायक्लोपिडिआ ब्रिटॅनिका असता तर असल्या अनेक गोष्टी आपल्याला कळल्या असत्या, असा मनात विचार येई. (अजूनही येतो. ) लिखाणात तर असल्या संदर्भ ग्रंथांचा अतिशय उपयोग होतो. माझ्याकडे कॉलिन्स व व्हार्यकिंग डेस्क एनसायक्लोपीडिआ आहेत. व्हार्यकिंग मी काही वर्षांपूर्वी दहा रुपयात घेतला होता. पण कधी कधी एका मुद्द्यासाठी अनेक संदर्भ ग्रंथ बघावे लागतात व ते बघूनही माहिती मिळत नसते.

आपल्या भारतात ४ वंडर्स आहेत. त्यांचा या पुस्तकात समावेश आहे. अजंठा, ताजमहाल, लाहोरचा किल्ला व एव्हरेस्ट. जगातील सेव्हन वंडर्स म्हणजे १. पिरॅमिड्स (अर्थात इजिप्तमधील), २. बॅबिलॉन द ग्रेट ३. ऑलिंपियातील झीयसचा पुतळा ४. आर्टेमिजचे देऊळ ५. हालिकार्नासॅसचे मॉसलिअम (मोठी कबर) ६. दुसरा सूर्य अर्थात ऱ्होडसचा कॉलॉसस ७. अॅलेक्झांड्रिया येथील फेरॉस लाइटहाउस. असे म्हटले जाते की, आता या सात थक्क करून सोडणाऱ्या गोष्टींपैकी एकच शिल्लक आहे–पिरॅमिड्स. बाकीच्या सहा पंचमहाभूतांच्या माऱ्याने व माणसांच्या चुकांमुळे, काळाच्या पडद्यामागे आहेत.

म्हणूनच की काय, श्री. एडमंड स्वीगलहर्स्ट यांनी व त्यांच्या प्रकाशकाने (हॅमलिन) थक्क करून सोडणाऱ्या गोष्टींवर एक शून्य आणखी दिले. खरं म्हणजे या पुस्तकाचे नाव सेव्हन्टी वंडर्स ऑफ द वर्ल्ड द्यायला हवं होतं. मुख्य म्हणजे या सत्तर वंडर्सची चित्रे इतकी कलात्मक व माहिती इतकी काटकसरयुक्त आहे की, काही दिवसांनी आपल्याला परत परत पुस्तक चाळावसं वाटतं.

मी इथे एक उदाहरण देतो. गालापागोस बेट हा शब्द कधी तरी आपल्या वाचण्यात आला असेल. (मला मात्र हे नाव आठवले की अलेक्झांडर सॉल्झेनित्सिनचे गुलाग आर्चिपेलॅगो आठवते.) हे बेट कशासाठी प्रसिद्ध आहे ? तर इथे डार्विनने (सर्व्हायव्हल ऑफ द फिटेस्टवाला ) संशोधन केले होते. दुसरे म्हणजे राक्षसी कासव ( giant tortoise ) आता फक्त इथेच शिल्लक राहिले आहेत. इथे इग्वान नावाचा चमत्कारिक प्राणी राहातो. या प्राण्याला ढोबळपणे अमेरिकन घोरपड म्हणता येईल. बस, अशी काही ठराविक माहिती. शे-दोनशे शब्दात.

मी ' फिनिक्स'च्या वाचकांसाठी चिकटवलेल्या बातमीवर, म्हणजे संपादकाच्या बातमीवर लाल काट मारतो. त्याचे कारण असे की एखादी महत्त्वाची बातमी ३००-४०० शब्दांची असेल तर ती ५०-१०० ची केली तर वाचकाच्या अधिक लक्षात रहाते, असे मला आढळून आले. पण पूर्वी आम्ही बातमी जशीच्या तशी चिकटवत होतो तेव्हा फार मोठ्या बातम्या वाचल्याच जात नसत.

स्मरणशक्तीमध्ये Staying put हा जो प्रकार आहे तो त्रोटक बातम्यानी किंवा लेखांनी सहज होऊ शकतो.

'फिनिक्स'मध्ये या लेखात उल्लेखिलेल्या सेव्हन वंडर्सचेही पुस्तक आहे. ते मायकेल एड्लीने लिहिले आहे. या पुस्तकात अनेक प्रकारची माहिती असूनही ते put downable झाले आहे. ( अलिकडे इंग्रजी पुस्तक अती वाचनीय असले तर प्रकाशक त्याची unputdownable म्हणून जाहिरात करतात.) कारण एड्ली यांच्या पुस्तकातील माहिती मारुतीच्या शेपटासारखी वाढत वाढत गेली आहे.

पुस्तकाचा पुठ्ठा उघडल्यावर हॉर्स शू पॉइंट, ग्रँड कॅन्ननचे दृश्य डोळ्यांसमोर येते.

१९४७ मध्ये कॅलिफोर्निया येथे माउंट पालॉमारवर एक अतिप्रचंड टेलिस्कोप बसवला गेला होता. तेव्हापासून खगोलशास्त्रज्ञ एकामागून एक प्रश्नाची उत्तरे शोधीत आहेत. ह्या टेलिस्कोपला ' हेल ( Hale ) टेलिस्कोप ' असे नाव दिले आहे. जॉर्ज हेल हा माऊंट विल्सन ऑब्झरव्हेटरीचा डायरेक्टर होता. या हेल टेलिस्कोपची क्षमता माणसाच्या डोळ्यापेक्षा ३,६०,००० पटींनी अधिक आहे. रात्रीच्या वेळी माऊंट पालॉमार याचा घेतलेला एक फोटो आहे. या इथं विश्वाच्या उत्तरेकडील पूर्ण भाग व दक्षिणेकडील अर्धा भाग असा विश्वाच्या पसाऱ्याचा नकाशा काढण्यासाठी सात वर्षं खर्ची पडली. इथेच अल्बर्ट मायकॅलसन यांनी ताऱ्याचा व्यास कसा मापावा हे शोधले होते. त्याशिवाय एडविन हबलसारखेही शास्त्रज्ञ इथे अभ्यासाला आले होते. विश्व हे सतत प्रसरण पावणारे आहे व त्यामुळे विश्वातील वस्तू एकमेकांपासून लांब पळताहेत असा ' भास ' होतो, असा सिद्धांत यांनीच मांडला होता.

' डिस्नेवर्ल्ड 'च्या दोन पानांवर लिहिण्यापेक्षा ती प्रत्यक्ष पाहिलेलीच बरी.

'ग्रेट वॉल ऑफ चायना 'वर चक्कएखादी लहान मोटार धावू शकेल एवढा रस्ता आहे हे तुम्हाला माहीत होते का ? आपण शनिवारवाड्याच्या किल्ल्यावरच उभे आहोत की काय, असे हे चित्र बघून आपल्याला वाटते. शाळेत असतानासुद्धा आपण या भिंतीविषयी वाचले होते; पण ते सर्व अभ्यासाच्या दडपणाखाली असते म्हणून बहुतेक लोकांच्या लक्षात रहात नाही. हे बघणे अगदी उत्स्फूर्त असते; त्यामुळे ते पटकन लक्षात रहाते.

या सर्व ठिकाणी जायला उभ्या ह्यातीत बहुतेक लोकांना मिळणार नाही. म्हणून पुस्तक बघूनच समाधान मानलेले बरे.

फक्त एकच गोष्ट खटकते. हे प्रकाशन ब्रिटिश असल्यामुळे त्यामध्ये ब्रिटन व कॉंटिनेंटमधील अधिक ठिकाणे निवडली आहेत.

–जे. एन. पोंडा

# सप्रेम नमस्कार..

□ आपल्या 'ग्रंथपरिचय' या सदरात श्री. सा. गे. निगळ यांनी लिहिलेला 'मानवी जीवन आणि मनुष्यत्व' हा लेख अत्यंत वाचनीय वाटला. आपल्याच संपादकीय शब्दांत सांगायचे झाले तर लेख वाचनीय वाटला, म्हणून मी लेखकाशी सहमत असेनच असे नाही !

लेख वाचून मला काही स्फुट विचार आले, म्हणून हा पत्रप्रपंच.

सध्याची लैंगीक विकृती हा एकSymptom आहे, तो disease नाही. श्री. हॉलब्रुक व श्री. निगळ यांनी symptom लाच औषध-पाणी केले आहे. मी श्री. डेव्हिड हॉलब्रुकचे पुस्तक वाचले नाही. परंतु श्री. निगळ यांच्या अभ्यासू लेखातून पुस्तकाविषयी बरीचशी कल्पना येते. पुस्तकाच्या नावावरून-सुद्धा (Sex and Dehumanisation) हे पुस्तक अत्यंत anti–sex पुस्तक असावे हे उघड आहे.

मी तसा सेक्सविषयी pro ही नाही व anti ही नाही. श्री. सा. गे. निगळ यांच्या सर्वच मुद्द्यांवर मी असहमत आहे, असेही नाही. मला फक्त नाण्याची दुसरी बाजू दाखवायची आहे.

मला असे म्हणायचे आहे की, अर्थपूर्ण जीवन जगणे या काळात अत्यंत कठीण झाले आहे. कितीशा लोकांना सध्या Compatibility आहे ? कितीसे लोक महागाईत होरपळून गेले आहेत ? कितीशा आई-वडिलांना generation chasm भेडसावत नाही ? जनरेशन गॅप ही एक स्वाभाविक वस्तू आहे, परंतु सध्या चॅझम्सच निर्माण होत आहे. मी याआधीही म्हटलेच आहे की, निव्वळ फ्रॉईड म्हणत होते म्हणून काही sexual urge ही अत्यंत महत्त्वाची ठरत नाही. माणसाची एक मोठी भूक अजून फारशी कुणी समजू शकले नाहीत. त्या भुकेचा व वखवखतेचा आविष्कार आपल्याला कलाकार लोकांतून प्रकट झालेला आढळतो. 'मला काही सांगायचंय' ही ती भूक. या प्रकारात 'मला काही करायचंय', 'मला काही लिहायचंय', 'मला असं नाचायचंय', 'मला असं वागायचंय' असे कैक प्रकार येतील. माणसाला ताण येतो तो कामाचा नव्हे. आज अशा किती तरी गोष्टी आहेत की ज्या आपल्याला अजिबात पटत नसूनही कराव्या लागतात. मेन्दूवर ताण येत असतो तो नावडत्या गोष्टी केल्याने, काम केल्याने नव्हे.

अधिकाधिक लोकांना अर्थपूर्ण जीवन जगणे अशक्य झाल्याने जीवनात एक भली मोठी पोकळी (void) निर्माण झालेली आहे. शेवटी या पोकळीतूनच अनेक निरनिराळे आकार निघतात. काही आकार गुन्हेगारीचे, काही लैंगिक विकृतीचे, काही जुगारीचे, काही पिण्याचे, धूर सोडण्याचे वगैरे कित्येक आकार यात असतील. जीवनाच्या पोकळीच्या प्लॅसिसीनमधूनच हे आकार निघतात, हे कुणालाच नाकारता येणार नाही.मूळ औषध-पाणी करायचे तर या पोकळीवर करावे लागेल. अति असुरक्षितता वाटणारा माणूस फार प्रमाणात खातो, हे मानसशास्त्रज्ञांनी सिद्ध केले आहे. अति असुरक्षित व अति rejected झालेला माणूस खाण्याकडे वळेल,सेक्सकडे वळेल,का आणखी कुठे वळेल याचा नेम नाही !

दुसरे असे की, लैंगिक विकृती ही काही आजची गोष्ट नाही. अनादिकालापासूनची ती मानवाची सोबती आहे. Marhuis de sade कधी होऊन गेला ? त्याच्या नावावरूनच Sadism (परविघ्नसंतोषीपणा) हा शब्द रूढ झाला. प्राण्याशी संभोग (bestiality) हा तर प्रकार दस्तुरखुद्द खजुराहोमध्ये आपल्या पुढे उभा ठाकलेला आहे.

जीवनात जे अनंत विरोधाभास आहेत व त्या विरोधाभासात नेहमीची जी पुसट रेषा आहे, त्यामुळे अनेक तर्कसंगत विचार एकमेकांवर ओव्हरलॅप होत असतात व आदळत असतात. मी असे निरीक्षण केले आहे की, बऱ्याच वेळा (नेहमी नव्हे !) लैंगिक विकृती हे अति उत्कट प्रेमाचे दीर्घीकरण असते. बऱ्याच वेळा (परत नेहमी नव्हे !) बलात्कार हा समाजाने इन्कार केलेल्याचा आक्रोश असतो. 'मला काही सांगायचंय' ही संधी न मिळालेल्याचा एक दयनीय सूड असतो. Roman orgies या Decline and Fall of The Roman Empire या काळातही होत होत्या. आता कदाचित Decline and Fall of the Mother Earth सुरु झाले असेल. हे सर्व कुणी एक Gibbon चित्रित करेलही !

मला इथे लैंगिक विकृतीचे समर्थन करायचे नाही. जेव्हा असल्या विकृती दुसऱ्या व्यक्तीचा बळी घेतात (उदाहरणार्थ–बलात्कार व नंतर खून) तेव्हा ही बाब अत्यंत शोचनीय असते. पण मूळ प्रश्न असा आहे की, आपण काय किंवा शासन काय, किती काळपर्यंत Symptoms वरच औषध-पाणी करत रहाणार ? अनेक प्रकारच्या शिक्षा करून हे प्रश्न सुटले नाहीत. सामाजिक बहिष्काराने तर हे प्रश्न अधिकाधिक गुंतागुंतीचे होत जातात. पूर्वीचे ब्रीदवाक्य होते, 'एकमेकां सहाय्य करू' आताचे ब्रीदवाक्य आहे, 'एकमेकां लहान करू.' दोन व्यक्ती एकत्र आल्या आणि तिसऱ्याचे 'लहानीकरण' केले तरच त्यांच्यामध्ये जवळीक निर्माण होते. 'लहानीकरणा'ने असुरक्षितता व rejection या भावना वाढतात. मदर टेरेसा एकदा म्हणाल्या होत्या, 'या जगात कॅन्सर हा भयंकर रोग नाही. आपली कसलीही उपयुक्तता नाही, आपण कुणालाच नको आहोत (rejection) हाच जगातला महाभयानक रोग आहे.' 'या रोगाने पछाडलेल्या लोकांची गुन्हे करण्याची, विकृती करण्याची, आत्महत्या करण्याची क्षमता अफाट असते. अंतिम प्रकारच्या लैंगिक विकृती व गुन्हेगारी या बऱ्याच वेळा हातात हात व गळ्यात गळा टाकून जात असतात. सध्याच्या प्रस्थापित व्यवस्थेची तऱ्हा 'Cure is better than prevention, अशी आहे. एखाद्या बिल्ला रंगा किंवा यॉर्कशायर रिपरला धरण्यासाठी लक्षावधी रुपयांपेक्षा जास्त खर्च केला जातो. पण असे प्रकार कमी व्हावेत यासाठी अगदी खालून जे बदल करावे लागतात त्यावर कारवाईही होत नाही व संशोधनही होत नाही.

प्रत्येक काळात Sexual Mores हे वेगवेगळे असतात. अब्राहम मास्लो, टाईलहार्ड द शार्डी, श्री. हॉलब्रुक वगैरे पांढऱ्या साहेबांनी कितीही व काहीही सांगितले तरी हे सत्य बदलणार नाही. त्याज्य आणि मान्य असे हे चक्र शेवटपर्यंत सतत फिरतेच रहाणार. काय सांगावं, आजच्या तणावयुक्त औद्योगिक घोडदौडीत टेन्शन कमी करण्यासाठी (थोड्या वर्षात) फो सेक्स ही अत्यंत आवश्यक बाबही होऊ शकेल ? सेक्स ही एक अत्यंत personal बाब आहे. व्यक्तीव्यक्तीत सेक्सच्या निकडीबाबत निरनिराळ्या शेडस् असतात. कितीही झाले तरी सर्वच व्यक्ती एकाच प्रकारच्या Sexual mores ने कधीच बांधल्या जाणार नाहीत. Freedom of Expression मध्ये sexual Freedom असायलाच हवं !

आपण महिनोनमहीने एकच डाएट घेत असतो. कधी तरी आजारी पडतो त्या वेळेला डाएट बदलतो. डाएट बदलल्याने (नेहमी नव्हे !) आपल्याला एकदम तरूण झाल्यासारखा झटका येतो. सेक्स्युअल पार्टनर्स बदलल्यानेसुद्धा शरीराचे rejuvenation होत असते. ही एक सिध्द झालेली बाब आहे. (अर्थात, मांजर, कुत्र्यात व माणसात फरक काय ? हा सर्व puritanism आलाच. पण त्याने एक सिध्द झालेली बाब थोडीच बदलणार आहे ?) Sexual activity मुळे शरीरात अनेक प्रकारच्या हॉरमोन्समध्ये धुमाकूळ माजतो आणि sexual activity उत्तेजित करण्यासाठी विविध पार्टनर्सची आव-

श्यकता असते. संधीवातजन्य रोगात Sexual activity चा फार फायदेशीर असर होत आहे, असे शास्त्रज्ञांना आढळून आले आहे.

मी जवळजवळ एक जुन्या पिढीचाच माणूस आहे. मी स्वत: कधी लैंगिक स्वैराचार किंवा विकृती केलेली नाही. माझ्या मनाला जे पटतं तेच मी नेहमी लिहित असतो. 'लैंगिकतेची व्यापकता व पसारा मानवी जीवनापेक्षा सीमित आहे.' असे एक छान वाक्य श्री. निगळ यांनी लिहिले आहे. त्यांच्याच शब्दात मी निगळ यांना सांगतो की, जीवनाकडेच त्यांनी सीमित दृष्टीने पाहिले आहे. मी परत एकदा सांगतो की, सध्याच्या अनेक प्रकारच्या विकृती या Symptoms आहेत, diseases नाहीत. खरा रोग हा आहे की, प्राधान्य देण्याबाबत मानव हा सारखा कुठे तरी चुकत आहे.ते का व कसे यावर अनेक पानं लिहिता येतील. परंतु ती वेळ ही नव्हे. व्यमिश्र जीवनच (यात सेक्स आलेच) व्यापक विधानाने व एकाच दृष्टिकोनाने निकालात काढणे म्हणजे मनाची कवाडे बंद करणे होय. अधिक्षेपित दृष्टीकोनाने लिहिणे हे केव्हाही सोपे असते; पण ते का होते कसे होते, हे समजून घेणे अतिकठीण आहे. मला आज सेक्स मिळाला नाही तर चालण्यासारखे होते. परंतु मला हे पत्र लिहिता आलं नसतं तर गुदमरल्यासारखं झालं असतं ! Sex पेक्षा Analysis करण्यातच खरी मजा असते !

—जे. एन. पोंडा

# दोन तरुणी

आमची एक वर्गमैत्रिण—

दिसायला सुंदर, वाचन—लेखनाचं वेड.

शाळेत असल्यापासून कविता वगैरे करायची.

कॉलेजच्या पाक्षिक हस्तलिखित भित्तिपत्रकात हिचं लिखाण हमखास असायचं. वक्तृत्वात हिरिरीनं भाग घ्यायची.

बोलण्यात मोकळी, वागण्यात स्वच्छ.

एकुलती एक, त्यामुळं घरची लाडकी.

आईचं जास्त प्रेम. वडीलही सगळे हट्ट पुरवायचे.

समंजस असल्याने हिचे हट्टही अवास्तव नसत.

सगळ्यांशी आपलं समजून वागायची— स्वतंत्र विचार वगैरे बोलायची.

कॉलेजच्या 'भारतदर्शन' सहलीबरोबर फिरून आलेली.

पदवीधर झाल्यानंतर रीतीप्रमाणं लग्न झालं.

एकुलती एक लाडकी लेक. त्यामुळं सालंकृत कन्यादानाचा सोहळा थाटामाटात झालेला.

नवरा दिसायला चांगला—बिझिनेसमन—शहरात रहाणारा.

'अर्थात त्यामुळं आपल्या कर्तृत्वाला, अॅक्टिव्हिटीजना विशाल वातावण लाभेल—काही तरी करून दाखवता येईल—एवढ्याशा अर्धवट गावात लुडबुडणं काही खरं नाही— महिलामंडळ, सोशल क्लब, साहित्यिक चर्चा, बड्यांच्या ओळखी—'

ती खूष होती.

तिच्या लग्नातल्या लाजण्या—बागडण्यानं आम्हाला ते समजलं होतं. वर्ष–दोन वर्षं उलटली.

ती पुन्हा गावात दिसायला लागली.

फिरायला जाताना भेटायला लागली.

कोमेजली होती. सोबत मुलगी असायची.

मध्ये बरेच दिवस गेले.

आली असेल माहेरपणाला, म्हणून आम्ही तिच्या लांब मुक्कामाकडं दुर्लक्ष केलं; पण वर्ष सरलं तरी इथंच बघितल्यावर सहज चौकशी केली.

'ती 'लॉ 'चा अभ्यास करतेय, कायद्याची पदवीधर होते आहे.'

त्या दिवशी सकाळी स्टॅन्डकडच्या रस्त्यानं चाललो होतो.

चौकातल्या कोपऱ्यावरच्या वडाच्या झाडाजवळ बायकांची झुंबड उडालेली.

तिथंच ती समोरून येताना दिसली—

मोकळे सोडलेले ओलसर केस, कपाळी लालभडक कुंकू.

डोक्यावर आदबशीर पदर, हातात पूजेचं तबक.

वटपौर्णिमा असल्याने 'जन्मोजन्मी हाच पती मिळावा' म्हणून वडाची पूजा करून ती परतत होती.

तिला असं बघितलं अन् मी अवाक् झालो—

नवऱ्याबरोबर पटत नाही म्हणून कोर्टात तिची फारकतीची केस चालू असल्याचं आदल्या दिवशीच मला माझ्या वकीलमित्राकडून कळलं होतं—

¤

माझ्या माहितीतली आणखी एक तरुणी.

ती विधवा आहे.

तिचं वय अदमासे अठ्ठावीस—तीसपर्यंत असावं.

मध्यमवर्गीय ब्राह्मणी संस्कारात वाढलेली.

पदवीधर. कॉलेजमध्ये असताना ओळखीची. 'आपल्यातील' मुलं, प्राध्यापक यांनी बसविलेल्या नाटकातून कामं केलेली.

रीतीप्रमाणं चहा-पोह्याच्या साग्रसंगीत पाहुणचारासह, 'दाखवण्याचा' सोपस्कार पार पाडून, मुलाच्या सगळ्या सख्ख्या-चुलत काक्या-माम्यांच्या 'पसंतीनंतर, देणं-घेणं ठरवून, यथास्थित मानमरातब ठेवून लग्न झालेलं.

नवरा चांगला पगारदार.

लग्नानंतर संक्रातीचा हलव्याच्या दागिन्यांचा सण, जावईबापूंचा पहिला 'दिवाळसण', इतमामानं पार पडलेले.

नंतर सुरू झालेला सुरळीत संसार—

माहेरपणाला आल्यानंतर जाणवलेल्या गुबगुबीतपणानं सुखी संसाराची पावती दिलेली. वळून बघावं असं सात्त्विक तेज आलेलं.

वर्षा-दीड वर्षानं राजा-राणीनं एका गोंडस बाळाला जन्म दिलेला.

तिच्या चेहऱ्यावरून ओसंडणारं सुख तिच्या 'धन्य मी 'ची साक्ष द्यायला पुरेसे होते.

पण लेकीच्या सुरळीत संसारानं स्वस्थ, निर्धास्त झालेल्या आई—वडिलांना तिला झालेल्या अपघातानं दुभंगून टाकलं.

एका मोटारसायकल—अपघातानं तिला क्षणात विधवा बनवलं.

जेमतेम तीन-चार वर्षांत आटोपलेला संसार !

नुकतीच कुठं 'सुखाची' ओळख झालेली. एकमेकांच्या कानात किती तरी सुख-स्वप्नं कुजबुजली असतील !

झालेल्या आघातानं जन्मभर उसासल्या काळजानं ती आपलं दु:ख कुरवाळत बसली तर कोणी तिला टोकलं नसतं; पण ती आपल्या सासरचा निरोप घेऊन माहेरी आली.

सोबत छोटी मुलगी.

कुढत न बसता तिनं दु:खाचा आवेग आवरला.

चार टिपं गाळत कोरडी सहानुभूती दाखवणाऱ्यांना तिनं कटाक्षानं बाजूला सारलं. पदवीधर होतीच. शिक्षकी पेशासाठी आवश्यक प्रशिक्षण पुरं केलं.

आणि खंबीर ताठपणानं जीवनाला सामोरी ठाकली.

आपल्या कपाळीचं टिकलीएवढं लाल कुंकू आणि गळ्यात मंगळसूत्र तसंच ठेवून !

कुजबुजणारे अस्वस्थ होऊन कुढत राहिले.

—विनय गुणे
संगमनेर

# कमला

[ २९ ऑगस्टच्या अंकात तेंडुलकरांच्या या नाटकावर एक प्रतिक्रिया आलेली आहे. ही आणखी एक निराळी. ]

एक रोमन साम्राज्य.

त्या साम्राज्याच्या वैभवाने मस्तावलेले मूठभर मालक.

त्या मालकांच्या हौसेखातर भुकेल्या सिंहांची शिकार बनणारे गुलाम.

एक वैराण वाळवंटातील पिरॅमिड.

त्यात चिरविश्रांती घेत पडलेला एक मालक.

त्या मालकाच्या मढ्यासाठी टाचा घासत दगड ओढणारे आणि शेवटी त्या दगडांतच चिणले जाणारे गुलाम.

एक खरेदी-विक्रीच्या व्यवहाराचा बाजार.

त्यात मालाची बोली बोलणारे दलाल, मालाची नीट तपासणी, हाताळणी करणारी गिऱ्हाईके आणि मालाचे ढीग उभे करून असलेले मालक.

त्या बाजारात आपली किंमत ऐकत, आपल्या कदाचित होऊ घातलेल्या नव्या मालकाचा हात गळ्यावरून, छातीवरून, मांड्यावरून फिरवून घेत उभ्या असलेल्या बायका–तो बाजारातील गुलामाचा माल.

एक संसार-दोघांचा. एक स्त्री, एक पुरुष.

त्या संसारात एक मालक–सगळे निर्णय घेणारा, स्वतःच्या इच्छेने वागणारा आणि गुलामाला वापरणारा–पुरुष.

त्या मालकाने ' हस ' म्हणताच हसणारी, ' रड ' म्हणताच रडणारी, 'पार्टीला चल' म्हणताच पार्टीला निघणारी, 'झोप' म्हणताच बिनतक्रार शेजेवर पडणारी, स्त्री–बायको नावाची गुलाम.

एक वृत्तसंस्था-संसारातील हा ' मालक ' पुरुष त्या ठिकाणी पत्रकार.

त्या वृत्तसंस्थेचा मालक-वृत्तपत्राच्या प्रतिष्ठेपेक्षा जाहिराती जपणारा, मानवी मूल्यांपेक्षा स्वतःच्या नफ्यातोटयाला जास्त किंमत देणारा, जळत्या सत्याची आच लागून घेण्याऐवजी आपल्या हितसंबंधांच्या गारव्याला पहुडणारा, इन्कमटॅक्स चुकवणारा, होमोसेक्शुअलसुद्धा.

त्या मालकाकडे असलेला पत्रकार गुलाम. आपण नोकरीत असल्याच्या भ्रमात वावरणारा. त्या मालकाच्या एका इशाऱ्यासरशी आपले कर्तृत्व, आपले सामर्थ्य ढासळलेले पाहात असहाय्यपणे झटपटणारा–गुलाम.

¤

अशा गुलाम माणसांची आणि त्यांच्या गुलामीची चित्रे दाखविणारे नाटक–'कमला'. लेखक–विजय तेंडुलकर, दिग्दर्शक–कमलाकर सारंग, भूमिका–लालन सारंग आणि महाराष्ट्र राज्य नाट्य परिनिरीक्षण मंडळाने मारलेला ' फक्त प्रौढांसाठी 'चा शिक्का. ही वाटोळी चौकट पाहून 'सखाराम बाईंडर' ची घुमाळी आठवत आत शिरलेल्या आबटशोकी जिभल्याचाटू प्रेक्षकांना आणि त्याचबरोबर संस्कृतिरक्षक ' शांतं पापम्' प्रेक्षकांनाही नाटकाच्या आधीच सज्जड दम भरण्यात आला, ' प्रौढ प्रेक्षकहो, या नाटकात 'तसलं' काही नाही. तेव्हा जर नंतर आपल्याला पैसे परत पाहिजे असतील; तर ते महाराष्ट्र राज्य परि-निरीक्षण मंडळाकडून घ्यावेत; कारण ' फक्त प्रौढांसाठी'चा शिक्का त्यांनी मारला आहे. आम्ही मात्र आपल्या वयनिरपेक्ष रसिकतेला अभिवादन करून–'

'कलारंग'चा 'कमला' प्रयोग सुरू झाला.

जयसिंग जाधव (विक्रम गोखले ) हा दिल्लीतील एका बड्या वृत्तपत्राचा बडा पत्रकार. दर वेळी स्वतःच्या वृत्तपत्रासाठी नवनवीन सेन्सेशनल बातम्या आणण्यात या गृहस्थाचा हातखंडा. तर एकदा त्याच्या तिखट नाकाला वास लागला की, बिहार–मधील एका गावी बायकांचा बाजार चालतो. एखाद्या जनावराप्रमाणे स्त्रियांची खरेदी-विक्री होते, भाव बोलले जातात, सौदा पटवला जातो. जयसिंगने हा बाजार गाठला. अडीचशे रुपये वाजवून त्या बाजारातून कमला (चारुशीला साबळे) नावाच्या स्त्रीला खरेदी केले. तिला दिल्लीला आणून, एक मोठी पत्रकार परिषद भरवून त्या बाजाराचा चालता–बोलता जिवंत पुरावा म्हणून सादर केले. ( येथपर्यंतची सगळी हकीगत प्रत्यक्षातील सत्य घटनाच आहे.) जयसिंगने ही एवढी यातायात कशासाठी केली ? त्याला मानवी जीवनमूल्यांचा आदर राखायचा होता म्हणून ? कमला या व्यक्तीबद्दल कणव वाटली म्हणून ? पत्रकार परिषदेनंतर तडक कमलाची रवानगी एका महिलाश्रमात करणारा जयसिंग या दोन्ही प्रश्नांची उत्तरे 'नाही' अशीच देतो. शेवटी जयसिंगही उरतो कमलाचा वापर करणाराच. आणि फक्त कमलाचाच नव्हे तर स्वतःच्या पत्नीचा सरिताचाही (लालन सारंग) वापर करणारा. तिला आपल्या दावणीला बांधलेल्या गुलामाची वागणूक देणारा. जयसिंगला फक्त कैफ असतो स्वतःच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेचा. त्या कैफासाठी तो सगळ्यांचा वापर करायला तयार आहे आणि नेमके हेच सरिताचे दुःख आहे. आपल्या दिखाऊ सार्वजनिक आयुष्यात स्त्री-स्वातंत्र्याचे गोडवे गाणारा तिचा नवरा अखेर बायकोला स्वतःच्या इच्छेनुसार वागणारी शय्यासोबतीण मानणारा अहंकारी पुरुषच आहे, या जाणिवेने आणि स्वत.च्या व्यक्तित्वाची ही गुलामगिरी समजल्याने सरिता तडफडते, बंड करून उठते; पण पुन्हा हा फुलू घातलेला निखारा राखेखाली दडपते. जयसिंगला नोकरीवरून काढून टाकल्याने त्याच्या मालकाने त्याचा कणाच ठेचला आणि या ठेचलेल्या नवऱ्याला त्या आघातातून सावरण्यासाठी सरिता नावाची बंडखोर स्त्री पुन्हा एकदा ' सौ. सरिता जयसिंग जाधव ' हा पत्नित्वाचा शालीन पेहराव अंगावर चढवते.

काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या सत्यघटनेलाच पुन्हा एकदा नाट्यरूपात साकार करीत नाटकाचा पहिला अंक संपतो; तर त्या घटनेने लेखकाच्या मनात उमटविलेल्या विचारतरंगांचे किंवा कल्पनातरंगाचे दर्शन घडवीत दुसरा अंक संपतो. (नाटक दोन अंकीच आहे.) दोन्ही अंकांमधून लेखक विजय तेंडुलकराचा सराईतपणा दिसत असला, तरी विशेषतः दुसऱ्या अंकाला अपेक्षित खोली न मिळाल्याने नाटक अत्यंत उथळ आणि बटबटीत पातळीवर राहते.

एक (प्रत्यक्षात घडलेलीच) घटना जरा अधिक चांगल्या प्रकारे म्हणजे खास तेंडुलकरी संवाद, कोपरखळ्या, सतत येणाऱ्या

फोनच्या साहाय्याने आणि त्या वेळच्या पंजाबी, हिंदी, इंग्रजी, मराठी इत्यादी ढगांच्या वेगवेगळया बोलण्याने आणि अन्य तपशिलानी राजधानीतील पत्रकाराच्या घराचे उभे केलेले वातावरण, पत्रकारपरिषद होईपर्यंत बातमी गुप्त ठेवण्यासाठी जयसिंगची चाललेली धडपड, त्यामुळे निर्माण होणारे ताण इत्यादी सराईत लिखाणतंत्राच्या साहाय्याने, अधिक प्रेक्षणीय ढंगाने पेश केली आहे.

आधी उल्लेख केलेल्या विचार वा कल्पनातरंगाचे गहिरेपण, त्यांच्या विविध छटा आणि सखोलता या गोष्टी दुसऱ्या अंकातच अपेक्षित होत्या; पण संपूर्ण दुसरा अंकभर तेंडुलकरांनी प्रेक्षकांना समोर काठीवर पेंडी बांधलेले गाढव बनविले आहे. म्हणजे 'हां, हां, हे–हे काही तरी बरं दिसतंय,' असे प्रेक्षकाला वाटायला लागते न लागते, तोच तेंडुलकर अत्यंत ढोबळ मुद्दे, अत्यंत सनातन आणि बाळबोध भाषेत मांडून एक बटबटीत वादविवाद आपल्यापुढे सादर करतात. (कमला आणि सरिताची मुलाखत हा दुसऱ्या अंकातील बहुधा एकमेव अपवादात्मक सुदर प्रसंग) मग कधी हा वाद जुनी ध्येयपत्रकारिता विरुद्ध नवी रक्तपत्रकारिता, अर्थात विचार विरुद्ध आँखों देखा हाल, अर्थात दिशाविरुद्ध धावपळ असा असतो, तर कधी पुरुषी अहंकार विरुद्ध स्त्रीची गुलामी असा असतो. त्यातून 'अरे, हाडाचा पत्रकार मी. विनशर्त माफी मागण्यास केव्हाही तयार असतो' अथवा इंग्रजी भाषेतील वर्तमानपत्रातून जनसामान्यांचे जागरण अथवा (सध्या 'कोणीही यावे, टिकली मारून जावे' झालेल्या) यशवंतराव चव्हाणांना काही अहेर अशा खट टिप्पण्या दाद घेऊन जात असल्या तरी त्यामुळे चालू असलेल्या वादविवादातील बटबटीतपणा कमी होत नाही.

'कमला' मधून– मग ती कमला म्हणजे बाजारात उभी असलेली कमला असो वा घराच्या चार भिंतीमध्ये चिणली गेलेली सरिता असो– तेंडुलकरांना स्त्रीची गुलामगिरी दाखवायची होती की, दुसऱ्याला गुलाम बनवून त्याला वापरण्याची माणसाची प्रवृत्ती? (गुलाम आणि नोकर ह्या दोघामध्ये फरक आहे– नोकराला मालक वापरतो; पण त्या वापराला काही नियम असतात. हक्क आणि कर्तव्याच्या जाणिवेने दोघेही एकमेकांशी बांधलेले असतात, नोकराची नोकरी ही त्याच्या असहाय्यतेचा उठवलेला गैरफायदा नसतो तर त्याच्या आणि मालकाच्याही गरजेपोटी दोघांनी केलेला विनिमय असतो. याउलट गुलामाला फक्त कर्तव्ये–तीही मालकाने ठरवून दिलेली कर्तव्ये असतात. गुलामाच्या मालकाला फक्त हक्क असतात आणि स्वत.च्या कोणत्याही लहरीसाठी फक्त सुखासाठीच नव्हे गुलामाचा वापर करण्याचा हक्क त्या हक्कांमधील पहिला हक्क असतो. मालकाचा हा हक्क बिनतक्रार, बिनबोभाट मान्य करणे हे गुलामाचे पहिले कर्तव्य असते.) आपण गृहित धरू की, तेंडुलकर स्त्रीची गुलामगिरी दाखवू इच्छितात. जर कमला या गुलाम स्त्रीत्वाची प्रतिनिधी असेल तर कमलाला या गुलामीची जाणीवच नाही. स्वेच्छेने स्वतःच्या गुलामीचा स्वीकार करणारी कमला अज्ञानी असली तरी गुलाम कशी? बैल न पाहिलेल्या बेडकाला ज्याप्रमाणे त्या बैलाच्या भल्या-मोठ्या आकाराची कल्पनाच करवत नाही, त्याप्रमाणे स्त्रीस्वातंत्र्याच्या वा समानतेच्या कल्पनेचा गंधही नसलेल्या कमलाला स्वतःच्या गुलामीची जाणीवच नाही, किंबहुना ती गुलामी हेच तिचे सुखसर्वस्व आहे. हेच तिच्या दृष्टीने प्रत्येक स्त्रीचे अटळ विधिलिखित आहे. जर सरिता या गुलामीचे प्रतिनिधित्व करीत असेल; तर एका पत्रकाराची सुविद्य आणि सुजाण पत्नी असूनही ती अजून फारच कोरी आणि दुळवी राहिल्यासारखी वाटते. साहजिकच केवळ कमलाच्या घरी येण्यामुळे सरितामधील बंडखोर स्त्री उफाळून उठेल हे पटत नाही. त्या दृष्टीने कमला आणि सरिताच्या मुलाखतीचा एकमेव प्रसंग फक्त सुरेख उतरलेला. 'बीबीजी, आप को कितने में खरीदा?' या कमलाच्या प्रश्नापासून ते कमलाच्या घरदार, मुलेबाळे, शेतीवाडी या साध्या सामान्य स्वप्नांपर्यंत प्रत्येक वाक्य सरितेला तिच्या स्थानाची जाणीव करून देणारे. स्वतःची गुलामी केवळ कळून नव्हे तर वळल्यानंतरही सरतेशेवटी आपल्या ठेचल्या गेलेल्या नवऱ्याच्या पायातील जोडे उतरवून त्याच्या पायाशी बसणारी सरिता म्हणजे नवऱ्याचे अपराध पोटात घालून त्याला क्षमा करणारी दयामूर्ती पत्नी की, रूढ परंपरांनी जखडलेली, पूर्वीपासून सतत मनावर डागलेले संस्कार विसरू न शकणारी आणि कुठल्या तरी एकतर्फी बंधनाने या मालकाच्या आयुष्याशी–त्यातील चढउताराशी जखडली गेलेली असहाय्य गुलाम? माझ्या मते, या दोन्ही प्रतिमांपेक्षा आपल्यासारख्याच गुलाम परिस्थितीने हतबल झालेल्या एका व्यक्तीबद्दल समानशीलेषु व्यक्तीला वाटणारी कणव अशी सरिताची प्रतिमा उभी राहणे लेखकाला अपेक्षित असावे. अर्थात ही प्रतिमा प्रत्यक्षात उभी राहात नाही एवढे खरे.

नाटकातील मध्यवर्ती कल्पनेचे हे फसणे सोडल्यास संहितेतील व्यक्तिरेखाटन, नाटकातील ताण कमी करण्यासाठी विनोदांची आणि कमळाबाई मोलकरीण (ललिता कारेकर) आणि जैन (सुधीर जोशी) या दोन पात्रांची पेरणी, आकर्षक आणि चपखल संवाद (जयसिंगच्या पत्रकारपरिषदेचे त्याने आणि जैनने मिळून केलेले वर्णन हे त्याचे सुंदर उदाहरण. एकूणच पत्रकारपरिषद म्हटल्यानंतर तेंडुलकराच्या लेखणीला जरा जास्तच धार चढते.) इत्यादी गोष्टी तेंडुलकरी सराईतपणाचे निदर्शक.

कमलाकर सारंगांच्या दिग्दर्शनाबद्दल थोड्याफार फरकाने–सराईतपणाचा प्रभाव आणि साहजिकच अन्य कुशलतेचा अभाव.

कलाकाराच्या अभिनयात मात्र नाटकाने विलक्षण बाजी मारली आहे. प्रचंड शाब्दिक वाव असलेल्या विक्रम गोखल्यांपासून मोजकीच वाक्ये मिळालेल्या चारुशीला साबळ्यांपर्यंत साऱ्यांचीच कामे सुंदर झाली आहेत. खास उल्लेख करावा लागतो काकासाहेब मोहिते झालेल्या कमलाकर सारंगाचा. वाक्यांची फेक, नेमक्या जागी दिलेले नेमके प्रतिसाद (चर्येने आणि आवाजाने), चालणे इत्यादी सर्वच गोष्टीमधून त्यांनी काका मोहिते जिवंत केला आहे. या अभिनयाबद्दल –विशेषतः पात्राच्या रिस्पॉन्सिव्ह हालचालींबद्दलही दिग्दर्शक कमलाकर सारंगांना भरपूर गुण द्यायलाच हवेत

अजित मर्चंट यांचे संगीत, बाबा पार्सेकर यांचे नेपथ्य आणि बाबा आबेरकरांची प्रकाशयोजना कोणत्याही व्यावसायिक नाटकाला

साजून दिसेल अशी.

बाकीचे चमचमीत मध्यवर्ती सूत्र हरवलेले किंवा नीट न गवसलेले हे नाटक विजय तेंडुलकरांचे असूनही अपेक्षाभंग करते. *

# रामनगरी

## तीन पात्रांचा बहुरूपी

'बालगंधर्व'मधून जर ढोलकी तुणतुण्याचा आवाज ऐकू आला तर खुशाल समजावे की, विठाभाऊंची 'मुंबईची केळेवाली' आली आहे किंवा निळू फुले अधिक राम नगरकरांचे नवीन लोकनाटय चालू आहे. हसवण्याच्या धंद्यात सोंगाड्या म्हणून तमाशाचा फड गाजवलेल्या राम नगरकरांनी साहित्याच्या व्यासपीठावरही 'रामनगरी'-मधून सोंगाडयाच्या रूपात पाऊल ठेवले आणि ते व्यासपीठही गाजवले. फरक इतकाच होता की, हे दुसरे सोंगाडयाचे रूप खोटे खोटे सोंग नव्हते.

या बहुचर्चित 'रामनगरी'चीच काही प्रमाणात काटछाट करून तर काही ठिकाणी कलमे लावून सुरेश खऱ्यांनी तिचे रूपांतर केले आहे. (नाटयरूपांतर म्हणत नाही; कारण 'मडळी, आता तुम्ही जे पाहणार आहात त्याला नाटक वा एकपात्री प्रयोग वा असेच काही तरी लेबल देण्याच्या भानगडीत पडू नका. हे राम नगरकरांच्या आयुष्यातील काही अस्सल अनुभव आहेत. आम्ही त्यात सामील झालो, तुम्हीही व्हा!' असा दम सुरेश खऱ्यांनी हे रूपांतर सुरू करण्यापूर्वीच देऊन ठेवला आहे.) दिग्दर्शक स्वतः सुरेश खरेच आहेत, तर प्रमुख भूमिकेत स्वतः राम नगरकर.

'रामनगरी'चे हे रूपातर अनुभवताना एक गोष्ट प्रामुख्याने जाणवते—हे अस्सल अनुभव मुख्यतः हास्यकारकच निवडलेले आहेत. शिवाय दृक्–श्राव्य माध्यमातून ते सादर करीत असल्यामुळे त्या दोन्हीचा ज्यामध्ये जास्तीत जास्त वापर करता येईल, असेच अनभव निवडलेले आहेत. प्रत्यक्ष पुस्तक वाचताना मात्र असे जाणवते की, त्यातील अन्य काही किस्से घेऊन प्रत्यक्ष प्रयोगातील काही अनुभवांमधील साचेबद्धपणा टाळता आला असताच, शिवाय राम नगरकरांच्या जीवनातील अन्य काही वेगळया पैलूंचेही दर्शन घडवता आले असते. उदाहरणार्थ, राष्ट्र–सेवादलाचे ऋण रामभाऊ प्रयोगात फक्त काही वाक्यांमध्ये व्यक्त करतात, आपल्या जीवनाला आकार देणारी संस्था, असा तिचा उल्लेख करतात; पण या निवेदनाव्यतिरिक्त त्याचा संबंध प्रयोगात किती येतो? रामभाऊंच्या पोस्टमनी आयुष्यातील किस्से, विनोद आणि दृक्–श्राव्य परिणामकारकता यामध्ये कमी पडत नसताना त्यांचा समावेश करता आला का नसता? आता प्रयोगात असलेल्या अनुभवांचे प्रास्ताविक फापटपसारा वाटेल इतके काही ठिकाणी कंटाळवाणे बनते. त्याला फाटा देऊन त्यांची संख्या वाढवता येणे शक्य आहे. या सर्व प्रयोगामधून जात–पात, न्हाव्याचा धंदा कमीपणाचा मानणे, समाजातील वरच्या थरातील लोकांचा लब्धप्रतिष्ठितपणा आणि तोंडपुजेपणा यांमधून त्याचप्रमाणे रामभाऊंच्या आजूबाजूला असणारी मंडळी—आई, वडील, आजोबा, बायको, नातेवाईक, मित्र इत्यादी लोकांच्या वैशिष्टयपूर्ण व्यक्तिरेखांमधून उभे राहिलेले प्रसंग आणि त्यातील विनोदामुळे पिकणारी खसखस म्हणजे न्हाव्याने आधी केलेली तुळतुळीत हजामत आणि नंतर मारलेला थड पाण्याचा फवाराच आहे. या सर्व प्रयोगामध्ये आपल्या वेगळेपणाने अतिशय उठून दिसणारा पण त्यामानाने दुर्लक्षिला गेलेला प्रसंग म्हणजे रामभाऊंच्या आईच्या मृत्यूचा प्रसंग. त्यातील विसंगतीने भरलेल्या काही घटना ऐकतानाही मनाला चटका बसतो. (रामभाऊंच्या बहिणीचा—द्रौपदीचा—केवळ भावडया अंधश्रद्धेमुळे घडलेला मृत्यू हाही पुस्तकातील असाच चटका लावणारा प्रसंग.) अशा प्रसंगांना योग्य तितका वाव देऊन रामभाऊंच्या शौच–वरातीसारख्या प्रसंगांना आवर घालणे सहज शक्य आहे.

यापूर्वी राम नगरकरांनी व्याख्यानांतून यातीलच काही किस्से ऐकवलेले असल्यामुळे, तर काही विनोदांसारखे विनोद आपण अल्प ठिकाणी ऐकले असल्यामुळे हा सुमारे साडेतीन तासांचा कार्यक्रम काही ठिकाणी फारच कंटाळवाणा होतो.

या संपूर्ण प्रयोगात किंवा अनुभव–साखळीत स्वतः रामभाऊंव्यतिरिक्त अनेक पात्रे येतात. स्वतः रामभाऊंनी त्यातील काही पात्रे रंगविली आहेत; तर नरेंद्र डोंगरे आणि अनिल महाजन यानी अन्य पात्रे वाटून घेतली आहेत. छोटया छोटया अशा या व्यक्तिरेखा लकबी, बोलण्याची ढब आणि वेशभूषेतील बदल या गोष्टींच्या साहाय्याने अतिशय सुरेख उभ्या राहिल्या आहेत. या तीन पात्रानी सादर केलेला 'बहुरूपीचा प्रयोग' हे लेबल या नाटयप्रयोगाला दिले तर दिग्दर्शक सुरेश खऱ्यांना ते पटणार नाही कदाचित, पण खटकणार तरी नक्कीच नाही. या तिघांच्या मानाने सुहासिनी देशपांडे मात्र रामभाऊंच्या पत्नीच्या—राधेच्या—भूमिकेत फारच कमी पडतात.

संपूर्ण प्रयोग घडतो तो निळया पडद्यापुढे ठेवलेल्या एका, क्वचित दोन खुर्च्यांच्या नेपथ्यावर. हा सुटसुटीतपणा प्रत्यक्ष प्रयोग आणि दौऱ्यासाठी प्रवास या दोन्हींना सोयिस्कर.

—सदानंद बोरसे

# दोन समाजपद्धती

पृष्ठ ४ वरून

दारी देशांत गेल्या सात वर्षांत आर्थिक विकासाचा वेग त्यापूर्वीच्या सात वर्षांच्या निम्मा प्रमाणात आहे. बेकारी, चलनवाढीचे प्रमाण १९७३ मध्ये ८ टक्के होते, ते आता २० टक्क्यापर्यंत वाढले आहे. 'कॉमेकोन' या कम्युनिस्ट राष्ट्राचे आर्थिक संघटनेची व्यापारातील तूट आणि परदेशी कर्जे प्रमाणापेक्षा अधिक वाढली आहेत. ही कर्जे वाटून देणे आणि ऊर्जेच्या वापरात काटकसर करणे यावर येत्या पाच वर्षांत पूर्व युरोपला भर द्यावा लागेल. १९७४ ते १९८५ या कालखंडाला कॉमेकॉन राष्ट्रांच्या आर्थिक विकासाचा वेग पाश्चात्य राष्ट्राप्रमाणेच मंदावलेला असेल. अमेरिका व रशिया या दोन्ही बडया राष्ट्रांचे सत्ताधारी नेते नव्याने सत्तरीच्या पुढे आहेत व दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्थेत सारख्याच उणीवा भिन्न स्वरूपात आहेत. भांडवलदारी राष्ट्रांना चळवळींना तोंड द्यावे लागत आहे, तर कम्युनिस्ट राष्ट्रात नागरिकांना खरेदीसाठी दुकानांपुढे मोठ्या रांगा लावाव्या लागत आहेत. भांडवलदारी देशांत

बेकारी वाढत आहे, तर कम्युनिस्ट जगतात जरूरीपेक्षा अधिक कामगार कामावर घेतले जात आहेत ! नवीन पद्धती स्वीकारण्यापेक्षा परिचित दोषाशी, उणीवाशी मिळते घेण्याची वृत्ती दोन्ही बाजूकडे आढळते. प्रत्येक वर्षी धान्य-किंमतीत ५ ते १० टक्के वाढ ही आता अमेरिकन नागरिकांच्या अंगवळणी पडली आहे. किंमत-नियंत्रणाचा प्रयोग तेथेही झाला. त्यामुळे लोकांना ब्रेडसाठी दुकानांपुढे रांगा लावावा लागल्या. या रांगांपेक्षा भाववाढ परवडली, अशी तेथील लोकांची प्रवृत्ती आहे.

काळा बाजार भांडवलदारी देशात आहे, तसाच कम्युनिस्ट देशात आहे. आर्थिक गुन्ह्याना मृत्युची शिक्षा रशियात आहे तरीही काळ्या बाजाराला आळा घालणे शक्य झालेले नाही. काळ्या बाजारामुळे पाश्चात्य देशातील बेकारीची झळ काहीशी कमी झालेली आहे. पूर्व युरोपातील बिकट आर्थिक स्थिती कमी करण्यासही त्याची मदत झालेली आहे, असे मत वरील लेखात मांडले आहे. कम्युनिस्ट राष्ट्रातील मुख्य आर्थिक समस्या म्हणजे नियंत्रित अर्थव्यवस्थेने सर्वसामान्य सुशिक्षित ग्राहकाचे राहणीमान फार कमी झालेले आहे. पश्चिम युरोपातील देशात दर माणशी उत्पन्न वर्षाला ९००० डॉलर आहे, तर पूर्व युरोपमध्ये ते याच्या निम्मे आहे. दर हजार माणसांमागे किती लोकांना टेलिफोन, प्रत्येकाला राहायला जागा किती या दृष्टीने पूर्व जर्मनी हा युरोपातील सर्वात श्रीमंत देश असला तरी पश्चिम युरोपातील देशांच्या मानाने तो मागे आहे. पूर्व युरोपातील देशांत मालाचा दर्जाही पश्चिम युरोपातील देशांच्या तुलनेने निकृष्ट असतो. रशियात बालमृत्यूचे प्रमाण १९७१ पासून वाढले आहे. आज हे प्रमाण अमेरिकेतील प्रमाणाच्या दुप्पट व जपानमधील प्रमाणाच्या तिप्पट आहे. रशियात अन्न व कपड्यासाठी रांगा लागतात हे टंचाईचे निदर्शक आहे. उत्पादनां–तंत्रांतील नव्या शोधाचा भांडवलदारी देशात अधिक चांगल्या प्रकारे उपयोग करून घेतला जातो. तेथें जादा गुंतवणुकीमुळे होणारे उत्पादन कॉमेकॉन देशातील उत्पादनाच्या तुलनेने दुप्पट असते, असे ही या लेखात म्हटले आहे.

कम्युनिस्ट देश संरक्षणावर अधिक खर्च करतात असे सांगून लेखात म्हटले आहे की, नाटो राष्ट्रांचा संरक्षण-खर्च अंदाजपत्रकांच्या साडेचार टक्के आहे, तर वॉर्सा करार –राष्ट्रांच्या बाबतीत हे प्रमाण दहा टक्के आहे. विज्ञानाचा उपयोग रशिया लष्करी सामर्थ्य वाढविण्याकडे अधिक प्रमाणात करतो. बाजारातील खऱ्या किंमतीच्या दृष्टीने विचार केला तर रशियाच्या संरक्षण–खर्चाचे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या १७ टक्यापर्यंत जाईल. रशिया मात्र आपला संरक्षण खर्च ११ ते १३ टक्के असल्याचे सांगतो. पोलंडमध्ये उपासमारीचे जिणे कंठणारा कामगार जेवढे मांस खातो त्यापेक्षा कमी मास सर्वसाधारण रशियन माणसाला मिळते. कम्युनिस्ट राष्ट्रात ग्राहकोपयोगी वस्तूचे उत्पादन वाढविण्याची मागणी होत आहे. पूर्व युरोपमध्ये गेल्या पंचवीस वर्षांत ग्राहकोपयोगी वस्तूचे उत्पादनावर अधिक भर दिला जाण्याचा संभव आहे.

बेकारी आणि चलनवाढ हे प्रश्न सोडविणे पाश्चात्य राष्ट्रांना कठीण जाणार आहे, तर कम्युनिस्ट राष्ट्राना कोणत्या प्रश्नाना तोंड द्यावे लागणार हे पोलंडने दाखवून दिले आहे. पोलंडचे भवितव्य काहीही असो, जुन्या प्रकारचे स्थैर्य तेथील जनता यापुढे मान्य करणार नाही. नाही म्हणण्याचे धैर्य तेथील लोकांनी दाखविल्यामुळे कम्युनिस्ट पक्षाच्या एकतंत्री सत्तेबद्दलची दहशत कमी झाली आहे. भांडवलशाहीतच तिच्या नाशाची बीजे असतात, असे मार्क्सने म्हटले होते. आता कम्युनिझममध्येच त्याच्या नाशाची बीजे आहेत, हे पोलंडमधून घटना दाखवून देत आहेत, असे या लेखाच्या शेवटी म्हटले आहे.

लेखात भांडवलदारी पद्धतीतले दोष व उणीवा दाखविल्या असल्या तरी कम्युनिझमपेक्षा तीच पद्धती चांगली आहे आणि भांडवलशाहीचा आत्मनाश होण्याऐवजी कम्युनिझमचाच आत्मनाश होण्याची चिन्हे दिसत आहेत, हे दाखविण्याकडे लेखाचा जास्त कल आहे. मार्क्सला भांडवलशाही जेवढ्या लौकर नष्ट होईल असे वाटले होते तेवढ्या लौकर ती नष्ट झालेली नाही आणि कम्युनिझमबद्दलही तेच म्हणता येईल. दोन्ही पद्धती मूळच्या स्वरूपात राहिलेल्या नसून त्यात बदल होत आहेत ही वस्तुस्थिती आहे. मानवसमाजाच्या विकासावर तुमचा विश्वास आहे की नाही, हा खरा प्रश्न आहे, चुकीच्या दिशेने प्रयत्न झाल्याने काही वेळा पीछेहाटही झाली असेल, पण चुकांपासून धडे घेऊन प्रगती पुढे चालूच आहे. भांडवलदारी राष्ट्रानी लोकशाहीकडून समाजवादाकडे प्रगती करायला हवी आणि कम्युनिस्ट देशांनी साम्यवादाकडून लोकशाहीकडे प्रगती करायला हवी. पोलंडमधील चळवळ ही कम्युनिस्टला लोकशाहीच्या दिशेने नेण्याचा प्रयत्न आहे, तर 'युरो-कम्युनिझम' म्हणजे पाश्चात्य लोकशाहीच्या मार्गाने कम्युनिझम आणण्याचा प्रयत्न आहे. मूलभूत उद्योगाचे राष्ट्रीयीकरण ही कम्युनिझमची कल्पना काही भांडवलदारी राष्ट्रांनीही मान्य केली आहे. विरोधी शक्तीच्या संघर्षातून विनाश आणि विकास या दोन्ही प्रक्रिया होत असतात. जे नको असते, ज्याची उपयुक्तता संपलेली असते, जे विकासाच्या आड येते, त्याचा विनाश होतो. इतिहासक्रमाने या प्रक्रिया चालूच असतात.

बेकारी व चलनवाढीच्या समस्या भांडवलदारी राष्ट्रांना यशस्वीपणे सोडविता आलेल्या नाहीत. कम्युनिस्ट देशांत या दोन्ही समस्या जाणवत नाहीत तेथे जाणवणाऱ्या समस्या म्हणजे मालाची टंचाई व निकृष्ट दर्जा! पण हे दोष काही कम्युनिस्ट पद्धतीचा अपरिहार्य परिणाम नाही. ते सुधारता येण्यासारखे आहेत. कम्युनिस्ट पद्धती त्यामुळे नष्ट होईल, असा अपरिहार्य निष्कर्ष त्यातून निघत नाही, असे असले तरी कम्युनिस्टांनी अंतर्मुख होऊन आपली पद्धती सुधारायला हवी. लोकशाही प्रथा व पद्धतीचा अधिक प्रमाणात अवलंब करायला हवा. पोलंडच्या घटना तेच सूचित करीत आहेत. कम्युनिझम नष्ट होणार नाही, त्याचे स्वरूप बदलेल.

सध्याचा कालखंड हा भांडवलशाही आणि कम्युनिझम यांच्या सहअस्तित्वाचा कालखंड आहे. भांडवलशाहीपेक्षा कम्युनिझम ही अधिक सरस पध्दती आहे, असाच कम्युनिस्टांचा दावा असतो. वीस वर्षांत अमेरिकेला मागे टाकून आपल्या पद्धतीचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्याची योजना क्रुश्चेव्ह यांनी जाहीर केली होती, पण क्रुश्चेव्हच पदच्युत झाले. त्यांनी दिलेला वीस वर्षांचा कालही उलटून गेला. औद्योगिक विकासात रशिया अजूनही अमेरिकेला मागे टाकू शकलेला नाही, उलट तेथील विकासाचा वेग मंदावला आहे, ही वस्तुस्थिती मान्य करायला हवी. भांडवलशाही नष्ट झालेली नसली तरी बेकारी व चलनवाढीच्या चक्रातून ती बाहेर पडू शकलेली नाही. त्यामुळे त्या देशातही विकासाचा वेग पूर्वीच्या मानाने मंदावला आहे, लोकशाही आणि समाजवाद यावर आधारलेली नवी समाजपद्धतीच यातून जगाला पुढे नेऊ शकेल. यावर अधिक चिंतन होणे आवश्यक आहे. येथे ते केवळ विचारसूत्र मांडले. □